[illegible]

[illegible]

BARTH'S BIBLE STORIES,

NEW TESTAMENT

[illegible]

Barth, Christian Gottlob
11

ख्रिस्ती शास्त्रांतल्या कथा.

नव्या कराराच्या.

BARTH'S BIBLE STORIES.

NEW TESTAMENT.

828

TRANSLATED INTO MARATHI.



BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.
1,500 COPIES. A. D. 1852.

मुंबईमध्यें अमेरिकन मिशन छापखान्यांत छापिलें.

सन १८५२.

1852

अनुक्रमणिका.

अनुक्रमणिका.

अनुक्रमणिका.

ख्रिस्ती शास्त्रांतल्या कथा.

नव्या कराराच्या.



अध्याय १.

जखार्या व मारया यांस गाब्रीएल दूताचें दर्शन.

इस्राएल लोकांचा हेरोद राजा राज्य करीत असतां, त्याच्या यहूदा प्रांतांत जखार्या ह्मणून कोणी याजक आपल्या एलिसाबेथ नामक बायकोसुद्धां राहत होता. तीं उभयतां अनपत्य होत्सातीं फार ह्मातारीं झालीं होतीं. त्या जखार्यास पाळीप्रमाणें याजकपणाचा अधिकार आला, तेव्हां तो यरुशालेम शहरीं देवालयांत जाऊन धूपसमर्पण करीत असतां, लोकांचा समुदाय बाहेर जमून प्रार्थना

करीत राहिला. तेव्हां आंत देवाचा दूत प्रगट होऊन त्या वृद्ध जखार्यास बोलला कीं, "तुला पुत्र होईल त्याचें नांव तूं योहान्न ठेव. तो इस्राएलांतील बहुत लोकांचें मन परमेश्वराकडे वळवून त्यांस भूलोकीं येणारा जो येशू ख्रीस्त त्याची वाट पाहावयास लावील." हें दूतवाक्य त्यास आपल्या ह्मातारेपणाकडे पाहून अविश्वास्य वाटलें, आणि तो दूतास ह्मणाला कीं, "तुझ्या वचनाच्या खरेपणाविषयीं प्रमाण काय?" तेव्हां त्याने उत्तर केलें कीं, "मी गाब्रीएल, जो ईश्वरासमोर उभा असतो तो. ईश्वराने तुला इष्ट वर्त्तमान सांगावयास मला एथें पाठविलें आहे. असें असतां तूं माझ्या वाक्यावर न विश्वासून प्रमाण पुसतोस तर सांगतों कीं, हीं पूर्ण होण्याच्या दिवसापर्यंत तूं मुका होसील." हें दूताचें भाषण संपतांच तो मुका होत्साता बाहेर आला, तेव्हां त्याच्याने लोकांसीं बोलवेना; आणि तो त्यांस खुणावून उगाच राहिला. त्यावरून त्याला साक्षात्कार झाला असें लोक समजले.

त्याला तत्काल मुकें केल्यावरून ईश्वराने स्ववचनाचें सत्यत्व व अविश्वासामुळें त्याचा निषेध हीं दोनीं दाखविलीं.

या गोष्टीस पांच महिने झाल्यावर तोच दूत नाजोरेथ गांवीं जाऊन मारया नामक कुमारी इला बोलला कीं, "अगे भाग्यवति देवाच्या आवडते, सुखी ऐस! प्रभु तुला अनुकूळ असो!" हें ऐकतांच ती दचकली. तेव्हां दूताने ह्मटलें कीं, "भिऊं नको, तुजवर ईश्वराची कृपा झाली आहे. तूं गरोदर होऊन पुत्र प्रसवसील; त्याचें नांव येशू असें त्वां ठेवावें. तो महान होईल आणि परात्पराचा पुत्र ह्मटला जाईल, आणि ईश्वर त्याला दावीद

राजाचें राजासन देईल." तें ऐकून ती बोलली कीं, "हें कसें घडेल?" दूत बोलला, "तुजवर पवित्र आत्मा व परमेश्वराची छाया येऊन हें सर्व घडेल." मग एलिसाबेथ इचा वृत्तांत तिला सांगून बोलला कीं, "देवास कोणतेंहि अशक्य नाहीं." तेव्हां त्या दूतवाक्यावर तिचा विश्वास बसला आणि दूत स्वस्थानीं गेला.

मग लागलीच मारया एलिसाबेथेच्या भेटीस निघून तिच्या घरीं पोहंचली. तों एलिसाबेथ पवित्र आत्म्याने पूर्ण होत्साती मारयेला बोलली, "स्त्रियामध्यें तूं धन्य आहेस, आणि तुझ्या पोटचें फळ धन्य आहे; आणि माझ्या प्रभुच्या आईने माझ्या घरीं यावें हें मला कोठून?" तेव्हां मारयेने देवाची स्तुति केली.

पद.

सर्व भावें मी शरण देवाला ॥
आहे प्रसाद मिळो त्याचा मला ॥धृ॥
माझा जीव हा देवा थोर फार ॥
मानितो आणि देव जो उदार ॥
तारक माझा त्याचा उपकार ॥
मानूनि आत्मा माझा वारंवार ॥
आनंद पूर्ण बहुतचि झाला ॥
सर्व भावें० ॥१॥
कां तर त्याने नीचपणाकडे ॥
निजदासीच्या पाहिलें या फाडें ॥
धन्यता लाभ मोठा मला घडे ॥
आतांपासूनि वंश सर्व बुडे ॥

बहुत धन्य ह्मणतील मला ॥
सर्व भावें० ॥ २ ॥
शक्तियुक्त जो त्यानें पाहा आतां ॥
मोठीं जीं कृत्यें तीं माझ्या करितां ॥
केलीं, पवित्र त्याचें नाम स्वतां ॥
तया जे भिती त्यांवर ममता ॥
पिढ्यानुपिढी तयाची निश्चला ॥
सर्व भावें० ॥ ३ ॥
तयानें केला स्वभुजाकडून ॥
विक्रम, गर्वें गेले जे फुगून ॥
ते सर्व दिले क्रोधें उधळून ॥
बलिष्ट नृपां आसनावरून ॥
काढिलें दीन जन उंच केला ॥
सर्व भावें० ॥ ४ ॥
क्षुधित लोकां चांगल्या अन्नानीं ॥
संतुष्ट केलें, धनिक जे जनीं ॥
त्यांस रिकामें लाविलें लुटूनी ॥
तो त्या आमच्या पूर्वजांच्या कानीं ॥
जैसें प्रीतीनें वचन बोलला ॥
सर्व भावें० ॥ ५ ॥
तैसें तो पाहा आब्राहामावरी ॥
आणि सर्वदां तत्संतानोपरी ॥
जी दया तिच्या स्मरणार्थ करी ॥
इस्राएलांचें साह्य परोपरी ॥
ऐसा सेवकां निजां मानवला ॥
सर्व भावें० ॥ ६ ॥

नंतर मारया सुमारें तीन महिने एलिसाबेथेपाशीं राहून तेथून नाजोरेथ गांवीं आपल्या घरीं गेली. मग ईश्वरवचनाप्रमाणें एलिसाबेथ पुत्र प्रसवली. तो आठ दिवसांचा झाला तेव्हां इस्राएलांच्या चालीप्रमाणें त्याची सुंता करणें व नाव ठेवणें यांचा समय आला. तेव्हां शेजारी व नातलग जमून त्यानीं त्याच्या बापाचें नांव जें जखार्या तेंच ठेवावें असें ह्मटलें. परंतु एलिसाबेथेने निश्चयें सांगितलें कीं, "याचें नांव योहान्न ठेवायाचें आहे." नंतर त्यानी जखार्यास खुणेने विचारिलें तेव्हां त्यानेहि पाटीवर लिहून तेंच दाखविलें. हें लोकांस मोठेंच आश्चर्य झालें. आणि या नांवाचा निश्चय होतांच जखार्याची जीभ बंदांतून सुटली; आणि तो पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन ईश्वराची स्तुति करूं लागला.

पद.

देवाची कीर्ति वर्णीन मी सर्व ॥
ऐसा तो कोण धरील बा गर्व ॥ धृ०॥
ईश्वर थोर स्वजनां पावून ॥
प्रीतीने त्याचा उद्धार करून ॥
रक्षिता झाला सर्वत्र जपून ॥
नाहींच थोर दुजा त्यावांचून ॥ देवाची० ॥१॥
भविष्यवाद्यांच्या मुखानें बोलला ॥
तो सर्व पण सिद्ध त्याने केला ॥
दावीदवंशीं स्वयेंचि तो आला ॥
शत्रूपासूनी आह्मा त्राता झाला ॥ देवाची० ॥२॥
त्याने जो मागें पूर्वजांसीं केला ॥
करार आतां तो त्याने स्मरिला ॥

त्या नाहीं पार तयाच्या कृपेला ॥
ऐका करार सांगतों सर्वांला ॥ देवाची० ॥३॥
तुह्मी आपल्या शत्रूंच्या हातून ॥
सुटून माझ्या समोर राहून ॥
धार्मिकपणें मजला भजून ॥
सुख पावाल ऐसें मी करीन ॥ देवाची० ॥४॥

नंतर तो आपल्या मुलाविषयीं भविष्य बोलला.

बाळा त्वां व्हावें सर्व जना मान्य ॥
तुझि कीर्ति वाढो लोकीं असामान्य ॥ धृ० ॥
हे बाळका, तूं भविष्यें वदतां ॥
अति प्रसिद्ध होसील बा स्वतां ॥
सन्मार्ग सिद्ध करण्याकरितां ॥
देवासमोर चालसील आतां ॥ बाळा त्वां० ॥१॥
सर्व लोकांस स्वपापांची क्षमा ॥
होऊन त्यांस तारणाची सीमा ॥
मिळण्यासाठीं बुद्धि निरूपमा ॥
देऊन जनीं दाविसील प्रेमा ॥ बाळा त्वां० ॥२॥
तुझि प्राप्ति आह्मा देवाच्या दयेने ॥
झाली हा त्याने प्रकाश कृपेने ॥
आकाशांतून आह्मास त्वरेने ॥
वोपिला त्याला असोत नमने ॥ बाळा त्वां० ॥३॥
अज्ञान तमें जे जे अंध नर ॥
होऊन मृत्यु गर्तांत सत्वर ॥
धावती, त्यांचें दुःख जें अपार ॥
पाहून तें तो करील विचार ॥ बाळा त्वां० ॥४॥

आणि त्या जना प्रकाश देऊन ॥
तयांचे पाय सुमार्गी लावून ॥
कल्याण पूर्ण करील ते जन ॥
त्याचा होईल जगांत सन्मान ॥ बाळा त्वां० ॥५॥

मग योहान्न वाढत गेला आणि त्याला उत्तम गुण येत गेले. तो इस्राएलांस आपल्या प्रसिद्ध होण्याच्या दिवसापर्यंत ह्मणजे तीस वर्षांचा होई तोंपर्यंत रानांत राहिला.

अध्याय २.

येशूचा जन्म.

त्या समयीं आवगुस्तस हा रोमी बादशाहा होता. त्याची सर्वत्र सत्ता झाली, तेव्हां त्याने आपली सर्व प्रजा



तिच्या जिंदगीसुद्धां मोजण्याचा हुकूम केला होता, सबब जे एकटे किंवा आपल्या कुटुंबासुद्धां प्रवासी झाले होते

त्यांस आपल्या मूळगांवीं जाणें प्राप्त झालें. त्या वेळेस नाजोरेथ गांवीं राहणारीं मारया व योसेफ हीं दोन स्त्री-पुरुषें दावीदाच्या कुळांतील ज्या दोन कुटुंबांत जन्मलीं होतीं तीं दोन्हीं कुटुंबें फार गरीब होतीं. त्या योसेफाच्या मनांत मारयेला गरोदर पाहून कुकल्पना आली. कारण ती त्याने वरिली होती. तेव्हां दिव्य दूताने प्रगट होऊन त्यास सांगितलें कीं, "तूं मनांत कांहीं पाप न आणितां इला आपल्यापासीं घे; इच्या पोटीं विश्वासुकांस तारणारा पुत्र होईल त्याचें नांव तूं येशू असें ठेव." त्यावरून तो मारयेस घेऊन आपलें मूळगांव बेथलेहेम एथें गेला.

तेव्हां तेथें इतकी दाटी झाली होती कीं योसेफास बायकोसुद्धां राहाण्याकरितां धर्मशाळेंतहि जागा मिळेना ह्मणून एका गोठ्यांत कांहीं जागा मिळाली तेथें त्यांस राहावें लागलें. त्या जागीं मारया प्रसूत झाली. मग तिने त्या बाळकास वस्त्राने गुंडाळून गव्हाणींत ठेविलें. पाहा बरें! जो सर्वदां अनंत सुखांत राहणारा ईश्वर, त्याचा अवतार आह्मास महादुःखांतून काढण्यासाठीं आपण माणसासारिखा दुःखावस्थेंत आला; तो जन्मला हें योसेफ व मारया यांखेरीज कोणांसहि समजलें नाहीं.

परंतु ईश्वरास त्याची काळजी ह्मणून त्याने राजादिकांनीं बहुत श्रम केले तरी ज्याचें पदनखहि दृष्टीस पडणें कठीण असा आपला दूत त्याविषयीं साक्ष देण्यास पाठविला. तो दूत प्रथम रानांत मेंढपाळ कळप चारीत होते तेथें गेला. तेव्हां मेंढपाळ त्याच्या तेजाने दिपून भयाभीत झाले. हें पाहून दूत बोलला, "भिऊं नका,

तुमचा तारक बेथलेहेम गांवीं जन्मला आहे. हें आनंदाचें व उत्सवाचें वर्त्तमान प्रसिद्ध करण्यासाठीं मी आलों. तुमच्या विश्वासासाठीं खूण सांगतों कीं, तुह्मी गांवांत शोधा ह्मणजे गव्हाणींत वस्त्राने गुंडाळलेला बाळक पाहाल." इतक्यांत त्या दूतास अणखी बहुत दूतांचे समुदाय येऊन मिळाले. मग ते सर्व ईश्वरास गौरवून स्तवित होत्साते, जयजयकार करून आनंदाने सुस्वर गाऊं लागले.

जयजय मंगलनामा ॥ जयजय सद्गुण धामा ॥
जयजय वैरिविरामा ॥ उज्ज्वलधामा ॥१॥
जन दुःखें हरपावीं ॥ त्यानी मुक्ति वरावी ॥
ह्मणूनी तूं निजबरवीं ॥ चरणें दावी ॥२॥
भूलोकीं तूं येतां ॥ करशिल ज्या, त्या माता ॥
ऐकुन हृष्ट श्रोता ॥ होइल आतां ॥३॥
अज्ञानाच्या बंडा ॥ मोडूनि, निज झेंडा ॥
लावुनि, तूं जन खंडा ॥ तार उदंडा ॥४॥
जय जन दुःख विनाशा ॥ जय परिपालित देशा॥
जय नृपमान्यनिदेशा ॥ जय जगदीशा ॥५॥

आणि मेंढपाळ धांवत त्याच रात्रीं बेथलेहेमीं गेले. तेव्हां दूतानी सांगितल्याप्रमाणें त्यांस मूल सांपडलें. मग मेंढपाळानी दूतमुखापासून ऐकिलेलें गायन व त्या मुलाचा जन्म इत्यादि मारया योसेफ यांस व इतर लोकांस सांगितलें. तें ऐकून सर्वानी आश्चर्य केलें, परंतु मारयेने त्या गोष्टी मनांत ठेवून त्यांचें मनन केलें.

नंतर आठव्या दिवसीं त्याची सुंता करून, येशू हें नाम ठेविलें. आणि चाळिसाव्या दिवसीं मोश्याच्या नेमशास्त्रा-

प्रमाणें त्याला आईबापानी यरूशालेमांतील देवळांत नेलें. तेव्हां त्या शहरांत एक शीमोन ह्मणून फार वृद्ध माणूस त्याला पवित्रआत्म्याने सुचविलें होतें कीं तारणाऱ्यास पाहिल्यापूर्वी आपण मरण पावणार नाहीं. तो येशू देवळांत आला असी त्याच्या मनांत आत्म्याने प्रेरणा केल्यावरून त्या देवळांत गेला. आणि त्याने मोठ्या आदरपूर्वक प्रेमाने त्यास हातांवर घेऊन देवासस्तवून ह्मटलें कीं, “हे



ईश्वरा, मला तारक भेटला, आतां मला सुखाने या देहापासून सोडितोस.” नंतर त्याच्या आईबापांस आशीर्वाद देऊन आईस सांगितलें कीं, “इस्राएलांत वहुतांचें पडणें व उठणें यांसाठीं आणि दुर्जनांचीं निंदावचनें सोसण्यासाठीं हा देवाने पाठविला आहे.”

इतक्यांत आन्ना नामक भविष्यवादिनी स्त्री देवळांत जाऊन देवास स्तवून येशूविषयीं भविष्य बोलली.

अध्याय ३.

येशू ईश्वराचा अवतार.

येशूविषयीं शास्त्रांत असें लिहिलें कीं प्रारंभीं शब्द होता, आणि तो देवाजवळ होता, आणि तो देवच होता. तोच प्रारंभीं देवाजवळ होता. त्याकडून अवघीं झालीं. जें झालें तें कांहींच त्यावांचून झालें नाहीं. आणि तो शब्द अवतरला, आणि त्याने आह्मामध्यें वस्ति केली. तो कृपेने व खरेपणाने पूर्ण होता. ख्रिस्तीशास्त्रसमुद्र आश्चर्यकथा लहरींनी व्याप्त आहे, तथापि त्यांत ही अत्याश्चर्यकारक गोष्ट. ज्याला आकाशांतील लोक फार भिऊन नमतात त्याने या मनुष्यांतील दरिद्रकुलांत जन्म घेऊन नाना प्रकारचीं लाहान मोठीं दुःखें भोगावीं.

‘ईश्वरच माणूस झाला.’ हें सांगणें जर कोणास असंभाव्य वाटेल तर शून्यापासून सृष्टि कसी झाली? ईश्वराने ही गोष्ट असीच आह्मास कळविली ह्मणून अन्यथा नव्हे. आणि कशासाठीं हा अवतार, हेंहि आह्मास कळविण्याकरितां देवाने सांगितलें कीं, “येशू ख्रीस्त पाप्यांस तारावयासाठीं या जगांत आला.” ह्मणूनच त्याच्या जन्मकाळीं “देवाचें परम गौरव, पृथ्वीवर शांति आणि मनुष्यांत प्रसन्नता होवो,” असें गायन त्या अनेक दिव्य दूतांस योग्य झालें. अस्याचें गायन आह्मी करूं नये काय?

अध्याय ४.

येशूचें दर्शन घेण्यास पूर्वेकडून ज्ञानी लोकांचें येणें.

तो बेथलेहेमांत असतां, पूर्व देशांतील ज्ञानी लोकांनी यरूशालेमांत येऊन विचारिलें कीं, "इस्राएलांचा राजा जन्मला तो कोठें आहे! आह्मी पूर्वेकडून त्याचा तारा इकडे पाहिला त्यावरून अनुमानानें त्याच्या सेवेसाठीं एथें आलों." भविष्यलेखावरून जो अवतार होणार, त्याची वाट लोक ४००० वर्षें पाहत होते. आणि तेव्हां 'आतां तो अवतार झाला,' असें ऐकण्यांत आल्यावरून तेथील हेरोद राजा व त्याची प्रजा यांचीं तोंडें उतरलीं; कारण त्या राजाला भविष्यलेखाचें यथार्थ ज्ञान नव्हतें ह्मणून वाटलें कीं हा सार्वभौम होऊन माझें राज्य हरील.

मग त्यानें आपल्या जवळच्या शास्त्र्यांस बोलावून विचारिलें कीं, "येशूच्या जन्माचें ठिकाण कोणतें!" तेव्हां ते बोलले "बेथलेहेम." याविषयीं भविष्यग्रंथांत लिहिलें आहे कीं, "हे यहूदा देशांतील बेथलेहेमा, तूं यहूदाच्या सुभ्यांतील सर्वांपेक्षां लहान असें अगदी नाहींस; कारण कीं माझे लोक इस्राएल यांस पाळील असा जो अधिकारी तो तुजमध्यें उत्पन्न होईल." असें ऐकून तो दुष्ट स्वभाव राजा यानें त्या पूर्वेकडील ज्ञान्यांस विचारिलें कीं "तुह्मी कोणत्या समयीं तारा पाहिला?" आणि आपली समजूत करून घेऊन कपटबुद्धीनें त्यांस सांगितलें कीं, "तुह्मी त्याचा पक्का शोध करून मला कळवा. ह्मणजे मी त्याची सेवा करावयास तेथें जाईन."

मग ते लोक तेथून निघाले; तेव्हां त्यांनी पाहिलेला

तारा त्यांच्यापुढें जात जात जेथें येशू होता तेथें आकाशांत स्थिर झाला. त्यावरून त्यांनी तेथें पाहिलें, तों



त्यांस येशूचें दर्शन झालें. मग ते त्याला नमन करून व सोनें वगैरे देऊन, हेरोदापासीं फिरून न जावें असें स्वप्नांत प्रबोधित होऊन दुसऱ्या वाटेने आपल्या देशांस गेले.

अध्याय ५.

हेरोदाची क्रुद्धता.

मग हेरोद त्या ज्ञानी लोकानी आपणास ठकविलें, असें समजून फार तापला, कारण येशूचा घात करावा असा त्याचा मनसोबा होता, परंतु त्याला शोधून काढण्याचा उपाय त्यास दिसेना. मग त्याने बेथलेहेम व त्याच्या आसपासचे गांव यांत दोन वर्षांच्या आंतलीं जीं मुलें असतील तीं सर्व वधावीं असा हुकूम केला.

मग त्याच्या चाकरानी त्याप्रमाणें केलें. पाहा बरें ! तेव्हां ज्यांची निरपराधी प्रिय लेंकरें राजाने मारलीं त्यानीं आपल्या लेंकरांसाठीं केवढा शोक केला असेल.

परंतु येशू त्याच्या हातीं लागला नाहीं. योसेफास स्वप्नांत ईश्वराने सांगितलें कीं "ऊठ, आपली बायको व पुत्र घेऊन मिसर देशांत जा, आणि मी तुला सांगे तोंपर्यंत तेथें राहा. हेरोद एथील मुलाचा नाश करणार आहे." ह्यावरून तो त्याच रात्रीं बायको व मूल यांस घेऊन मिसर देशांत गेला.

पुढें कांहीं दिवसांनी हेरोद मेला. तेव्हां देवदूताने योसेफास सांगितलें कीं तूं आतां स्वस्थपणें आपल्या देशांत जा; बालहत्या करणारा जो हेरोद तो मेला." असें ऐकून तो बायको व मूल यांसुद्धां गालीलांत आपल्या नाजोरेथ गांवीं राहावयास गेला.

अध्याय ६.

येशूची बाल्यावस्था.

येशू बाल्यावस्थेंत असतां त्याची आईबापासीं व मित्रांसीं वर्तणूक कसी होती, आणि त्याने विद्या कसी संपादिली, व वेळ कसा घालविला, हें समजण्याविषयीं कित्येकांस उत्कंठा असेल; परंतु याविषयीं विस्ताराने कांहीं शास्त्रांत सांगितलें नाहीं. संक्षेपाने लिहिलें आहे कीं, "तें लेंकरूं वाढलें, आणि ज्ञानेंकरून पूर्ण असतां आत्म्याने बळावलें, आणि त्यावर देवाची पूर्ण कृपा होती." या लहान वाक्याचा किती अर्थ होतो बरें, जरी तो पराक्रमी परमेश्वर तरी लेंकरूं झाला. शास्त्रलेख असा आहे कीं, "त्याला आपल्या भावांसारखें होण्याचें अगत्य होतें." याकरितां त्याला भूक व ताहान व आयास प्राप्त झाले. त्यास

इतर लेंकरांसारखा विद्याभ्यास करावा लागला. तो लेंकरूंच; परंतु पापी लेंकरूं नव्हता. त्यास व इतर माणसांस जमीनअस्मानचें अंतर. त्याने ईश्वराच्या आज्ञा यथार्थ पाळिल्या. त्यांत ईश्वराचा आत्मा होता. त्याची आणि ईश्वराची इच्छा एकच. आह्मासारखे त्याला दुष्ट भाव व मत्सर इत्यादिक दुर्गुण नव्हते. तो एकाग्रतेने शास्त्र वाचून त्याचें मनन करीत असे.

त्याचीं आईबापें वल्हांडण सणाकरितां यरूशालेम शहरास त्यासुद्धां प्रतिवर्षीं जात असत. त्याप्रमाणें त्याला बारावें वर्ष होतें त्या सालीं तीं सदर्हू शहरीं सणासाठीं गेलीं. आणि सणाचे दिवस संपल्यावर तीं आपल्या घराकडे परतलीं. तेव्हां त्यांबरोबर येशू नव्हता. परंतु मागें संगत्यांत असेल, असें समजून एक दिवसाची वाट चालून समुदायामध्यें नातलग, ओळखी, यांपासीं शोध करितां त्याचा ठिकाण लागेना, सबब पुन्हा यरूशालेम



शहरास गेलीं. नंतर तेथें शोध करितां तीन दिवसानीं देवळांत शास्त्री लोकांसीं संवाद करितां व प्रश्न करून

त्यांचीं उत्तरें त्यांपासून ऐकून घेतां, असा तो त्यांस अढळला. त्याचीं प्रश्नोत्तरें ज्यानी ऐकिलीं त्या सर्वांनी आश्चर्य मानिलें. आणि आईने त्याला विचारिलें कीं, "हे मुला, त्वां आह्मासीं असें कां केलें? पाहा, म्या आणि तुझ्या बापाने खिन्न होऊन तुझा शोध केला." तेव्हां तो त्यांस बोलला कीं, "तुह्मी माझा शोध कां केला? माझ्या बापाचीं जीं त्यांत मला असावें लागतें हें तुह्मास ठाऊक नाहीं काय?" असें जें त्याने सांगितलें तें त्यांस समजलें नाहीं.

मग तो आईबापांबरोबर नाजोरेथगांवीं जाऊन त्यांपासीं राहिला. या सर्व गोष्टी त्याच्या आईने आपल्या मनांत ठेविल्या. आणि येशू ज्ञानांत व शरिरांत व देव आणि मनुष्यें यांच्या कृपेंत वाढता झाला.

अध्याय ७.

येशूचा बाप्तिस्मा.

पूर्वीं योहान्नाचा जन्म सांगितला तो रानांत वाढून मोठा झाला, तेव्हां त्यास देवाने आज्ञापिलें कीं, "तूं इस्राएल लोकांस उपदेश कर." ह्मणून तो यार्देन नदीजवळ जाऊन त्या लोकांस, "तुह्मी पश्चात्ताप करा, आकाशाचें राज्य जवळ आलें आहे," असा उपदेश करिता झाला. त्याचें वस्त्र उंटाच्या केसाचें, कंबरबंध कातड्याचा, आणि अन्न टोळ व रानमध असें होतें.

तेव्हां यरूशालेम व सर्व यहूदा व यार्देनेच्या आसपासचा देश, एथील लोकानी त्यापासीं जाऊन आपलीं पापें कबूल करून यार्देनेमध्यें त्यापासून बाप्तिस्मा घेतला. त्यां

लोकांपैकीं बहुतांस वाटलें कीं शास्त्रलेखांतला सांगितलेला तारणारा तो हाच असेल; असें समजून योहान्नाने त्यांस सांगितलें कीं, "पश्चात्तापासाठीं मी पाण्याने तुमचा बाप्तिस्मा करितों; परंतु माझ्या मागून जो येत आहे तो मजहून समर्थ आहे, त्याच्या वाहाणा देखील नेण्यास मी योग्य नाहीं; तो तुमचा पवित्र आत्म्याने आणि अग्नीने बाप्तिस्मा करील."

फारिशी व जादुकी यांतीलहि बहुत त्याकडे बाप्तिस्म्यासाठीं आले. फारिशी फार गर्विष्ट होते; ते आपणास पुण्यवान् मानून, इतरास पापी मानीत असत. जादुकी बोलत कीं मेलेल्यामधून उठणें होणार नाहीं; मेल्यावर कांहींच अनुभव नाहीं. ह्मणून त्यांतील बहुत जे बाप्तिस्म्यासाठीं आले त्यांस पाहून योहान्नाने विचारिलें कीं, "अहो सर्पांचे वंशजानो, होणार जो क्रोध त्यापासून पळावयास तुह्माला कोणीं सुचविलें? आतां तुमचा पश्चात्ताप खरा, तर योग्य रीतीने चाला. आब्राहाम जो पवित्र पुरुष, त्याचे वंशज आह्मी आहों ह्मणून आमचें तारण होईल असें समजूं नका."

आब्राहाम धार्मिक व विश्वासू व ईश्वराज्ञा पाळणारा असा होता. त्याच्या वंशांत जन्मास आल्यानेच पवित्रता मिळती असें नाहीं. प्रत्यक्ष आईबापें पवित्र असतां ह्मणून तरी मूल पवित्र असें कोणीं समजूं नये. प्रत्येक ज्या मनुष्याच्या मनांत खरा पश्चात्ताप व विश्वास होतात, तोच पवित्र. ह्मणून तुह्मी जर येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवीत नाहीं तर तारण पावणार नाहीं.

येशू तीस वर्षांचा होई तोंपर्यंत अप्रसिद्ध राहिला,

आणि मग योहान्नापासीं बाप्तिस्मा घेण्यास आला. त्याला येतांना पाहून जो मजहून अति श्रेष्ठ आणि पवित्र, त्याला बाप्तिस्मा द्यावयास माझी योग्यता नाहीं, असें समजून योहान्न बोलला कीं, "मलाच तुजपासून बाप्तिस्मा घेण्याचें अगत्य आहे, आणि तूं मजपासीं बाप्तिस्मा घ्यावयास येतोस काय?" येशू बोलला कीं, "आतां होऊं दे. असें सर्व धर्मनीति पूर्ण करणें आह्मास योग्य आहे." मग योहान्नाने त्यास बाप्तिस्मा दिल्हा. इतक्यांत त्यासाठीं आकाश उघडलें. आणि योहान्नाने आत्मा खबुत्रासारखा त्यावर येतां पाहिला. आणि "हा माझा प्रिय पुत्र, याविषयीं मी फार संतोषित आहें," असी आकाशवाणी ऐकिली. याप्रमाणें बापाने व पवित्र आत्मा याने, लोकांस, येशूकडून तारण होईल, याचा निश्चय व्हावा ह्मणून त्यावर मोर्त्तब केलें.

अध्याय ८.

सैतानाकडून येशूची परीक्षा.

येशूचा बाप्तिस्मा झाल्यावर सैतानाने त्याची परीक्षा घ्यावी ह्मणून पवित्र आत्मा याने तो रानांत नेला गेला. तेव्हां तो तेथें चाळीस अहोरात्रीं उपाशीं राहिला, मग त्याला भूक लागली. तेव्हां मोहक सैतान त्यापासीं येऊन बोलला कीं, "जर तूं देवाचा पुत्र आहेस तर ह्या दगडाच्या भाकरी व्हाव्या ह्मणून सांग." तेव्हां येशू बोलला, "असें लिहिलें आहे कीं, 'मनुष्य केवळ भाकरीनेच वांचेल असें नाहीं; परंतु प्रत्येक जो शब्द देवाच्या मुखांतून निघतो त्याने वांचेल.'"

यावरून सैतान किती मोहक होता पाहा! त्याने येशू चाळीस दिवसांचा उपाशीं असतां त्याला गांठून ईश्वराच्या चांगुलपणावरचा त्याचा जो विश्वास तो उडावा ह्मणून असा प्रयत्न केला. सैतान अद्यापि तसाच मोहणार आहे, आणि नीतीने जे चालणारे त्यांस तो विघ्न करितो; यासाठीं सर्वांनी ईश्वरी शास्त्राचा अभ्यास करून जसें येशूने शास्त्रावरून त्याला कुंठित केलें तसें सर्वांनी त्यास थकवावें.

हें माझें भाषण मान्य करून हा धोंड्याची भाकर करीत नाहीं असें समजून तो दुसऱ्या रीतीने त्याला मोहनी घालण्यासाठीं झटला. ती असी कीं त्याने येशूस घेऊन देवळाच्या उंच कंगोऱ्यावर नेऊन ठेविलें आणि सांगितलें कीं, "तूं देवाचा पुत्र आहेस तर आपणास खालीं टाक, कां कीं असें लिहिलें आहे कीं, 'तो तुजविषयीं आपल्या दूतांस आज्ञा करील, आणि त्वां आपला पाय धोंड्यावर कधीं न अपटावा, ह्मणून ते हातावर तुला धरतील." येशू बोलला, "अणखी हें लिहिलें आहे कीं, 'प्रभु जो तुझा देव त्याची परीक्षा तूं करूं नको.'"

असा सैतानाचा दुसरा उपाय व्यर्थ झाला; तथापि त्या दुष्टाने प्रयत्न सोडिला नाहीं; कारण त्याने त्यास उंच डोंगरावर नेऊन सर्व जगांतील राष्ट्रें तीं व त्यांचें वैभव तें दाखवून सांगितलें कीं, "तूं जर माझ्या पायां पडून भजन करसील, तर हें सर्व मी तुला देईन." तेव्हां येशू बोलला, "अरे सैताना, दूर हो, कां कीं, 'प्रभु जो तुझा देव त्याचें भजन कर, आणि केवळ त्याचीच सेवा कर, असें लिहिलें आहे.'"

तेव्हां सैतान त्याला सोडून गेला आणि दिव्य दुतांनी येऊन त्याची चाकरी केली.

येणेप्रमाणें त्याची परीक्षा होतांना त्याने जें दुःख भोगिलें तेणेंकरून तो परीक्षा होणाऱ्यांचें साह्य करायास शक्तिमान् आहे. तर "आह्मी दया पावावी, आणि सुकाळीक साह्यासाठीं कृपा मिळवावी ह्मणून आपण धैर्याने कृपेच्या सिंव्हासनाजवळ जावें."

अध्याय ९.

येशूने शिष्य निवडिले, व काना गांवांतील लग्न.

एका दिवशीं योहान्न आपल्या दोन शिष्यांसहित यार्देन नदीच्या तीरीं उभा होता. तो येशूला येतांना पाहून बोलला, "पहा! हें ईश्वराचें कोंकरूं." असें ऐकून ते दोघे शिष्य येशूच्या मागें चालले. त्यांस मागें येतां पाहून येशू बोलला, "तुह्मी काय शोधितां?" ते बोलले, "हे गुरू तूं कोठें राहतोस?" तो बोलला, "येऊन पहा." मग ते त्या दिवशीं त्याजवळ राहिले. यांतील एकाचें नाव योहान्न, व दुसऱ्याचें आंद्रेयास हे त्या दिवसापासून त्याचे शिष्य झाले. आंद्रेयास आपला भाऊ शिमोन याला शोधून बोलला, "आह्माला ख्रीस्त सांपडला आहे." मग त्याला घेऊन येशूकडे आणा. येशूने शिमोनास येतांना पाहून ह्मटलें कीं, "तूं शीमोन योनाचा पुत्र आहेस, तूं केफा ह्मटला जासील." याचा अर्थ पेत्रस आहे.

दुसऱ्या दिवशीं येशूला फिलिप्पस अढळल्यावर, तो त्याला ह्मणाला कीं, "माझ्या मागें ये." नंतर फिलिप्प-

साला नाथानेल भेटल्यावर तो त्याला बोलला, "ज्याविषयीं नेमशास्त्रांत भविष्यवाद्यांनी लिहिलें आहे, तो नाजारेथांतील येशू आह्मास सांपडला आहे." तेव्हां नाथानेल ह्मणाला, "नाजारेथांतून कांहीं चांगलें निघेल काय ?" फिलिप्पस बोलला, तूं येऊन पाहा. नंतर येशू नाथानेलाला आपल्याकडे येतां पाहून बोलला, "खरा इस्राएली आला, यांत कपट नाहीं." नाथानेल ह्मणाला, "मला तूं कोठून जाणतोस ?" येशू बोलला, "फिलिप्पसाने तुला बोलाविल्यापूर्वीं म्या तूं अंजिराच्या झाडाखालीं होतास तेव्हां तुला पाहिलें." यावरून असें दिसून येतें कीं लोकांचीं परोक्ष कृत्यें व त्यांच्या मनोवृत्ति, हें सर्व येशू जाणत होता. त्याचें ऐकून नाथानेल आश्चर्य करून बोलला, "हे स्वामी, तूं देवाचा पुत्र आहेस; तूं इस्राएलांचा राजा आहेस." येशू ह्मणाला, "म्या तुला अंजिराच्या झाडाखालीं पाहिलें, हें सांगितल्यामुळें विश्वास धरितोस कीं काय ? याहून मोठीं पाहासील."

पुढें तीन दिवसांनी गालीलांतील काना गांव एथें लग्न झालें; तेव्हां येशूची आई तेथें होती. त्या लग्नास येशू शिष्यांसुद्धां बोलाविला होता. त्याकाळीं तेथील द्राक्षारस संपला असतां, येशूची आई त्याला ह्मणाली कीं, "द्राक्षारस नाहीं." येशू बोलला, "हे स्त्री, तुजसीं मजसीं काय ? अझून माझी घटका आली नाहीं." मग ती तेथील चाकरांस ह्मणाली, "जें कांहीं तो तुह्मास सांगेल तें करा." तेथें पाण्याच्या साहा दगडी कुंड्या होत्या. चाकरांस येशू ह्मणाला, "या कुंड्या पाण्याने भरा." तेव्हां त्यांनी तोंडोतोंड भरल्या. मग येशूने त्यांस ह्मटलें

कीं, "आतां यांतून काढून जेवणकारभाऱ्यापासीं न्या." त्यांनीं नेलें तों द्राक्षरस होता. नंतर जेवणकारभाऱ्यानें चाखून पाहून नवऱ्यास ह्मटलें कीं, "इतर लोक द्राक्षारस पहिल्यानें चांगला, आणि शेवटीं वाईट असा वाढितात; परंतु त्वां शेवटपर्यंत चांगलाच ठेविला आहे." हा येशूच्या चमत्कारांचा प्रारंभ, त्यावरून त्याचें गौरव प्रगट झालें, आणि शिष्यांनीं विश्वास धरिला.

तेव्हांपासून येशू प्रसिद्ध होऊं लागला. त्याचें भाषण ऐकावयास आणि त्याचे चमत्कार पाहावयास बहुत लोक त्याला अनुसरले. त्यांपैकीं कोणी त्याजवर विश्वास ठेवून त्याचें वर्त्तमान प्रसिद्ध करण्याविषयीं तत्पर झाले. इतरांनीं कांहीं दिवस त्याचें अनुवर्त्तन करूनहि पुढें त्याविषयीं स्खलित झाल्यामुळें त्याला सोडिलें. जे अनेक लोक त्यामागून राहिले त्यांस एका समयीं त्यानें विचारिलें कीं, "तुह्मीहि मला सोडाल काय?" पेत्रस ह्मणाला, "हे प्रभू, आह्मी कोणाकडे जाऊं? सर्वकाळच्या जीवनाच्या गोष्टी तुझ्याजवळ आहेत, आणि तूं ख्रीस्त जिवंत देवाचा पुत्र आहेस असा आह्मीं विश्वास धरिला आहे आणि जाणिलें आहे." त्या प्रश्नाला असें उत्तर देणारा किती आशीर्वादित आहे पाहा! आणि आतां जो कोणी असा विश्वास धरील तोहि आशीर्वादित होईल.

अध्याय १०.

निकदेमस.

तेव्हां निकदेमस नामक फारिश्यांतील एक माणूस यहूद्यांचा अधिकारी होता, तो रात्रीं येशूजवळ आला

आणि त्याला बोलला, "हे राब्बी, तूं देवापासून आलेला उपदेशक आहेस, हें आह्मास ठाऊक आहे, कारण कीं हे जे चमत्कार तूं करितोस ते देव त्याबरोबर असल्यावांचून कोणाच्याने करवत नाहीं." येशू उत्तर देऊन त्याला बोलला, "मी तुला खचीत खचीत सांगतों, जर कोणी परतून न जन्मला, तर तो देवाचें राज्य पाहूं शकणार नाहीं." निकदेमस त्याला बोलतो, "माणूस ह्मातारा असतां जन्म कसें घेईल? तो आपल्या आईच्या पोटांत दुसऱ्याने शिरून जन्म घ्यावयास शक्तिमान् आहे कीं काय?" येशूने उत्तर दिल्हें कीं, "मी तुला खचीत खचीत सांगतों जर कोणी पाण्यापासून आणि आत्म्यापासून न जन्मला, तर तो देवाच्या राज्यांत जाऊं शकत नाहीं. जें देहापासून जन्मलें तो देह आहे, आणि जें आत्म्यापासून जन्मलें तो आत्मा आहे. तुह्मास परतून जन्मलें पाहिजे हें म्यां तुला सांगितलें ह्मणून नवल मानूं नको. वारा जिकडे इच्छितो तिकडे वाहतो, आणि तूं त्याचा शब्द ऐकतोस, परंतु कोठून येतो आणि कोठें जातो हें तुला कळत नाहीं; प्रत्येक जो आत्म्यापासून जन्मला तो तसाच आहे." निकदेमस उत्तर देऊन त्याला बोलला, "या गोष्टी कशा होतील?" येशू उत्तर देऊन त्याला बोलला, तूं इस्राएलांचा उपदेशक आहेस आणि या गोष्टी जाणत नाहींस कीं काय? मी तुला खचीत खचीत सांगतों कीं, जें आह्मास कळलें तें आह्मी बोलतों, आणि जें आह्मी पाहिलें त्याविषयीं साक्ष देतों परंतु तुह्मी आमची साक्ष घेत नाहीं. जर म्या पृथ्वीवरलीं जीं तीं

तुह्मास सांगितलीं आहेत आणि तुह्मी विश्वास धरीत नाहीं, तर आकाशावरलीं जीं तीं तुह्मास सांगितल्यास तुह्मी विश्वास कसा धराल? आणि आकाशांतून उतरलेला मनुष्याचा पुत्र जो आकाशांत असतो ह्यावांचून कोणी आकाशांत चढला नाहीं. आणि जसें मोश्यानें रानांत साप उंच केला, तसें मनुष्याच्या पुत्राला उंच केलें पाहिजे; यासाठीं कीं त्याजवर जो कोणी विश्वास ठेवितो त्याचा नाश न व्हावा, परंतु त्याला सर्वकाळचें जीवन व्हावें."

आह्मास सुबोध होण्याकरितां ही गोष्ट लिहिली होती. "कोणी परतून न जन्मला, तर तो देवाचें राज्य पाहूं शकणार नाहीं," तात्पर्य कीं, जर आमचा पापिष्ट स्वभाव पवित्र आत्म्यानें बदलिला नाहीं तर आह्मी ईश्वरापासीं जाऊं शकणार नाहीं असें आहे; ह्मणून तत्पर होऊन, "हे ईश्वरा आह्मास शुद्ध हृदय उत्पन्न कर, आणि यथास्थित आत्मा आह्मामध्यें नवाच कर," असी त्याची प्रार्थना करावी.

अध्याय ११.

शोमरोन स्त्री.

एका समयीं येशू यरूशलेम शहरीं गेला होता, आणि तेथून शोमरोन प्रांतांतून गालीलांत आपल्या घरीं जात असतां, शोमरोनांतील शक्कार नगरीं पोंचला. त्या नगराजवळ याकोबाची विहीर होती. येशू चालतांना भागून त्या विहिरीवर बसला आणि त्याचे शिष्य अन्न विकत घेण्यासाठीं नगरांत गेले तेव्हां एक शोमरोनी स्त्री पाणी काढायास तेथें आली. येशू तिला बोलला कीं, "मला पाणी प्यायास दे."

यहूदी व शोमरोन लोक परस्पर द्वेष्टे होते ह्मणून येशूने पाणी मागितल्यामुळें त्या स्त्रीने आश्चर्य करून ह्मटलें कीं, "मी शोमरोनी स्त्री असतां, तूं यहूदी असून मजजवळ प्यायास कसें मागतोस?"



येशू ह्मणाला, "देवाचें जें दान तें, आणि 'मला प्यायाला दे,' असें जो तुजसीं बोलतो तो कोण आहे, हें जर तुला कळलें असतें तर, त्वां त्यापासीं मागितलें असतें, आणि त्याने तुला जीवनाचें पाणी दिल्हें असतें." ती स्त्री ह्मणाली, "हे प्रभू, तुला पोहरा नाहीं, आणि विहीर खोल आहे, यास्तव तुझ्याजवळ तें जीवनाचें पाणी कोठून आहे? आमचा पूर्वज याकोब ज्याने ही विहीर आह्मास दिल्ही, आणि तो स्वतां व त्याचे पुत्र आणि त्याची गुरें इचें प्यालीं, त्यापेक्षां तूं मोठा आहेस कीं काय?"

येशू बोलला, "जो कोणी या पाण्यांतून पितो त्याला फिरून ताहान लागेल; परंतु जें पाणी मी देईन त्यांतून जो कोणी पितो, त्याला सर्वकाळपर्यंत ताहान लागणारच नाहीं. अणखी जें पाणी मी त्याला देईन तें त्यामध्यें सर्वकाळच्या जीवनासाठीं उपळत्या पाण्याची विहीर होईल."

आत्मीय गोष्टीविषयीं तो बोलत आहे हें तिला कळलें नाहीं; उलटें तिला वाटलें कीं या पाण्याविषयींच हा बोलत आहे. मग ती बोलली, "हे प्रभू, मला तहान न लागावी, आणि म्या पाणी काढण्यासाठीं एथें न यावें ह्मणून तें पाणी मला दे."

येशू ह्मणाला, "जा, आपल्या नवऱ्याला घेऊन ये." स्त्री ह्मणाली, "मला नवरा नाहीं." येशू ह्मणाला, "बरें बोललीस कीं, 'मला नवरा नाहीं;' कारण कीं तुला पांच नवरे झाले होते, आणि जो तुला आतां आहे तो तुझा नवरा नाहीं; हें त्वां खरें ह्मटलें."

माझ्या गुप्त गोष्टी याने जाणिल्या ह्मणून हा कोणी सामान्य माणूस नव्हे, असें तिने अनुमान केलें. त्या समयीं यहूदी व शोमरोन हे एकमेकांच्या धर्मास दोष देऊन आपल्या धर्माचें खरेपण स्थापण्यासाठीं भांडत; तर त्या वादाचा निवाडा करण्याविषयीं हा समर्थ आहे असें ती समजली, ह्मणून ह्मणाली, "हे प्रभू, तूं भविष्यवादी आहेस असें मला दिसतें. आमचे पूर्वज या डोंगरावर भजन करीत असत, परंतु, 'जेथें भजन केलें पाहिजे ती जागा यरूशालेम शहरांत आहे,' असें तुह्मी ह्मणतां."

येशू ह्मणाला, "हे स्त्री, मी जें सांगतों तें तूं खरें मान कीं असी वेळ येती, आणि आतां आहे कीं जींत खरे भजणारे आत्म्याने व सत्यतेने बापाला भजतील; कारण कीं देव आत्मा आहे, आणि जे त्याला भजतात त्यांनी आत्म्याने व सत्यतेने त्याला भजिलें पाहिजे."

स्त्री ह्मणाली, "मशीहा जो ख्रीस्त तो येत आहे, हें

मला ठाऊक आहे; तो आल्यावर आह्मास अवघीं सांगेल." येशू बोलला, "तोच मी तुजसीं बोलत आहें."

हें ऐकून तिने आपली घागर ठेविली, आणि नगरांत जाऊन ह्मटलें कीं, "या, जितकीं म्या केलीं तीं अवघीं ज्याने मला सांगितलीं, त्या माणसाला पाहा. तोच ख्रीस्त आहे कीं नाहीं ?" त्यावरून ते नगरांतून निघून त्याजवळ आले आणि त्याला त्यानी विनंती केली कीं, "तूं आह्मासंगतीं राहा." त्यावरून त्याने दोन दिवस राहून त्यांस शिकविलें त्याचें ऐकून बहुतानी विश्वास धरिला, आणि त्या स्त्रीला सांगितलें कीं, "आतांपासून तुझ्या बोलण्यावरून आह्मी विश्वास धरितों असें नाहीं, कारण कीं आह्मी स्वतां ऐकिलें, आणि ख्रीस्त जो जगाचा तारणारा तो निश्चयें हाच आहे हें आह्मास ठाऊक आहे."



अध्याय १२.

मासे सांपडण्याचा चमत्कार.

गालील प्रांतांतील गेन्नेसारेत सरोवराजवळच्या कापेर्णाहूम शहरांत राहून, आसपासच्या लोकांस येशू उपदेश

करीत होता; तेव्हां एका दिवशीं सरोवराच्या तीरीं जाऊन उपदेश करीत असतां, लोकांचा समुदाय येऊन त्यासीं खेटला. खेट झाल्यामुळें त्याने तारवांत जाऊन तेथून उपदेश केला. हें तारूं शीमोन पेत्रसाचें होतें. तेथें याकोब व योहान्न जे शीमोनाचे पातीदार त्यांचेंहि एक तारूं होतें. लोकांला उपदेश केल्यावर येशूने पेत्रसाला ह्मटलें कीं, "खोल पाण्यांत हांकारा, आणि धरण्यासाठीं आपलें जाळें खालीं सोडा." पेत्रस ह्मणाला, "आह्मी सारी रात्र श्रम करून कांहीं धरलें नाहीं; परंतु तुझ्या बोलण्यावरून जाळें खालीं सोडीन." तसें केल्यावर जाळ्यांत माश्यांचा इतका घोळका सांपडला कीं, जाळें तुटूं लागलें. तेव्हां त्याने दुसऱ्या जहाजांत पातीदार होते त्यांस खुणाविलें. ते आल्यावर सर्वांनी मिळून त्यांतील मासे दोहों तारवांत असे भरले कीं, तीं तारवें बुडूं लागलीं. हें पाहून शीमोन पेत्रस येशूच्या पायां पडून त्याला ह्मणाला कीं, "हे प्रभू, मजपासून जा; मी पापी माणूस आहें." कारण त्याला व त्याजवळच्या सर्वांस इतके मासे सांपडलेले पाहून विस्मयाने व्यापिलें तेव्हां येशू पेत्रसाला ह्मणाला, "भिऊं नको; आतांपासून तूं माणसांस धरसील." मग ते तारवें काठीं लावून अवघीं सोडून त्याच्या मागें गेले.

तो कापेर्णाहूमांत होता तोंपर्यंत त्याने सभेंत जाऊन लोकांस शिकविलें, त्यांनी त्याचें ऐकून आश्चर्य केलें, कारण कीं त्याने सामान्य शिकविणाऱ्यांसारिखें शिकविलें असें नाहीं; परंतु ज्याला अधिकार आहे त्यासारिखें शिकविलें, व अनेक चमत्कारहि केले; असे कीं ते पाहून

बहुत लोक त्याच्या मागून गेले. परंतु अरेरे! जरी इतके मोठे प्रत्यय पाहिले तरी त्यांपैकीं बहुतांनीं त्याचा विश्वास धरिला नाहीं, ह्मणून ज्यांत ते राहत असत त्या शहराविषयीं येशूने ह्मटलें कीं, "हे कापेर्णाहूमा, तुजमध्यें जे चमत्कार घडले ते जर सदोमांत घडले असते, तर तें सदोम आजपर्यंत राहिलें असतें. अणखी मी तुला सांगतों कीं, न्याय ठरण्याच्या दिवसीं तुजपेक्षां सदोमास सवघड पडेल." यावरून समजावें कीं येशू ख्रीस्ताकडून तारण होतें असें ज्याला ऐकण्याचा प्रसंग आहे, आणि तो जर त्यावर विश्वास ठेवीत नाहीं तर त्याला यापेक्षां अधिक दंड प्राप्त होईल.

अध्याय १३.

जकातदार जो मात्थी.

अणखी एकदां येशू कापेर्णाहूमांत गेला होता तेव्हां त्याने मात्थी नामक शिष्य निवडून घेतला. तो जकातदार; आणि नाक्यांवर बसून जकात घेतां येशूने पाहिला, तेव्हां त्यास ह्मटलें कीं, "मला अनुसर," तें ऐकतांच सर्व सोडून तो त्यामागून गेला. असें ज्या सर्वांना येशूवर पक्का विश्वास व प्रीति झाली, ते त्याच्या आज्ञेंत राहाण्याविषयीं निःसंशय बुचकळ्यांत पडणार नाहींत; आणि ह्मणतील कीं, "ज्या गोष्टी आह्माला लाभ होत्या त्याच ख्रीस्तासाठीं आह्मी हानि अशा मानितों."

नंतर मात्थीने मोठी जेवणावळ केली; तेव्हां आपले सोबती जकातदार व इतर बहुत लोक येशूची त्यांची भेट होण्यासाठीं जेवायास बोलाविले. निःसंशय त्याच्या

मनांत होतें कीं, आपल्यासारिखें या सर्वांनी त्याचें ऐकून त्यावर विश्वास धरावा. परंतु शास्त्री व फारिशी कुरकुर करून येशूच्या शिष्यांस ह्मणाले कीं, "तुह्मी नीच जे जकातदार व पापी यांच्या पंक्तीस बसून कां खातां व पितां?" हें ऐकून येशू बोलला, "निरोग्यास वैद्याचें अगत्य नाहीं खरें, परंतु दुखणेकऱ्यांस आहे." ह्मणजे काय? कीं जकातदार ज्यांला तुह्मी मोठे पापी मानितां, असल्यांलाच तारायासाठीं मी आलों; परंतु जे तुह्मी आपल्यास पुण्यवान मानणारे, आपल्याच पुण्याने मुक्त होऊं असें ह्मणतां त्या तुह्माला माझें अगत्य नाहीं. ज्यांस आपल्याविषयीं इतकें अज्ञान त्यांचें मूर्खपण किती, पाहा बरें! लोक कबूल असोत किंवा नसोत, परंतु सर्वांनी पाप केलें आहे, आणि ते देवाचें गौरव करीत चालले नाहींत.

अध्याय १४.

डोंगरावरील उपदेश.

एका समयीं येशूजवळ मोठा समुदाय ऐकायास आला, ह्मणून तो डोंगरावर जाऊन त्यास याप्रमाणें उपदेश करूं लागला कीं, जो दीन तो धन्य; आणि जे शोकी व नम्र, व ज्यांस परमार्थाची भूक व ताहान लागली आहे; व जे दयाळू व अंतःकरणांत शुद्ध व सर्वत्र मैत्री ठेवणारे व परमार्थामुळें लोकांपासून पीडा सोसणारे, ते धन्य आहेत. जे द्रव्यवान, मोठे श्रीमंत, जे मौज पाहणारे, जे कीर्त्तिवान ते धन्य ह्मणून लोकांला वाटतें; परंतु येशूने जो उपदेश केला तो अति वेगळा. पुढें येशू आपल्या शिष्यांस बोलला कीं, "तुह्मी पृथ्वीचें मीठ व जगाचा उजेड

असे आहां, नियमशास्त्र रद्द करावें ह्मणून मी आलों नाहीं; उलटें तें स्थापायास आलों. धर्म कसा करावा, आणि प्रार्थना व उपोषण कसें करावें, ह्मणजे तें लोकांत प्रसिद्धि होण्यासाठीं करूं नये, एकांतीं जेथें केवळ ईश्वरच पाहील तेथें करावें;" असें त्यांस शिकविलें.

"पृथ्वीवर आपल्यासाठीं संग्रह करूं नका; कारण कीं जेथें संग्रह तेथें मन गुंततें, कोणाच्यानेहि दोन धन्यांची चाकरी एककालीं करवत नाहीं. आपण काय खावें, काय प्यावें, काय पांघरावें, अस्यासाठीं तुह्मी चिंताक्रांत होऊं नका. जो आकाशांतील बाप तो तुह्माला जें पाहिजे तें पुरवील. पांखरांकडे पाहा, तीं पेरीत नाहींत, कापीत नाहींत, व कोठारांत भरून ठेवीत नाहींत, तरी त्यांला ईश्वर पाळितो. त्यांपेक्षां तुह्मी श्रेष्ठ आहां कीं नाहीं! आणि वस्त्राविषयीं तुह्मी कां चिंताक्रांत आहां? रानांतील फुलझाडांकडे लक्ष द्या. तीं कशीं वाढतात! तीं श्रम करीत नाहींत, आणि कांतीत नाहींत; तथापि मी तुह्मास सांगतों कीं, शलोमोनहि आपल्या संपूर्ण वैभवांत त्यांतील एकासारिखाहि शृंगारित नव्हता. यास्तव अहो अल्पविश्वास्यानो, रानांतील हिरवळ जी आज आहे, आणि उद्यां चुलींत टाकली जाणार, तिला जर देव असा पोषाख देतो, तर तुह्मास विशेषेंकरून देणार नाहीं काय? परंतु तुह्मी पहिल्याने देवाचें राज्य आणि त्याचें नीतिमत्व हीं शोधा, मग तींहि सर्व तुह्मास दिल्हीं जातील."

"तुह्मी निष्कारण कोणाला दोषी ठरवूं नका, आणि तुह्मी ईश्वराची खरीं लेंकरें आहां याचें लक्षण तुह्माजवळ आहे कीं नाहीं हें पाहा, आणि शेवटपर्यंत आकाशमार्गांत

चाला, व ईश्वरावर अधिक अधिक प्रीति ठेवा व त्याची प्रार्थना करा." अणखी त्यास धीर द्यावयास बोलला कीं, "जर पुत्राने आपल्या बापाजवळ भाकर मागितली तर त्यास तो धोंडा देईल, आणि मासा मागितला तर साप देईल, असा तुह्मामध्यें कोण माणूस आहे? यास्तव तुह्मी वाईट असतां आपल्या लेंकरांस चांगलीं देणीं द्यावयास इच्छितां, मग तुमच्या आकाशांतील बापाजवळ जे मागतात, त्यांस तो किती विशेषेंकरून चांगलीं देईल!" अणखी तो त्यांस बोलला कीं, "नरकाकडे जाणारा जो रुंद रस्ता, त्यांत तुह्मी चालूं नका, आणि खोट्या उपदेशकांचें ऐकूं नका, आणि धर्माविषयीं दांभिक होऊं नका." यावरून समजावें कीं, येशूचें वाक्य ऐकून घेणें, व तें पाठ करणें, हेंच केवळ उपयोगी नाहीं. त्याने सांगितल्याप्रमाणें आचरणच हितावह आहे. येशू बोलतो कीं, "यास्तव जो कोणी माझ्या या गोष्टी ऐकतो आणि त्याप्रमाणें आचरण करितो, त्याला मी शाहाण्या माणसाची उपमा देईन; त्याने आपलें घर खडकावर बांधिलें; मग पाऊस पडला, आणि पूर आले, वाराहि सुटला, आणि त्या घरास लागला, परंतु त्याचा पाया खडकावर घातला होता, यामुळें तें पडलें नाहीं. आणि जो कोणी माझ्या या गोष्टी ऐकतो आणि त्याप्रमाणें आचरण करीत नाहीं, त्याला मूर्ख माणसाची उपमा प्राप्त होईल. त्याने आपलें घर वाळूवर बांधिलें; मग पाऊस पडला आणि पूर आले, वाराहि सुटला, आणि त्या घरास लागला तेव्हां तें पडलें आणि त्याचें मोठें पतन झालें."

अध्याय १५.

येशू ख्रीस्ताचे चमत्कार. कुष्ट बरा केला.

येशू एका शहरांत असतां तेथें एक कोडी माणूस होता. त्याने येऊन त्यापुढें पालथा पडून त्यास विनंती केली कीं, "हे प्रभू, तुझी इच्छा असली तर मला बरें करण्यास शक्तिमान् आहेस." येशूने त्याला हस्तस्पर्श करून ह्मटलें, "माझी इच्छा आहे, तूं शुद्ध हो." इतक्यांत त्याचें कोड गेलें. तेव्हां येशूने त्याला निक्षून सांगितलें कीं, "कोणाला सांगूं नको, परंतु जा, आपणास याजकाला दाखीव; आणि त्यास प्रमाण व्हावें, ह्मणून मोशेने नेम लाविल्याप्रमाणें तुझ्या शुद्ध होण्याविषयीं अर्पण कर." तथापि तो निघून ती गोष्ट असी बहुत गाजवूं आणि चहुंकडे हाकाटूं लागला कीं येशूला प्रगटरूपें फिरून नगरामध्यें जाववलें नाहीं, परंतु तो रानांतल्या जाग्यांत राहिला; तेथेंहि चहुंकडून लोक समुदाय ऐकायास व रोगापासून निरोगी व्हावयास त्याजवळ आले.

बेथेज्दा ह्मटलेल्या तळ्याजवळचा एक दुखणेकरी माणूस.

एका सणाच्या दिवसीं येशू यरूशालेम शहरांत होता त्या शहराच्या मेंढ्‌ नामक वेशीजवळ बेथेज्दा ह्मणून तळें होतें. त्याला पांच मंडप होते. त्यांत अंधळे, पांगळे, लंगडे, लुले, यांचा मोठा समुदाय पाणी हालण्याची वाट पाहत पडला होता; कारण कीं वेळोवेळ दूत त्या तळ्याचें पाणीं हालवीत असे; यास्तव कोणताहि

रोगी जो प्रथम त्या पाण्यांत शिरे तो निरोगी होई. त्यांत अडतीस वर्षें दुखणाईत पडलेला कोणी माणूस होता. येशू त्याला पाहून तो फार वर्षें पचत पडला आहे असें जाणून ह्मणाला, "तूं निरोगी होण्यास इच्छितोस काय?" तो बोलला, "हे प्रभू, जेव्हां पाणी हालतें तेव्हां मला तळ्यांत नेण्यास माझा कोणी माणूस नाहीं ह्मणून मी जात आहें, इतक्यांत दुसरा माझ्यापुढें उतरतो." येशू ह्मणाला, "ऊठ, आपलें अंथरूण उचलून चाल." तेव्हांच तो माणूस निरोगी झाला, आणि आपलें अंथरूण उचलून चालला.

शतपतिचा चाकर बरा केला.

मग येशू कापेर्णाहूम नगरास जात होता. त्या नगरांत एक रोमी शतपती होता. त्याचा एक जो प्रिय चाकर तो मरायास टेंकला होता. त्या शतपतीने येशू वाटेने येत आहे असें ऐकून यहूद्यांच्या वडिलांस त्याकडे पाठवून त्यास विनंती केली कीं, "येऊन माझ्या चाकरावर कृपा करा." ते वडील येशूजवळ येऊन त्याला आग्रहाने विनंती करून बोलले कीं, "ज्यासाठीं हें करायाचें तो योग्य आहे; कारण कीं तो आमच्या राष्ट्रांवर प्रीति करितो; त्याने आह्मासाठीं सभा बांधली आहे." तेव्हां त्यांबरोबर येशू गेला.

तो घराजवळ आला तेव्हां शतपतीने आपले मित्रांस सामोरें पाठवून त्यास ह्मटलें कीं, "हे प्रभू, श्रम करूं नको; त्वां माझ्या छप्परांत खालीं यावें असा मी योग्य नाहीं; परंतु तूं शब्द बोल, ह्मणजे माझा चाकर निरोगी

होईल. कां कीं मी आज्ञांकित आहें, तरी शिपाई माझ्या स्वाधीन आहेत, आणि एकाला मी सांगतों, तूं जा, तेव्हां तो जातो; आणि दुसऱ्याला ‘ ये,’ तेव्हां तो येतो; आणि माझ्या चाकराला, ‘हें कर,’ तेव्हां तो करितो;” आणि येशूला ईश्वरी अधिकार आहे ह्मणून तो जें ह्मणेल तें होईल, असें त्याच्या मनांत होतें.

हें ऐकून येशूने आश्चर्य केलें, आणि मागें येणाऱ्यांस ह्मटलें कीं, “इस्राएलांतहि मला एवढा विश्वास सांपडला नाहीं.” मग तो त्या शतपतीला बोलला कीं, “तूं जा, त्वां जसा विश्वास केला तसें तुला होवो.” मग त्याने जे पाठविले होते त्यांनी घरांत जाऊन पाहिलें तों, तो चाकर निरोगी त्यांला मिळाला.

वादळ शांत केलें.

आणि येशू आपल्या शिष्यांसुद्धां तारवावर चढून त्यांस ह्मणाला कीं, “आपण या सरोवरच्या पलिकडे जाऊं.” तेव्हां ते निघाले, आणि हांकारून जात असतां,



येशू झोंपीं गेला. मग सरोवरावर वाऱ्याचें वादळ सुटलें; आणि तारवांत भरलें असतां ते संकटांत पडले. तेव्हां

ते येऊन त्याला जागें करून बोलले, "स्वामी, स्वामी, आह्मी नाश पावतों; आह्मास तार." तो ह्मणाला, "अहो अल्पविश्वासी, तुह्मी कां भयभीत आहां?" मग उठून त्यानें वारा व सरोवर यांस निषेध केला; तेव्हां मोठी शांति झाली. हें पाहून तीं माणसें आश्चर्य करून ह्मणालीं, "हा कसा आहे, कीं वारा व पाणी यांस देखील आज्ञा करितो, व तीं त्याला मानितात."

वातरोगी बरा केला.

पलिकडे गेल्यावर त्याला दोन वातरोगी माणूस भेटले. त्यांस शुद्ध करून तो माघारें कापेर्णाहूमांत आला. तो आला असें ऐकल्यावरून त्यापासीं इतके लोक मिळाले कीं दारापुढें देखील खुली जागा नव्हती. तेव्हां त्याने त्यांस देवाचें वाक्य सांगितलें. मग कोणी लोक चौघानीं उचललेला असा एक वातरोगी घेऊन तेथें आले, परंतु दाटीमुळें त्याजवळ जाणें होईना; ह्मणून जेथें येशू होता तेथील वरची छावणी त्यांनी काढली, आणि ती उस्तरल्यावर ज्या खाटेवर वातरोगी होता ती त्यांनी खालीं उतरली. त्याचा विश्वास पाहून येशू वातरोग्यास ह्मणाला, "हे लेंकरा, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे. ऊठ, आपली खाट उचलून आपल्या घरीं जा." तेव्हां तो लागलाच उठून आपली खाट उचलून सर्वांच्या समक्ष चालूं झाला. तेव्हां सर्व विस्मित झाले आणि देवाचें गौरव करून ह्मणाले कीं, "आह्मी असें कधीं पाहिलें नाहीं."

अध्याय १६.

चमत्कार (पुढें चालू.) नाईन शहरांतील एका विधवेचा पुत्र जिवंत केला.

एका समयीं येशू व त्याचे शिष्य बहुत लोकांसुद्धां नाईन शहरीं गेले. जातांना येशू वेशीजवळ गेला इतक्यांत आंतून एका विधवेचा पुत्र जो आपल्या आईचा एकुलता त्याचें प्रेत नेत होते. त्याबरोबर त्याची आई व इतर बहुत लोक होते. तिला पाहून येशूला करुणा येऊन त्याने सांगितलें, "रडूं नको." आणि जवळ येऊन तिरडीस स्पर्श केला. तेव्हां प्रेतवाहक उभे राहिले. मग येशू बोलला, "हे तरुणा, मी तुला सांगतों ऊठ."



तेव्हां तो मेलेला उठून बसला आणि बोलूं लागला. नंतर त्याने तो त्याच्या आईला दिल्हा. त्या काळीं सर्वांस भय झालें, आणि ते ईश्वराचें गौरव करून ह्मणाले, आह्मामध्यें मोठा भविष्यवादी उत्पन्न झाला आहे, आणि ईश्वराने आपल्या लोकांची भेट घेतली आहे.

याईरसाच्या कन्येला जिवंत करणें.

तेथें कांहीं दिवसानी यहूद्यांच्या सभेंतील एक याईरस नामक अधिकारी येशूजवळ येऊन, त्याला फार विनंती करून बोलला कीं, "माझ्या घरीं या, कारण माझी एकुलती बारा वर्षांची कन्या मरायास टेंकली आहे." तेव्हां तो त्याच्या घरीं जात असतां, मोठा समुदाय मागून येऊन त्याला खेटला. त्यांत एक स्त्री जिला बारा वर्षें रक्तस्राव होता, जिने वैद्यांपासून बहुत क्लेश सोसिले, आणि जवळ जें होतें तें सर्व खर्चिलें, तरी जिला कांहीं गुण आला नाहीं, दुखणें मात्र अधिक झालें, तिने त्या समुदायांत मागें येऊन त्याच्या वस्त्राला स्पर्श केला; कारण तिचा असा विश्वास होता कीं, त्याला स्पर्श केला ह्मणजे मी निरोगी होईन. तेणेंकरून त्याप्रमाणेंच झालें. तेव्हां येशू ह्मणाला, "माझ्या वस्त्रास कोणी स्पर्श केला?" त्याचे शिष्य ह्मणाले, "समुदाय तुला चेंगरतो, हें पाहातोस, आणि 'मला स्पर्श कोणी केला,' ह्मणून विचारितोस काय?" येशू ह्मणाला, "खचीत कोणी मला स्पर्श केला; कारण कीं माझ्यांतून सामर्थ्य निघालें." तेव्हां ती स्त्री, आपण केलेलें छपत नाहीं, असें समजून पुढें येऊन त्याच्या पायां पडली, आणि स्पर्श कशासाठीं केला, व तत्क्षणींच बरी कसी झाली, हें सर्व लोकांसमक्ष तिने त्याला सांगितलें. येशू ह्मणाला, "हे कन्ये, धैर्य धर, तुझ्या विश्वासाने तुला तारिलें; तूं सुखरूप जा."

तो बोलत आहे, इतक्यांत सभेच्या अधिकाऱ्याकडला कोणी येऊन त्याला बोलला कीं, "तुझी कन्या मेली; गुरूला श्रम देऊं नको." येशूने ऐकून त्याला असें सां-

गितलें कीं, "भिऊं नको; विश्वास मात्र धर, ह्मणजे ती वांचेल." मग त्याने घरीं जाऊन, पेत्रस व याकोब व योहान्न, आणि मुलीचा बाप व आई, यांशिवाय कोणाला आंत येऊं दिल्हें नाहीं. तेव्हां ते सर्व रडत, आणि तिच्यासाठीं बडवून घेत होते; परंतु तो बोलला, "रडूं नका; ती मेली नाहीं, पण झोंपेंत आहे." तेव्हां ती मेली आहे, असें जाणून ते त्याला हांसले. परंतु त्याने सर्वांस बाहेर काढिल्यावर तिचा हात धरून अशी हाक मारिली कीं, "मुली ऊठ." मग तिचा आत्मा फिरून आला, आणि ती तेव्हांच उठली.

अध्याय १७.

(चमत्कार पुढें चालू.) पांच भाकरींनी पांच हजारांला तृप्त केलें.

एका समयीं मोठा समुदाय त्याचा उपदेश ऐकायास जमला होता. ते लोक मेंढपाळाशिवाय मेंढी होतात, तसे झाले होते; ह्मणून त्याला त्याविषयीं करुणा आली, तेव्हां त्याने त्यांस उपदेश केला. सायंकाळ झाल्यावर त्याच्या शिष्यांनी सांगितलें कीं, "ही जागा ओसाड आहे, आणि वेळ आतां होऊन गेली आहे; समुदायानी गांवांत जाऊन आपल्याकरितां खाण्याचे पदार्थ विकत घ्यावे, ह्मणून त्यांस निरोप दे." परंतु येशू बोलला, "त्यांस जावयाची गरज नाहीं. तुह्मी त्यांस खायाला द्या." तेव्हां ते त्याला ह्मणतात, "पांच भाकरी व दोन मासे यांवाचून आह्माजवळ एथें कांहीं नाहीं." तेव्हां तो बोलला, "तीं एथें माझ्याजवळ आणा." मग त्याने समुदायास गवतावर बसायाची आज्ञा दिल्ही; आणि त्या

पांच भाकरी व दोन मासे घेऊन, त्याने वरतें आकाशाकडे पाहून स्तुति केली; नंतर भाकरी मोडून शिष्यांस दिल्ह्या, आणि शिष्यांनी समुदायांस दिल्ह्या; मग खाऊन ते सर्व तृप्त झाले. नंतर उरलेल्या चुराच्या भरलेल्या बारा टोपल्या त्यांनी उचलिल्या. आणि बायका व लेंकरें यांशिवाय ज्यांनी खाल्लें ते सुमारें पांच हजार पुरुष होते.

पायांनी पाण्यावर चालणें.

सरोवराच्या पलिकडे जायास येशूचे शिष्य तारवावर चढले, व येशू मागें राहून प्रार्थना करायास डोंगरावर चढला, तेव्हां अस्तमान समय होता. परंतु त्या काळीं तारूं अर्ध्या सरोवरांत गेलें असतां लाटांनी डळमळलें, कारण कीं वारा तोंडचा होता. मग रात्रीच्या चवथ्या प्रहरीं येशू पाण्यावर चालून त्यांजवळ गेला. तेव्हां शिष्य त्याला पाण्यावर चालतां पाहून घाबरे होऊन ह्मणाले, "भूत आहे!" आणि ते भयामुळें ओरडले. परंतु तेव्हांच येशू त्यांस बोलला कीं, "धीर धरा, मी आहें, भिऊं नका." तेव्हां पेत्रस त्याला उत्तर देऊन बोलला, "हे प्रभू, जर तूं आहेस तर पाण्यावरून तुझ्याजवळ यावयास मला आज्ञा दे." मग तो बोलला, "ये." तेव्हां पेत्रस येशूजवळ जावयास तारवावरून उतरून पाण्यावर चालला. परंतु वारा बळकट असें पाहून तो भ्याला, आणि बुडूं लागला असतां ओरडत बोलला कीं, "हे प्रभू, मला तार." मग येशूने तेव्हांच हात लांब करून त्याला धरिलें, आणि ह्मटलें, "हे अल्पविश्वासी, त्वां संशय कां धरिला?" मग ते तारवावर चढल्यानंतर वारा शमला.

तेव्हां जे तारवांत होते ते येऊन त्याचें भजन करून बोलले कीं, "निश्चयें तूं देवाचा पुत्र आहेस."

दाहा कोडी बरे केले.

येशू एका गांवास जात असतां, वाटेने दूर उभे राहिलेले दाहा कोडी माणूस त्याला अढळले, तेव्हां ते मोठ्याने बोलले, "हे येशू स्वामी, आह्मावर दया कर." तो बोलला, "जाऊन आपणास उपाध्याला दाखवा," कारण कीं उपाध्याच्या हुकमावांचून त्यांला शुद्ध ह्मणून लोक आपणांत घेईनात. ते उपाध्याकडे जात असतां शुद्ध झाले. त्यांपैकीं एकाने आपण बरा झालों असें पाहून, मागें फिरून देवाची स्तुति केली; आणि येशूच्या पायां



पडून त्याचा उपकार मानिला. तो शोमरोनी होता. येशू ह्मणाला, "दाहा शुद्ध झाले नाहींत काय? तर ते नऊ कोठे? या परक्यावांचून देवाची स्तुति करायास परतले, असे कोणी नाहींत काय?" मग त्याला बोलला, "तूं उठून जा; तुझ्या विश्वासाने तुला तारिलें आहे.

बार्तिमी जो अंध त्याला डोळे दिल्हे.

एका वेळेस यरीहो नगरापासून येशू व त्याचे शिष्य व मोठा समुदाय जात असतां, तिमी याचा पुत्र बार्त्तिमी जो अंधळा, तो वाटेंत भिक्षा मागत बसला होता. त्याने गलबा ऐकून विचारिलें कीं, "काय आहे?" लोक ह्मणाले, "नाजारेथकर येशू जात आहे." हें ऐकून तो ओरडून बोलला, "हे दाविदाच्या पुत्रा येशू, तूं मजवर दया कर." तेव्हां त्याला बहुतांनी धमकाविलें, परंतु तो फारच अधिक ओरडला, "हे दावीदाच्या पुत्रा, तूं मजवर दया कर." मग येशूने उभें राहून त्याला अलिकडे बोलवावयास सांगितलें. ते अंधळ्याला हाक मारून ह्मणाले, "धीर धर, ऊठ, तो तुला बोलावितो." तेव्हां तो आपलें वस्त्र टाकून जवळ आला. येशूने त्याला विचारिलें, "मी तुझ्यासाठीं काय करावें, ह्मणून इच्छितोस?" तो ह्मणाला, "हे प्रभू, मला दिसावें." तेव्हां येशू दया करून बोलला, "जा, तुझ्या विश्वासाने तुला तारिलें आहे." तेव्हांच त्याला दिसूं लागलें; आणि तो वाटेने ईश्वराची स्तुति करीत, येशूच्या मागें चालता झाला. हें पाहून सर्व लोकांनीं ईश्वराची स्तुति केली.

सदर्हु सांगितल्याप्रमाणें त्याने अनेक चमत्कार केले. अंधळ्यांस डोळे दिल्हे; बहिऱ्यांस कान दिल्हे; मुक्यांस बोलविले; लंगड्यांस पाय दिल्हे; कोडी शुद्ध केले; मेलेले जिवंत केले; भुतें घालविलीं इत्यादि सर्व सांगण्यास अवकाश नाहीं. परंतु त्याचा पराक्रम व कृपाळूपणा समजावयास सांगितलें, इतकें पुरें; तो सर्वदां सारखाच आहे. पराक्रम दया इत्यादि सुगुण त्याच्या ठाईं निरंतर राहतात;

आणि जरी तो आकाशांत चढून गेला, तरी आह्मास तारायास समर्थ आहे.

अध्याय १८.

बारा प्रेषित, व सत्तर शिष्य यांस पाठविणें.

गर्विष्ठ फारिशी यानीं पवित्र व दयाळू जो येशू यास द्वेषिलें व निंदिलें. इतर लोकानीं त्याचें आनंदाने ऐकिलें, व बहुत त्यास अनुसरले. त्यांस पाहून येशूला फार दया आली, कारण ते लोक तर राखणदारावांचून जशीं मेंढरें तसे होते. तेव्हां आपल्या शिष्यांस तो ह्मणाला, "पीक फार आहे, परंतु कामकरी थोडे; यास्तव तुह्मी पिकाच्या धन्याची प्रार्थना करा कीं, त्याने आपल्या पिकांत कामकरी लावावे.

त्या समयीं येशूजवळ बारा शिष्य होते त्यांचीं नांवें.

शीमोन जो पेत्रस ह्मटलेला, तो, आणि त्याचा भाऊ आंद्रेयास, जेबेदीचा पुत्र जो याकोब, तो, आणि त्याचा भाऊ योहान्न; फिलिप्पस, आणि बार्थलमी, थोमा, आणि मात्थी जो जकातदार, तो, अलफीचा पुत्र जो याकोब, तो, आणि लेब्बी, ज्याचें आडनांव थाद्दी तो, शीमोन जो कनानी तो, आणि यहूदा जो ईस्कारीयोतेस ज्याने त्याला परस्वाधीनहि केलें, तो.

आणि त्याने आपल्या बारा शिष्यांस एकत्र बोलावून त्यांस सर्व भुतांवर अधिकार, आणि रोग बरे करण्याची शक्ति दिल्ही. तेव्हां त्याने त्यांस देवाचें राज्य गाजवावयास, आणि दुखणेकऱ्यांस बरे करावयासाठीं पाठविलें; आणि त्याने त्यांस सांगितलें, "तुह्मी वाटेसाठीं कांहीं घेऊं

नका; काठ्या व पडशी व भाकर व रुपेंहि नका; आणि एकएकाला दोन अंगरखे नसावे; आणि ज्या ज्या घरांत तुह्मी जातां, तेथें राहा; आणि तेथून निघा; आणि जितके तुह्मास अंगीकारीत नाहींत, तुह्मी त्या नगरांतून जातांना त्यांविषयीं साक्ष व्हावी ह्मणून आपल्या पायांची धूळ झाडून टाका." तेव्हां ते निघून सुवर्त्तमान सांगत, आणि सर्व ठिकाणीं निरोगी करीत, गांवोगांवीं गेले.

त्यानंतर प्रभु येशूने अणखी सत्तर जणहि नेमून, प्रत्येक नगर व ठिकाण जेथें आपण जाणार होता, तेथें त्यांस दोघे दोघे असें आपल्यापुढें पाठविलें. आणि जसा बारा जणांस जे रोगी ते निरोगी करावयास, व भुतें घालवावयास अधिकार दिल्हा तसा यांलाहि दिल्हा. आणि त्यांस वागणुकीविषयींहि तसाच नियम शिकविला, आणि सांगितलें कीं, "जो तुमचें ऐकतो, तो माझें ऐकतो; आणि जो तुह्माला अव्हेरितो, तो मला अव्हेरितो; आणि जो मला अव्हेरितो, तो माझ्या पाठविणाऱ्यालाहि अव्हेरितो."

मग ते सत्तर जण कांहीं दिवस त्याप्रमाणें काम करून आनंदाने माघारें येऊन बोलले, "हे प्रभू, भुतें देखील आमच्या स्वाधीन आहेत." येशू ह्मणाला, "भुतें तुमच्या स्वाधीन आहेत ह्मणून आनंद करावा असें नाहीं; यापेक्षां आकाशांत तुमचीं नांवें लिहिलीं आहेत, यामुळें आनंद करावा."

अणखी येशू बोलला, "हे बापा, आकाशाच्या आणि पृथ्वीच्या प्रभू, मी तुझी स्तुति करितों, कारण कीं त्वां ज्ञानी व बुद्धिमान् यांपासून या गोष्टी लपवून बाळकांस प्रगट केल्या आहेत. होय बापा, कां कीं असेंच तुला

योग्य वाटलें. माझ्या बापाने अवघीं मला सोपिलीं आहेत; आणि पुत्र कोण आहे हें बापाखेरीज कोणाला ठाऊक नाहीं; आणि बाप कोण आहे हें पुत्राखेरीज, आणि ज्याला प्रगट करावयास पुत्राची इच्छा असेल त्याखेरीज कोणाला ठाऊक नाहीं.

मग शिष्यांकडे मुरडून तो त्यांस बोलला, "जीं तुह्मी पाहातां तीं जे डोळे पाहातात ते धन्य; कां कीं मी तुह्मास सांगतों कीं, जीं तुह्मी पाहातां तीं बहुत भविष्यवाद्यांनी आणि राजांनी पाहावयास इच्छिलीं परंतु पाहिलीं नाहीत, आणि जीं तुह्मी ऐकतां तीं ऐकावयास इच्छिलीं परंतु ऐकिलीं नाहींत.

नंतर सर्व लोकांस बोलला कीं, "अहो कष्टकरी आणि ओझ्याने लादलेले, तुह्मी सर्व माझ्याजवळ या, ह्मणजे मी तुह्माला विसांवा देईन, तुह्मी आपल्यावर माझें जूं घ्या, आणि मजपासीं शिका, कां कीं मी अंतःकरणांत नम्र व लीन आहें; आणि तुह्मी आपल्या जिवास शांति पावाल. कां कीं माझें जूं सोईचें, आणि माझें ओझें हलकें आहे."

अध्याय १९.

पश्चातापी पापीण स्त्री, व खनानी स्त्री.

दोन गोष्टी ऐका; पैकीं एक मोठी प्रीति दाखविती, व दुसरी मोठा विश्वास दाखविती.

शीमोन नामक जो फारिशी त्याने येशूस आपल्या घरीं जेवावयास बोलाविलें होतें. तेव्हां त्या नगरांत एक स्त्री जी पापीण होती, ती, तो फारिश्याच्या घरांत जेवितो, हें जाणून सुगंध तेलाची आलाबास्त्र कुपी घेऊन

आली. आणि ती मागें त्याच्या पायांजवळ उभी राहून रडत होती; आणि त्याचे पाय अश्रूंनी भिजवूं लागली. नंतर तिने आपल्या डोक्याच्या केसांनी पुसिले, आणि त्याच्या पायाचें चुंबन घेतलें, आणि सुगंध तेल लाविलें. तेव्हां ज्या फारिश्याने त्याला बोलाविलें, त्याने पाहून आपल्या मनांत ह्मटलें कीं, "हा जर भविष्यवादी असता तर, जी त्याला स्पर्श करिती, ती कोण आणि कसी स्त्री, हें त्याला कळलें असतें; कां कीं ती पापीण आहे."

तेव्हां येशू बोलला, "हे शीमोना, तुजसीं मला कांहीं बोलायाचें आहे." तो ह्मणाला, "हे गुरू, बोल." येशू बोलला, "एका सावकाराचे दोन देणेदार होते. एकाला पांचशें पावले देणें होते; आणि दुसऱ्याला पन्नास. परंतु फेडावयास त्यांजवळ कांहीं नव्हतें, ह्मणून त्याने कृपा करून दोघांस सूट दिल्ही. तर त्यांतून कोणता त्यावर अधिक प्रीति करील ? हें सांग." तेव्हां शीमोन बोलला, "ज्याला अधिक सोडिलें तो, असें मला वाटतें." मग तो त्याला बोलला, 'ठीक ठरविलेंस." आणि तो त्या स्त्रीकडे मुरडून शीमोनाला बोलला, "या स्त्रीला तूं पाहतोस काय ? मी तुझ्या घरांत आलों, त्वां माझ्या पायांसाठीं पाणी दिल्हें नाहीं; परंतु तिने अश्रूंनी माझे पाय भिजविले, आणि आपल्या डोक्याच्या केसानी पुसिले. त्वां माझें चुंबन घेतलें नाहीं, परंतु मी आंत आल्यापासून ती माझ्या पायांचें चुंबन घेतां राहिली नाहीं. त्वां माझ्या डोक्याला तेल लाविलें नाहीं, परंतु तिने सुगंध तेल माझ्या पायास लाविलें आहे. या कारणास्तव मी तुला सांगतों तिचीं जीं बहुत पापें तीं सोडिलीं आहेत; कां कीं तिने

फार प्रीति केली. परंतु ज्याचीं थोडकीं सोडलीं तो थोडीच प्रीति करितो. मग तो तिला बोलला, "तुझीं पापें सोडलीं आहेत." मग जेवायास संगतीं बसणारे आपणामध्यें विचार करूं लागले, "जो पापेंहि सोडितो, तो हा कोण आहे ?" अणखी तो स्त्रीला बोलला, "तुझ्या विश्वासानें तुला तारिलें आहे; तूं सुखरूप जा."

एका समयीं येशू विसांवा घेण्यासाठीं, जोर व जीदोन यांच्या प्रांतांत गेला होता; परंतु तेथेंहि त्याला एकांत वास घडेना. त्या प्रांतांतून एक खनानी स्त्री येऊन त्याला ओरडत बोलली, "हे प्रभू, दावीदाच्या पुत्रा, मजवर दया कर. माझी कन्या भुतानें भारी पीडिली आहे." परंतु त्यानें तिला कांहीं उत्तर दिल्हें नाहीं. तेव्हां त्याच्या शिष्यांनीं जवळ येऊन त्याला विनंती केली कीं, "ती आमच्या मागें ओरडत आहे, यास्तव तिला निरोप दे." मग तो बोलला, "मी इस्राएलाच्या घराण्यांच्या हरपलेल्या मेंढरांकडे पाठविलेला आहें, दुसऱ्यांकडे नाहीं." तेव्हां ती येऊन पायां पडून बोलली, "हे प्रभू, माझें सहाय कर." परंतु तो बोलला, "लेंकरांची भाकर घेऊन कुत्र्यांस घालणें, हें ठीक नाहीं." मग तिनें ह्मटलें, "होय प्रभू, तथापि कुत्रींहि आपल्या धन्याच्या मेजावरून जो चूर पडतो, त्यांतून खातात." तेव्हां येशू बोलला, "हे स्त्रिये, तुझा विश्वास मोठा; जसें तूं इच्छितीस तसें तुला होवो." आणि त्याच घटकेपासून तिची कन्या बरी झाली.

अध्याय २०.

योहान्न जो बाप्तिस्मा करणारा त्याचें मरण.

येशूचें काम पूर्ण होत चाललें इतक्यांत योहान्नाचें समाप्तीस जात होतें. तो येशू ख्रीस्ताची वाट काढण्याविषयीं वाटाड्या झाला होता. येशू जगाचा तारणारा आणि देवाचें कोंकरूं, जो सर्वांच्या पापांचें हरण करणारा, त्याच्या अशा उत्कर्षाविषयीं तो हर्षित झाला होता. तो आपल्या मित्रांला ह्मणाला कीं, "तुह्मी माझी साक्ष देतां कीं, म्या ह्मटलें मी ख्रीस्त नव्हे; परंतु त्याच्यापुढें पाठविलेला आहें. ज्याला नवरी आहे तो नवरा आहे, आणि नवऱ्याचा मित्र जो उभा राहून त्याचें ऐकतो तो नवऱ्याच्या शब्दावरून फार आनंदतो, यास्तव हा माझा आनंद पूर्ण झाला आहे. त्याला थोर होत जावें लागतें परंतु मला लाहान होत जावें लागतें."

मग कांहीं दिवसानीं योहान्नाला धर्मामुळें आपला जीव द्यावा लागला. हेरोद राजानें आपला भाऊ जो फिलिप्पस, त्याची बायको जी हेरोदीयास ती अयोग्य रीतीनें आपल्याजवळ ठेविली होती; ह्मणून योहान्नानें त्याचा निषेध केला. परंतु राजा त्याचें सर्व वचन मान्य करीत असतांहि, या निषेधाविषयीं अमान्य झाला, आणि हेरोदीयास इनें योहान्नाला बंदांत टाकविलें. पुढें राजाचा वाढदिवस आला. त्या दिवशीं हेरोदीयास इच्या कन्येनें नाच करून राजाला संतुष्ट केलें, ह्मणून तो शपथपूर्वक बोलला कीं, "तुला पाहिजे तें माग; तें अर्ध्या राज्याएवढें असलें, तरी देईन." तेव्हां तिनें आईस विचारिलें कीं, "काय मागूं?" तिनें सांगितलें,

"योहान्नाचें शिर कापून ताटांत घालून द्यावें असें माग." त्याप्रमाणें तिने मागितलें तेव्हां राजा खिन्न झाला; परंतु आपलें वचन सत्य करण्यासाठीं त्याने चाकराच्या हाताने तिच्या इच्छेप्रमाणें त्याचें शिर तिला दिल्हें. तेव्हां योहान्नाच्या शिष्यानी त्याचें धड राजापासून मागून घेऊन पुरिलें, आणि हें सर्व वर्त्तमान जाऊन येशू ख्रीस्ताला सांगितलें.

याबरून एक समजावें कीं, अविवेकाने कोणालाहि वचन देऊं नये. दुसरें असें कीं, आनंदाने सुवर्त्तमानाचें श्रवण करणें हें पुरत नाहीं, त्याप्रमाणें आचरणच केलें पाहिजे. तिसरें कीं, ख्यालखुशालींत व्यर्थ माणसांचा संग धरूं नये, कारण तेणेंकडून सात्विक मन असलें तरीहि बिघडतें.

अध्याय २१.

येशूने सांगितलेले दाखले.

येशू वारंवार दाखल्यानीं बोले आणि एकांतीं आपल्या शिष्यांस त्यांचा अर्थ स्पष्ट करून दाखवी, त्यापैकीं कांहीं सांगतों.

पेरणाऱ्याचा दाखला.

येशू बोलला "पाहा, कोणी पेरणारा पेरावयास निघाला. आणि तो पेरीत असतां कांहीं बीजें मार्गावर पडलीं, आणि पाखरानीं येऊन तीं खाऊन टाकिलीं; आणि कांहीं खडकाळीवर जेथें त्यांस बहुत माती नव्हती तेथें पडलीं. आणि त्यांस माती खोल नव्हती, ह्मणून तीं लवकर रुजलीं, परंतु सूर्य उगवल्यानंतर तीं करपलीं;

आणि त्यास मूळ नव्हतें यास्तव वाळून गेलीं. आणि दुसरीं कांट्यांच्या झाडांमध्यें पडलीं; मग कांट्यांच्या झाडानी वाढून त्यांस गुदमारिलें. परंतु कांहीं चांगल्या



भूमीवर पडलीं, आणि त्यांमधून कोणी शंभरपट, आणि कोणी साठपट, आणि कोणी तीसपट, असें फळ दिल्हें. ज्याला ऐकावयास कान आहेत त्यानें ऐकावें."

तेव्हां त्याच्या शिष्यानी त्याला विचारिलें कीं, "हा दाखला काय असेल?" मग तो बोलला, "हा दाखला असा आहे कीं, तें बीज देवाची गोष्ट आहे; आणि जें वाटेवरील तें हे आहेत कीं, ऐकतात, नंतर सैतान येऊन ती गोष्ट त्यांच्या हृदयांतून हृत करितो, यासाठीं कीं त्यानी विश्वास धरून तारण पावूं नये. आणि जें खडकाळीवर तें हे आहेत कीं, जेव्हां गोष्ट ऐकतात तेव्हां आनंदानें घेतात. परंतु त्यांस मूळ नसतां कांहीं वेळापर्यंत विश्वास धरितात, आणि परीक्षेच्या वेळेस फितून जातात, आणि जें कांट्यांच्या झाडांमध्यें पडलें, तें हे

आहेत कीं, ऐकतात, मग जाऊन चिंता व धन व जगांतील सुखें, यांकडून गुदमारिले जातात, आणि पूर्ण फळ देत नाहींत. परंतु चांगल्या भूमीमध्यें जें तें हे आहेत कीं, चांगल्या आणि शुद्ध हृदयांत गोष्ट ऐकून ठेवितात; मग धीरानें फळ देत जातात.

चांगलें फळ देणें ह्मणजे येशूनें ज्या गोष्टी सांगितल्या त्यांवरून मन शुद्ध होऊन त्यांप्रमाणें वागणूक करणें.

निदणाचा दाखला.

अणखी येशू बोलला कीं, "माणसानें आपल्या शेतांत चांगलें बीज पेरिलें, परंतु माणसें निजलीं होतीं, तेव्हां त्याचा वैरी आला आणि गव्हांमध्यें निदण पेरून गेला, मग जेव्हां पाला फुटला आणि त्याला फळ आलें, तेव्हां निदणहि दिसलें. तेव्हां घरधन्याच्या चाकरानीं येऊन त्याला ह्मटलें, हे धन्या, त्वां आपल्या शेतामध्यें चांगलें बीज पेरिलें कीं नाहीं? त्यांत तर निदण कोठून झालें?" तेव्हां तो त्यांस बोलला, 'कोणी वैऱ्यानें हें केलें आहे.' मग चाकरानीं त्याला ह्मटलें, 'तर आह्मी जाऊन तें जमा करावें, असी आपली इच्छा आहे कीं काय?' तेव्हां तो बोलला, 'नको.' तुह्मी निदण जमा करितांना कदाचित् त्याबरोबर गहूंहि उपटाल. कापणीपर्यंत दोन्ही बरोबर वाढूं द्या. मग कापणीच्या समयीं मी कापणारांस सांगेन कीं, तुह्मी पहिल्यानें निदण जमा करा आणि तें जाळण्यासाठीं त्याच्या पेंढ्या बांधा मग गहूं माझ्या कोठारांत ठेवा."

नंतर त्याचे शिष्य त्याला बोलले, "निदणाचा दाखला आह्मास फोडून सांग." तेव्हां तो बोलला, "जो

चांगलें बीज पेरणारा तो मनुष्याचा पुत्र आहे. आणि शेत तें जग आहे. आणि चांगलें बीज तें राज्यांतील पुत्र आहेत. आणि निदण तें त्या दुष्टाचे पुत्र आहेत. आणि ज्या वैऱ्याने तें पेरिलें तो सैतान आहे. आणि कापणी ती जगाची समाप्ति आहे. आणि कापणारे ते दिव्य दूत आहेत. तर जसें निदण जमा केलें जातें, आणि अग्नींत जाळलें जातें, तसें या जगाच्या समाप्तीस होईल. मनुष्याचा पुत्र आपल्या दूतांस पाठवील, आणि सर्व अडखळणाऱ्यांस, आणि अनियम करणाऱ्यांस, ते त्याच्या राज्यांतून जमा करितील, आणि त्यांस अग्नीच्या भट्टींत टाकितील; तेथें रडणें व दांत खाणें होईल. तेव्हां जे नीतिमान्, ते आपल्या बापाच्या राज्यांत सूर्यासारिखे प्रकाशतील. ज्याला ऐकावयास कान आहेत त्याने ऐकावें."

अध्याय २२.

दाखले पुढें चालू. मोहरीचें बीं, खमीर, शेतांत लपविलेलें धन, व फार मोलाचें मोती.

अणखी त्याने दाखला दिल्हा कीं, "आकाशाचें राज्य मोहरीच्या बीजासारिखें आहे. तें बीज माणसाने घेऊन आपल्या शेतांत पेरिलें. तें सर्व बीजांपेक्षां बारीक आहे परंतु जेव्हां वाढतें तेव्हां सर्व भाज्यांमध्यें मोठें आहे; आणि असें झाड होतें कीं, आकाशांतील पांखरें येऊन त्याच्या फांद्यांवर वस्तीस राहातात."

या दाखल्याचा अर्थ असा कीं, येशूचें राज्य प्रथम लोक दृष्टीने अगदीं लाहान व नीच, परंतु "पाणी समु-

द्राचा व्यास जसें झांकितें, तसी पृथ्वी ईश्वराच्या ज्ञानानें असें तें वाढेल."

दुसरा दाखला बोलला कीं, "बायकोनें खमीर घेऊन तीन मापें पिठामध्यें सगळें फुगे तोंपर्यंत गुप्त ठेविलें, त्यासारिखें आकाशाचें राज्य आहे." यावरून ख्रिस्ती धर्माची वृद्धि दाखविली आहे; पहिल्यानें जरी दृष्टीस फार येत नाहीं, तरी तो वाढत वाढत सर्वत्र खचित पसरेल.

अभंग.

आकाश राज्याचें बीज भूमीवर ॥
उतरलें फार सूक्ष्म रूपें ॥१॥
त्यापासून वृक्ष होईल प्रबळ ॥
मग बहु फळ देईल तो ॥२॥
जरी त्याचें बीज गुप्तरूपें आहे ॥
तरी त्याची पाहे प्रबळता ॥३॥
त्याची कार्य सिद्धि होतां अगमन ॥
त्याचें सर्व जन जाणतील ॥४॥

हे दोन दाखले लोकांमध्यें ख्रिस्ती धर्माची वृद्धि दाखवितात असें केवळ नव्हे; ज्यानें तो स्वीकारिला त्याच्या मनांत तो प्रथम सूर्योदय होऊन जगांतल्या सूर्याचा प्रकाश मध्यान्हीं परिपूर्ण होतो, तसा त्या धर्मसूर्याचा प्रकाश हळु हळु कांहीं काळानें पूर्णतेस जातो, हेंहि दाखवितात.

अणखी आकाशाचें राज्य शेतांत लपविलेल्या धनासारिखें आहे. तें कोणी माणसाला सांपडलें तर तो गुप्त ठेवितो, मग त्या गोष्टीच्या आनंदामुळें तो जाऊन आपलें

जितकें आहे तितकें तो विकितो; नंतर तें शेत विकत घेतो.

अणखी व्यापारी मनुष्य चांगल्या मोत्याचा शोध करितो, त्यासारिखें आकाशाचें राज्य आहे. त्याला एका फार मोलाच्या मोत्याचा शोध लागल्यावर, आपलें जितकें होतें तितकें त्याने जाऊन विकिलें; मग तें विकत घेतलें.

हे वाचणाऱ्यानो, याचा अर्थ असा कीं, शेत तें येशूचा इतिहास आहे; आणि त्यांतील धन किंवा मोलवान् मोती तो येशू ख्रिस्त आहे. हा आपला तारणारा असा जर कोणाचा निश्चय झाला तर तो विषयलंपटपण सोडून त्याचा आश्रय करितो. तो जर तुह्माला सांपडला तर, त्याबद्दल सर्व पृथ्वी मिळत असली तरी तुह्मी त्याला सोडणार नाहीं. परंतु तुह्मी जर तो मिळविण्याचा प्रयत्न करीत नाहीं, तर जगाचे राजे झालां तरीहि तुमचें दैन्य जाणार नाहीं. "जर माणूस पृथ्वी मिळवील, आणि आपल्या जीवाची हानि पावेल तर त्याला काय लाभ होईल? अथवा माणूस आपल्या जीवाबद्दल काय देईल?"

समुद्रांत टाकलेलें जाळें.

अणखी समुद्रांत टाकलेलें जाळें ज्यांत सर्व प्रकारचे जीव एकत्र जमतात, त्यासारिखें आकाशाचें राज्य आहे; तें भरल्यावर तिरास ओढितात, आणि बसून जे चांगले ते भांड्यामध्यें भरितात, आणि जे वाईट त्यांस बाहेर टाकितात. तसें जगाच्या समाप्तीस होईल; दूत येतील आणि नीतिमानांतून दुष्टांस वेगळे करितील, आणि यांस

अग्नीच्या भट्टींत टाकितील; तेथें रडणें व दांत खाणे होईल.

द्राक्षमळ्यांतील मजूर.

अणखी आकाशाचें राज्य कोणीएक घरधन्यासारिखें आहे. तो आपल्या द्राक्षमळ्यांत मोलाने कामकरी ठेवायास सकाळीं बाहेर गेला, आणि त्याने कामकऱ्यासीं दिवसाचा पावला असा ठराव केल्यावर त्यांस आपल्या द्राक्षमळ्यांत पाठविलें. आणि त्याने तिसऱ्या तासीं बाहेर जाऊन अड्ड्यावर दुसरे रिकामे उभे राहातां पाहिले; आणि तो त्यांस बोलला, "तुह्मीहि द्राक्षमळ्यांत जा, आणि जें योग्य असेल तें तुह्मास देईन." मग ते गेले. अणखी साहाव्या व नव्व्या तासीं त्याने बाहेर जाऊन तसेंच केलें. नंतर अकराव्या तासीं बाहेर जाऊन त्याने दुसरे रिकामे उभे राहतां पाहिले; आणि तो त्यांस ह्मणतो, "तुह्मी सारा दिवस एथें रिकामे कां उभे राहातां?" ते त्याला ह्मणतात, "आह्मास मोलाने कोणी ठेविलें नाहीं, ह्मणून." तो त्यांस ह्मणतो, "तुह्मीहि द्राक्षमळ्यांत जा, आणि जें योग्य असेल तें तुह्मी पावाल." तेव्हां सायंकाळ झाल्यावर त्या द्राक्षमळ्याचा धनी आपल्या कारभाऱ्याला ह्मणतो, "कामकऱ्यांस बोलाव, आणि शेवटल्यापासून आरंभ करून पहिल्यापावेतों त्यांस मजुरी दे." तेव्हां जे अकराव्या तासाचे, ते येऊन त्यांतील एकएकाला पावला मिळाला. मग जे पहिले, त्यानीं येऊन आपणास अधिक मिळेल असें मनांत आणिलें. परंतु त्यांसहि एकएकाला पावला मिळाला. आणि त्यानी घेतल्यावर घरधन्यासीं कुरकुर करून ह्मटलें, "या शेव-

टल्यानीं एकच तास काम केलें, तथापि आह्मी दिवसाचे श्रम व ऊन सोसिलें असतां, त्वां आह्मास व त्यांस समान



केलें आहे." परंतु तो त्यांतून एकाला बोलला, "हे सख्या, मी तुझा अन्याय करीत नाहीं. त्वां मजसीं पावल्याचा ठराव केला नाहीं काय? जें तुझें तें घेऊन जा, जसें तुला तसें या शेवटल्यालाहि द्यावयास माझी इच्छा आहे. जें माझें आहे, त्याविषयीं जसें माझ्या इच्छेस येईल तसें करावें, हें मला उचित नाहीं काय? मी चांगला आहें, यामुळें तुझा डोळा वांकडा आहे काय?

यात्रमाणें शेवटले ते पहिले, आणि पहिले ते शेवटले होतील; कारण कीं बोलाविलेले बहुत आहेत, परंतु निवडिलेले थोडके."

अध्याय २३.

दाखले पुढें चालू. हरपलेलें मेंढरूं व पावली.

एका समयीं येशूचें ऐकायास बहुत जकातदार, व शास्त्री, व फारिशी आले होते. जकातदारांस पाहून,

शास्त्री व फारिशी कुरकुर करून ह्मणाले, हा पाप्यांला अंगिकारितो, आणि त्यांबरोबर खातो." तेव्हां तो हा दाखला देऊन त्यांस बोलला, "कोणीएका माणसाजवळ शंभर मेंढरें असतां, आणि त्यांतून एक हरपलें तर तो तीं नव्व्याण्णव रानामध्यें सोडून, जें हरपलें तें सांपडे तोंपर्यंत त्यासाठीं रानांत शोध करीत जाईल कीं नाहीं? मग सांपडल्यावर तो आनंद करून आपल्या खांद्यावर घेतो; व घरीं येऊन मित्रांस व शेजाऱ्यांस बोलावून त्यांस सांगतो, माझें हरपलेलें मेंढरूं सांपडलें, यास्तव तुह्मी माझ्यासंगतीं आनंद करा.' मी तुह्मास सांगतों कीं, तसे नव्व्याण्णव पुण्यवान ज्यांस पश्चात्तापाचें अगत्य नाहीं, त्यांहून पश्चात्ताप करणाऱ्या एका पाप्याविषयीं आकाशामध्यें अधिक आनंद होईल."

"किंवा एका बायकोजवळ दाहा पावल्या असतां, जर ती एक पावली हरवील तर दिवा लावून व घर झाडून ती सांपडे तोंपर्यंत एकाग्रतेने ती शोध करील कीं नाहीं? आणि सांपडल्यावर ती मित्रांस व शेजाऱ्यांस बोलावून ह्मणती, "जी पावली म्यां हरविली ती मला सांपडली, यास्तव माझ्यासंगतीं आनंद करा." तसें मी तुह्मास सांगतों, एक पापी जो पश्चात्ताप करितो त्याविषयीं देवाच्या दूतांच्या समक्ष आनंद होतो.

उधळ्या पुत्र.

पश्चात्ताप करून पापापासून फिरणारा फार आनंदाला हेतु होतो, असें दाखवायास अणखी एक फार सुंदर दाखला येशू बोलला; असा कीं, "कोणीएका माणसाला दोन पुत्र होते. तेव्हां त्यांतील जो धाकटा तो

बापाला बोलला, 'हे बापा, मालमत्तेचा वांटा जो मला यावयाचा, तो दे.' मग त्याने त्यास उपजविन वांटिलें. आणि फार दिवस झाले नाहींत, इतक्यांत धाकटा पुत्र सर्व जमा करून दूर देशांत गेला, आणि तेथें उधळेपणाने वागून आपलें धन उडविलें, नंतर त्याने अवघें खर्चल्यावर त्या देशांत मोठा दुष्काळ पडला, आणि त्याला उणें होऊं लागलें. मग तो त्या देशांतील एका गृहस्थाजवळ जाऊन राहिला; आणि त्याने त्याला डुकरें चारावयास आपल्या शेतांत पाठविलें. तेव्हां डुकरानी जीं टरफलें खाल्लीं त्यांकडून त्याने आपलें पोट भरावयास फार इच्छिलें; आणि कोणी त्याला दिल्हें नाहीं. नंतर तो शुद्धीवर येऊन बोलला, माझ्या बापाच्या किती मो-



लकऱ्यांस भरपूर अन्न आहे, परंतु मी भुकेने मरतों! मी उठून आपल्या बापाजवळ जाईन; आणि त्याला ह्मणेन,

'हे बापा, म्यां आकाशाविरुद्ध, आणि तुझ्यासमोर पाप केलें आहे. आतांपासून मी तुझा पुत्र ह्मटला जाण्यास योग्य नाहीं. आपल्या एका मोलकऱ्याप्रमाणें मला ठेव.' नंतर तो उठून आपल्या बापाजवळ आला. तेव्हां तो फार दूर आहे, इतक्यांत त्याचा बाप त्याला पाहून कळवळला; आणि त्याने धांवून त्याच्या गळां मिठी घातली, आणि त्याचें चुंबन घेतलें. मग पुत्र त्याला बोलला, 'हे बापा, आकाशाविरुद्ध आणि तुझ्यासमोर म्यां पाप केलें आहे आणि आतांपासून मी तुझा पुत्र ह्मटला जाण्यास योग्य नाहीं,' परंतु बापाने आपल्या चाकरांस ह्मटलें, 'तुह्मी उत्तम झगा आणून याला घाला, आणि त्याच्या हातांत अंगठी, आणि पायांत जोडे घाला. मग पुष्ट वांसरूं आणून मारा, आणि आह्मी खाऊन हर्ष करूं; कां कीं हा माझा पुत्र मेला होता, परंतु फिरून जिवंत झाला; आणि हरपला होता परंतु सांपडला आहे.' आणि ते हर्ष करूं लागले."

हरपलेलें मेंढरूं व उधळया पुत्र यांकडून मनुष्यें ईश्वरापासून किती भ्रष्ट झालीं आहेत, व ईश्वर त्यांची काळजी किती वाहातो, व तीं पापाविषयीं पश्चात्ताप पावून त्याकडे फिरलीं असतां किती आनंद पावतो, व त्यांवर किती ममता करितो हें समजावें.

अध्याय २४.

दाखले पुढें चालू. धनवान माणूस आणि दरिद्री लाजारस.

अणखी येशू बोलला, "कोणी धनवान् माणूस होता, आणि तो किरमिजी आणि फार बारीक वस्त्रें घालीत

असे, आणि प्रतिदिवसीं मोठा उत्साह करीत असे; आणि लाजारस नामें कोणी दरिद्री होता तो फोडयुक्त असून त्याच्या दरवाज्यापुढें टाकिला होता. आणि त्या धन-



वानाच्या मेजावरून जो चूर पडला, त्याने आपलें पोट भरावें, असी त्याची फार इच्छा होती. अणखी कुत्र्यानीहि येऊन त्याचे फोड चाटिले. मग असें झालें कीं तो दरिद्री मेला, आणि दूतानी त्याला आब्राहामाच्या उरासीं नेऊन ठेविलें. मग धनवान्हि मेला, आणि पुरला गेला; आणि लोकांतरीं पीडांमध्यें असतां त्यानें आपले डोळे वर करून आब्राहाम व त्याच्या उरासीं लाजारस यांस दुरून पाहिलें. मग तो हाक मारून बोलला, 'हे आब्राहामा बापा, मजवर दया कर, आणि लाजारसाला यासाठीं पाठीव कीं, त्याने आपल्या बोटाचें अग्र पाण्यांत बुचकळून माझ्या जिभेला थंड करावें; कां तर मी ह्या जाळांत क्लेशित आहें.' परंतु आब्राहाम बोलला, 'हे लेंकरा, तूं हे आठीव कीं, तूं आपल्या आयुष्यांत आपलें सुख पावलास; आणि त्याप्रमाणें लाजारस

दुःख पावला. परंतु आतां हा एथें शांति पावला आहे, आणि तूं क्लेशित आहेस. आणि या सर्वांखेरीज आमच्या व तुमच्यामध्यें मोठा चर स्थापिला आहे; असें कीं जे एथून तुह्माकडे पार जाण्यास इच्छितात ते शक्तिमान् नाहींत; आणि तिकडून त्याच्यानीं आह्माकडे येववत नाहीं.' मग तो बोलला, 'तर बापा, मी विनंती करितों कीं, त्वां त्याला माझ्या बापाच्या घरीं पाठवावें; कां तर मला पांच भाऊ आहेत; ह्मणजे त्यानें त्यांस साक्ष पटवावी कीं, त्यानीं या पिडेच्या जाग्यांत येऊं नये.' आब्राहाम त्याला बोलतो, 'त्यांच्या जवळ मोशे व भविष्यवादी आहेत, त्यानीं त्यांचें ऐकावें.' मग तो बोलला, 'हे आब्राहामा बापा, असें नको; परंतु जर कोणी मेलेल्यांमधून त्यांजवळ गेला, तर ते पश्चात्ताप करितील.' तेव्हां त्यानें त्याला ह्मटलें, 'जर ते मोश्याचें व भविष्यवाद्यांचें ऐकत नाहींत, तर मेलेल्यांमधूनहि जरी कोणी उठला तरी ते विश्वास धरणार नाहींत.''

अध्याय २५.

लेंकरांस आशीर्वाद दिल्हा, द्रव्यवान तरूण, जाकियस.

एका समयीं लोकानीं येशूजवळ बाळकेंहि यासाठीं आणिलीं कीं, त्यानें त्यांस स्पर्श करावा; परंतु शिष्यानीं पाहून त्यांस निषेधिलें. तेव्हां येशूनें त्यांस जवळ बोलावून ह्मटलें, "बाळकांस माझ्याजवळ येऊं द्या, आणि त्यांस मना करूं नका; कारण कीं देवाचें राज्य अशांचें आहे. मी तुह्मास खचीत सांगतों, जो कोणी देवाचें राज्य बाळकासारिखें घेत नाहीं, तो त्यांत जाणारच

नाहीं." मग त्याने त्या बाळकांस कंवटाळून, त्यांवर हात ठेवून त्यांस आशीर्वाद दिल्हा.

अहो लेंकरानों, ही गोष्ट वाचून भविष्यलेखाची आठवण होणार नाहीं काय ? आणि त्याचा आशीर्वाद मिळविण्यासाठीं तुमच्याने धैर्य करवत नाहीं काय ? तो भविष्यलेख असा आहे कीं, "तो आपल्या हाताने कोंकरें एकवटील, व आपल्या उरासीं धरून वाहील."

पुढें कांहीं वेळाने एक धनवान् तरुण याने त्याच्या पायां पडून त्याला विचारिलें, "हे उत्तम गुरू, म्यां सर्वकाळचें जीवन पावावें, ह्मणून काय करावें ?" तेव्हां येशू बोलला, "मला उत्तम कां ह्मणतोस? एक जो देव त्यावांचून कोणी उत्तम नाहीं. आज्ञा तुला कळल्या आहेत; ह्मणजे, 'तूं व्यभिचार करूं नको, हत्या करूं नको, चोरी करूं नको, खोटी साक्ष देऊं नको, तूं आपल्या बापाचा व आईचा सन्मान कर." तो ह्मणाला, "हे गुरू, म्यां आपल्या लाहानपणापासून या अवघ्या पाळिल्या आहेत." तेव्हां येशूने त्याकडे लक्ष लावून त्यावर प्रीति केली, आणि त्याला ह्मटलें कीं, "एक तुझ्यामध्यें उणें आहे; जा, तुझें जितकें आहे तितकें विकून दरिद्र्यांस दे; मग माझ्यामागें येऊन चाल, ह्मणजे तुला आकाशांत संपत्ति होईल." तेव्हां तो त्या बोलण्यावरून खिन्न झाला; कारण कीं त्याची बहुत मालमत्ता होती. नंतर येशू सभोंवतीं आपल्या शिष्यांकडे पाहून बोलला कीं, "ज्याजवळ द्रव्य आहे त्याने देवाच्या राज्यांत जावें, हें किती कठीण आहे !"

तथापि धनवान् असून जो तारण पावणारा तो एक

माणूस जाक्खी नामें येशूला भेटला. येशू यरीहो नगरापासून सरआंदा यरूशालेम शहरास जात होता; तेव्हां जाक्खी नांवाचा एक माणूस जो मुख्य जकातदार आणि धनवान् असा होता, त्याने येशू कसा कोण आहे, हें पाहावयास प्रयत्न केला; परंतु समुदायामुळें समर्थ नव्हता; कां कीं तो ठेंगणा होता. तेव्हां तो त्याला पाहावयासाठीं पुढें धावून उंबरावर चढला, कां तर तो त्या वाटेने जाणार होता; आणि त्या ठिकाणीं आला असतां येशूने दृष्टि वर करून त्याला पाहिलें, आणि ह्मटलें "हे जाक्खी, लवकर उतर; कां कीं आज तुझ्या घरीं



मला राहावयाचें आहे." मग त्याने लवकर उतरून आनंदाने त्याला अंगीकारिलें. तेव्हां सर्व पाहून कुरकुर करीत बोलले कीं, "तो पापी माणसांकडे उतरावयास गेला आहे." तेव्हां जाक्खी उभा राहून प्रभूला बोलला, "हे प्रभू, पाहा, मी आपलें अर्धें द्रव्य दरिद्र्यांस देतों, आणि जर कुभांडाने कोणाचें कांहीं घेतलें, तर चौपट परत

देतों." तेव्हां येशूने त्याला असें ह्मटलें, "आज या घराला तारण प्राप्त झालें आहे; कां तर हाहि आब्राहामाचा पुत्र आहे. कारण कीं जें हरपलेलें त्याला शोधावयास आणि तारावयास मनुष्याचा पुत्र आला आहे."

अध्याय २६.

शिष्यांस प्रार्थना करायास शिकविणें.

एका समयीं येशू एका जागीं प्रार्थना करीत होता, ती संपल्यावर त्याच्या एका शिष्याने त्याला ह्मटलें कीं, "हे प्रभू, जसें योहान्नाने आपल्या शिष्यांस शिकविलें, तसें तूंहि आह्मास प्रार्थना करावयास शिकीव."

मग तो त्यांस बोलला, "जेव्हां तुह्मी प्रार्थना करितां तेव्हां असें ह्मणा, 'हे आमच्या आकाशांतील बापा, तुझें नांव पवित्र मानिलें जावो. तुझें राज्य येवो. जसी आकाशांत तसी पृथ्वीवरहि तुझी इच्छा चालो. आमचें नित्याचें अन्न आह्मास प्रतिदिवसीं दे. आणि आमचीं पापें आह्मास सोड, कां कीं आह्मी आपणहि आपल्या प्रत्येक अन्याय करणाऱ्याला सोडितों; आणि आह्मास परीक्षेंत नेऊं नको. परंतु आह्मास वाईटापासून सोडीव."

आणि तो त्यांस बोलला, "तुह्मामध्यें असा कोण आहे कीं, त्याला मित्र असतां तो त्याच्याजवळ मध्यरात्रीं जाऊन त्याला बोलेल, 'हे मित्रा, मला तीन भाकरी उसन्या दे; कारण कीं माझा मित्र वाटेंतून मजकडे आला, आणि त्याला वाढावयास मजपासीं कांहीं नाहीं.' मग तो आंतून उत्तर देईल कीं, 'मला श्रम देऊं नको. आतां दार लावलें आहे, आणि माझीं मुलें माझ्याजवळ

अंथरूणावर आहेत; माझ्याने उठून तुला देववत नाहीं.' मी तुह्मास सांगतों, तो त्याचा मित्र आहे यामुळें जरी तो उठून त्याला देणार नाहीं, तथापि त्याच्या आग्रहामुळें तो उठून त्याला जितक्या पाहिजेत तितक्या देईल. आणि मी तुह्मास सांगतों, मागा, ह्मणजे तुह्मास दिल्हें जाईल; शोधा, ह्मणजे तुह्मास सांपडेल; ठोका, ह्मणजे तुह्मास उघडलें जाईल. कारण कीं जो कोणी मागतो, तो पावतो; आणि जो शोधितो, त्याला सांपडतें; आणि जो ठोकितो, त्यासाठीं उघडलें जाईल. आणि तुह्मामधील असा कोण बाप आहे कीं, त्याजवळ पुत्र भाकर मागेल तर तो त्याला धोंडा देईल काय? आणि जर मासा मागेल, तर माशाच्या ठिकाणीं त्याला साप देईल कीं काय? किंवा जर तो अंडें मागेल, तर त्याला विंचू देईल कीं काय? यास्तव तुह्मी दुष्ट असतां, जर आपल्या मुलांस उत्तम देणीं द्यावयास जाणतां, तर आकाशांतील बापाजवळ जे मागतात त्यांस तो किती विशेषेंकरून पवित्र आत्मा देईल?"

अभंग.

तूं ज्याच्याकडून आह्मी पापी थोर ॥
ईश्वरासमोर येत आहों ॥१॥
जो जीवन, सत्य, आणि मार्ग, आहे ॥
ज्याकडून पाहे देव लोकां ॥२॥
तो तूंहि नेमाने प्रार्थना मार्गांत ॥
महान सर्वांत चाललास ॥३॥
हे प्रभू आह्मां ही प्रार्थनेची रीति ॥
करूनियां प्रीति शिकीव तूं ॥४॥

६॥

अध्याय २७.

ममताळू शोमरोन, व कठोर चाकर.

एका समयीं कोणी शास्त्री येशूची परीक्षा करण्यासाठीं त्यास बोलला, "हे गुरू, मी काय केलें असतां सर्वकाळचें जीवन पावेन ?" तेव्हां तो बोलला, "नेमशास्त्रांत काय सांगितलें आहे ! तूं कसें वाचितोस ?" त्यावर तो बोलला, "प्रभु जो तुझा देव त्यावर तूं आपल्या संपूर्ण हृदयानें, आणि आपल्या संपूर्ण जीवानें, आणि आपल्या संपूर्ण शक्तीनें, आणि आपल्या संपूर्ण बुद्धीनें प्रीति कर; आणि जसी आपणावर तसी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर." मग तो त्याला बोलला, "त्वां ठीक उत्तर केलें आहे; तूं हें कर, मग जीवन पावसील." तेव्हां तो, आपण पुण्यवान् ठरावें असी इच्छा धरून येशूला बोलला, "तर माझा शेजारी कोण आहे ?"

तेव्हां येशूनें त्याला प्रत्यक्ष न सांगतां, दाखला सांगून शेजारी कोण, हें त्याकडूनच वदिलें; असें कीं, "कोणी माणूस यरूशालेमापासून यरीहोस खालीं जात असतां, लुटाऱ्यांमध्यें सांपडला. तेव्हां त्यानीं त्याला उघडें करून फटके मारिले; आणि तो अर्धमेला असतां, ते सोडून निघाले. मग कांहीं वेळानें कोणी याजक त्या वाटेनें खालीं जात होता, आणि तो त्याला पाहून दुसऱ्या बाजूनें पुढें चालला. आणि त्यासारिखा लेवीहि त्या ठिकाणाजवळ आला असतां, पाहून दुसऱ्या बाजूनें पुढें चालला. परंतु कोणी शोमरोनी वाटेनें जात असतां त्याजवळ आला, आणि त्याला पाहून कळवळला; मग त्यानें जवळ येऊन त्याच्या घायांत तेल व द्राक्षारस ओतून

नीट बांधिलें; आणि त्याला आपल्या पाठाळावर बसवून धर्मशाळेंत आणिलें, आणि त्याचा संभाळ केला. आणि सकाळीं निघते वेळेस त्याने दोन पावल्या काढून धर्मशाळकऱ्याला देऊन त्याला सांगितलें, "तूं याचा सांभाळ कर; आणि यापेक्षां जें कांहीं खर्चिसील, तें मी माघारें आल्यावर तुला भरून देईन. तर लुटाऱ्यांमध्यें जो सांपडला, त्याचा शेजारी या तिघांतून कोण होता, ह्मणून तुला वाटतें ?" तेव्हां तो बोलला, "ज्याने त्यावर दया केली, तो." येशू त्याला बोलला, "तूं जा, आणि तसेंच कर."

परंतु कठोर जे आहेत त्यांची काय गति होईल, हें येशूने एका दाखल्यावरून कळविलें आहे; असें कीं, "एका राजाने आपल्या चाकरांचा हिशोब घेऊं इच्छिला; त्यासारिखें आकाशाचें राज्य आहे. तो राजा हिशोब घेऊं लागल्यावर दाहा हजार मण पैक्याचा एक देणेदार त्याजवळ आणिला होता; परंतु फेडावयास त्याला कांहीं नसतां, त्याच्या प्रभूने आज्ञा दिल्ही कीं, त्याला व त्याच्या बायकोला व लेंकरांला, व त्याचें जें सर्व आहे तें विकावें आणि ऋण फेडावें." त्यावर तो चाकर त्याच्या पायां पडून आर्जव करीत बोलला, 'हे प्रभू, मला अवकाश दे, ह्मणजे मी तुझें सर्व फेडीन.' तेव्हां चाकराच्या प्रभूला करुणा येऊन त्याने त्याला मोकळें केलें आणि त्याचें ऋण सोडिलें. परंतु तोच चाकर बाहेर जाऊन आपल्या सोबती चाकरांतील एक ज्याकडून शंभर पावले घेणें होतें तो मिळाला; तेव्हां त्याला धरून नरडी अवळून बोलला, 'जें तुझ्याकडे ऋण आहे

तें मला भरून दे.' तेव्हां त्याचा सोबती चाकर त्याच्या पायां पडून त्याला विनंती करून बोलला कीं, 'मला अवकाश दे, ह्मणजे मी तुझें सर्व फेडीन.' तथापि त्यानें मानिलें नाहीं; परंतु जाऊन तो तें ऋण फेडी तोंपर्यंत त्याला बंदीशाळेंत घातलें. तेव्हां जें झालें तें पाहून त्याचे सोबती चाकर फार खिन्न झाले, आणि त्यांनी येऊन जें सर्व झालें तें आपल्या प्रभूला निवेदित केलें. तेव्हां त्यांचा प्रभु त्याला बोलावून ह्मणतो, "अरे दुष्ट चाकरा, त्वां मला विनंती केली ह्मणून म्यां तें सर्व देणें तुला सोडिलें; जसी म्यां तुजवर दया केली, तसी त्वांहि आपल्या सोबत्यावर दया करावी हें योग्य नव्हतें कीं काय? आणि त्याच्या प्रभूनें त्यावर रागें भरून, तो त्याचें सर्व देणें फेडी तोंपर्यंत त्याला दंड करणाऱ्यांच्या स्वाधीन केलें. तसें माझा आकाशांतील बापहि तुह्माविषयीं करील; जर तुह्मी आपल्या अंतःकरणापासून आपल्या भावांचे अपराध सोडीत नाहीं तर."

अध्याय २८.

नम्रता व संयम.

कित्येक लोक असे आहेत कीं, आपण पुण्यवान् असा अभिमान धरून दुसऱ्यास धिक्कारितात; त्याविषयीं येशूनें हा दाखला सांगितला, "दोन माणसें, एक फारिशी, व दुसरा जकातदार, हे प्रार्थना करावयास देवळांत चढून गेले. फारिश्यानें उभें राहून आपणासीं असी प्रार्थना केली कीं, 'हे देवा, दुसरीं माणसें अपहारी, अन्यायी, व्यभिचारी, यांसारिखा किंवा या जकातदारासारखाहि

मी नव्हे, यास्तव मी तुझा उपकार मानितों. दर सप्ताकांत मी दोनदां उपास करितों; जितकीं मला मिळतात त्या अवघ्यांचा दाहावा भाग देतों.' परंतु जकातदार दूर उभा राहून, आकाशाकडे डोळे देखील वर लावींना, पण आपल्या उरावर मारून बोलला, 'हे देवा, मज पाप्यावर दया कर.' मी तुह्मास सांगतों हा दुसऱ्यापेक्षां न्यायी ठरून आपल्या घरास उतरला; कारण कीं जो कोणी आपणाला उंच करितो तो नीच केला जाईल; आणि जो आपणाला नीच करितो तो उंच केला जाईल."

दुसऱ्या वेळेस येशूच्या शिष्यानी जवळ येऊन त्याला विचारिलें कीं, "आकाशाच्या राज्यांत मोठा कोण आहे?" तेव्हां येशूने एका बाळकास बोलावून त्याला त्यांच्या मध्यें ठेविलें, आणि ह्मटलें कीं, "मी तुह्मास खचीत सांगतों, जर तुह्मी पालटत नाहीं, आणि बाळकासारिखे होत नाहीं, तर तुह्मी आकाशाच्या राज्यांत जाणारच नाहीं. यास्तव जो कोणी आपणास या बाळकासरिखें लीन करील, तोच आकाशाच्या राज्यांत मोठा आहे; आणि जर कोणी माझ्या नामाने अशा एका बाळकाला अंगीकारितो, तर तो मला अंगीकारितो. परंतु हे लाहान जे मजवर विश्वास ठेवितात, त्यांतील एकाला जो कोणी अडखळवील, त्याच्या गळ्यांत जांत्याची तळी बांधावी, आणि त्याला समुद्राच्या खोल पाण्यांत बुडवावें, हें त्याला बरें. अडखळ्यांमुळें जगाला हाय हाय; कारण कीं अडखळे होण्याचें अगत्य आहे; तथापि ज्या माणसाकडून अडखळा येतो, त्याला हाय हाय. आणि तुझा हात अथवा तुझा पाय जर तुला

अडखळवील, तर त्यास तोड, आणि आपल्यापासून टाक; तुला दोन हात अथवा दोन पाय असून त्वां सर्वकाळच्या अग्नींत टाकिलें जावें, यापेक्षां लंगडें अथवा व्यंग होऊन जीवनांत जावें हें तुला बरें आहे. आणि जर तुझा डोळा तुला अडखळवितो तर त्याला काढ, आणि आपल्यापासून टाक; तुला दोन डोळे असून त्वां अग्नीच्या नरकांत टाकिलें जावें, यापेक्षां एक डोळा असून जीवनांत जावें हें तुला बरें."

यावरून समजावें कीं, जे आह्मास अति प्रिय शरिराचे अवयव, व इतर जगांतले पदार्थ ते जर परलोकाविषयीं विघ्न करितात, तर त्यांस शत्रू असें समजून टाकावें.

नंतर दुसऱ्या दिवसीं येशूने देवळांत जाऊन लोकांस शिकविलें कीं, "तुह्मी शास्त्र्यांविषयीं संभाळा, कारण कीं झगे घालून फिरणें, आणि पेठांमध्यें नमस्कार घेणें, आणि सभांमध्यें मुख्य आसनें, आणि जेवणांमध्यें मुख्य लोढें, हीं त्यांला आवडतात. अणखी ते विधवांचीं घरें खाऊन टाकितात; आणि मिसाने फार वेळाच्या प्रार्थना करितात, ते अधिक दंड पावतील." आणि येशू भांडारासमोर बसून लोक भांडारांत पैका कसे टाकितात, हें पाहात होता. तेव्हां बहुत धनवानानी फार टाकिलें; आणि एक दरिद्री विधवेने येऊन दोन दमड्या, ह्मणजे एक अधेला टाकिला. मग तो आपल्या शिष्यांस जवळ बोलावून त्यांस ह्मणतो कीं, "मी तुह्मास खचीत सांगतों कीं, ज्या सर्वांनी भांडारांत टाकिलें, त्यांपेक्षां या दरिद्री विधवेने अधिक टाकिलें आहे; कारण कीं त्या सर्वांनी

आपल्या भरपुरांतून टाकिलें, परंतु इने आपल्या अवाळीं-तून आपलें जितकें होतें तितकें, ह्मणजे आपली सर्व उप-जीविका टाकिली."

अध्याय २९.

येशूचें रूप पालटणें.

येशू एका समयीं पेत्रस, याकोब, व योहान्न, या तीन शिष्यांस बरोबर घेऊन उंच डोंगरावर गेला; तेव्हां त्यांच्या समोर त्याचें रूप पालटलें. आणि त्याचा तोंडवळा सूर्यासारिखा तेजस्वी झाला; आणि त्याचीं वस्त्रें बर्फासारिखीं पांढरीं झालीं, त्या काळीं मोशे व एलीया हे त्याच्या बरोबर संभाषण करितां त्यांच्या दृष्टीस पडले. मग पेत्रस येशूला असें बोलतां झाला, "हे प्रभू, आह्मी एथें असावें, हें बरें आहे. तुझी इच्छा असली तर आह्मी एथें तीन मंडप करूं; तुझ्यासाठीं एक, आणि मोश्यासाठीं एक, आणि एलीयासाठीं एक." तो बोलत असतां, पाहा, प्रकाशवंत मेघाने त्यावर सावली केली, आणि मेघांतून असा शब्द झाला कीं, "हाच माझा प्रिय पुत्र आहे; याविषयीं मी फार संतोषित आहें. याचें तुह्मी ऐका." तेव्हां शिष्य ऐकून आपल्या तोंडांवर पडले, आणि फार भ्याले. परंतु येशूने येऊन त्यांस स्पर्श केला, आणि ह्मटलें, "उठा, भिऊं नका." मग त्यांनी आपले डोळे वर करून येशूशिवाय कोणाला पाहिलें नाहीं. नंतर ते डोंगरावरून उतरत असतां, येशूने त्यांस आज्ञा केली कीं, मनुष्याचा पुत्र मेलेल्यांमधून उठेल, तोंपर्यंत तुह्मी हें जें दृष्टीस पडलें, तें कोणाला सांगूं नका."

नंतर तो यरूशालेम शहरास जायासाठीं निघाला; आणि आपणाला पुढें जें जें प्राप्त होणार, तें त्या शिष्यांस सांगूं लागला; "पाहा, आह्मी यरूशालेमास जातों, आणि मनुष्याच्या पुत्राविषयीं जें कांहीं भविष्यवाद्यानी लिहिलें, तें सर्व पूर्ण होईल; कारण तो परदेशस्थांच्या स्वाधीन केला जाईल, आणि ते त्याची विटंबना आणि हेलना करितील आणि त्यावर थुंकतील, आणि ते फटके मारून त्याला जिवें मारितील; मग तिसऱ्या दिवशीं तो फिरून उठेल." परंतु ते यांतील कांहीं समजले नाहींत; आणि ही गोष्ट त्यांपासून गुप्त राहिली, आणि जीं ह्मटलीं तीं त्यानी जाणलीं नाहींत.

ते शिष्य येशूच्या मरणाविषयीं अंधारांत होते; कारण त्यांस वाटत होतें कीं, तो जगांत मोठा राजा होईल. तो पाप, सैतान, अज्ञान इत्यादिकांचा पराजय करून, आत्मीय राज्य करील, असें कळलें नव्हतें! ह्मणून त्यास ज्या रीतीने मरण येणार, ती त्याने सांगितली असतांहि त्यांस समजेना. परंतु पुढें तो तसा मेलेल्यामधून उठल्यावर, त्याच्या सांगितल्याचें स्मरण होऊन त्यांच्या ध्यानांत आलें.

अध्याय ३०.

येशूचें बेथानी एथें तीनदां जाणें.

बेथानी नामक खेडें, जें यरूशालेमापासून एका तासाची वाट, जाइताच्या डोंगरापलिकडे होतें, त्यांत मारया व मार्था या दोघी धार्मिक बहिणी, आणि त्यांचा भाऊ लाजारस, हीं राहत असत. त्यांविषयीं शास्त्रांत असी गोष्ट

आहे कीं, एकदां येशू त्यांच्या घरीं गेला असतां, त्या सर्वांस मोठा आनंद झाला; आणि मारया त्याच्या पायांसीं त्याच्या गोष्टी ऐकत बसली; आणि मार्था त्याच्या पाहुणचाराच्या खटपटींत होती. तें काम त्या एकटीवर पडलें, ह्मणून ती श्रम पावून येशूजवळ जाऊन त्यास बोलली, "हे येशू, ही मारया स्वस्थ बसून राहिली आहे,



आणि मी एकटी श्रम करितें, याची तुला काळजी नाहीं काय ? माझें सहाय करावयास तिला आज्ञा कर." मग तिला येशू बोलला, "मार्था, मार्था, तूं बहुतांविषयीं चिंतातुर असतां गडबडत आहेस; परंतु एका गोष्टीचें अगत्य आहे; आणि जो चांगला वाटा तिजपासून जाणार नाहीं, तो मारयेने निवडून घेतला आहे."

येशू शेवटल्या खेपेस यरूशालेमास जात असतां, त्याला बेथानी गांवांतून बातमी आली कीं, ज्यावर तूं प्रीति करितोस तो लाजारस दुखण्यास पडला आहे. तेव्हां येशू बोलला, "हा त्याचा रोग मरणासाठीं नव्हे, परंतु याकडून देवाच्या पुत्राचें गौरव व्हावें ह्मणून हा देवाच्या गौरवासाठीं आहे." तो रोगी आहे, असें ज्या ठिकाणीं

येशूने ऐकिलें त्याच ठिकाणीं तो पुढें दोन दिवस राहिला. मग शिष्यांस बोलला, "आपण यहूद्यांत फिरून जाऊं." तेव्हां शिष्य बोलले, "हे गुरू, आतां यहूदी तुला धोंडमार करावयास झटले, आणि तूं तेथें फिरून जातोस काय?" येशूने उत्तर केलें कीं, "दिवसाचे बारा तास आहेत कीं नाहींत? जर कोणी दिवसास चालतो, तर त्याला ठेंच लागत नाहीं; कारण कीं तो ह्या जगाचा उजेड पाहतो."

फिरून येशू बोलला, "आमच्या लाजारस मित्राला झोंप लागली, परंतु मी त्याला जागें करावयास जातों. तेव्हां शिष्य बोलले, हे प्रभू, "जर त्याला झोंप लागली तर तो पार पडेल." येशू तर त्याच्या मरणाविषयीं बोलला; परंतु झोंपेच्या निजण्याविषयीं बोलला, असें त्यांस वाटलें; मग येशूने त्यांस उघड करून सांगितलें कीं, "लाजारस मेला आहे. आणि मी तेथें नव्हतों, यास्तव तुह्मामुळें मी आनंद करितों, यासाठीं कीं तुह्मी विश्वास धरावा. आतां आपण त्याच्याजवळ जाऊं." नंतर तो बेथानी गांवास गेला; तेव्हां लाजारस मरून पुरला गेला, त्यास चार दिवस झाले, असें त्याला कळलें.

तेव्हां मार्था व मारया यांच्या भावाविषयीं त्यांचें शांतवन करावें ह्मणून यहूद्यांतील बहुत त्यांजवळ आले होते. मग येशू आला हें ऐकिल्यावर, मार्था जाऊन त्याला भेटली; परंतु मारया घरांत बसली. मार्था येशूला ह्मणाली, "हे प्रभू, जर तूं एथें असतास तर माझा भाऊ मेला नसता. परंतु आतांहि जें कांहीं तूं देवाजवळ मागसील तें देव तुला देईल, हें मला ठाऊक आहे." येशू ह्मणा-

ला, "तुझा भाऊ पुन्हा उठेल." मार्था ह्मणाली, "शेवटल्या दिवसीं पुन्हा उठण्यांत तो पुन्हा उठेल, हें मला कळलें आहे." येशू ह्मणाला, "पुन्हा उठणें, आणि जीवन मी आहें. जो मजवर विश्वास ठेवितो, तो जरी मेला तरी वांचेल. आणि जो कोणी जिवंत असून मजवर विश्वास ठेवितो तो कधींहि मरणारच नाहीं, याचा तूं विश्वास धरितोस कीं काय?" ती त्याला ह्मणाली, "होय, प्रभू, तूं ख्रीस्त देवाचा पुत्र जो जगांत येणार तो, असा मला विश्वास आहे."

मग मार्थेने जाऊन आपली बहीण मारया इला बोलाविलें. तेव्हां ती लवकर येशूजवळ आली. ती घरांतून निघतांना तिच्या जवळ शांतवन करावयास आलेले जे यहूदी होते त्यांस वाटलें कीं, ही भावाच्या कबरेजवळ रडावयास जात आहे; ह्मणून तेहि तिच्या मागून आले. ती येशूजवळ जाऊन त्याच्या पायां पडून बोलली, "हे प्रभू, जर तूं एथें असतास तर माझा भाऊ मेला नसता." मग येशू तिला रडतां, आणि जे यहूदी तिच्या जवळ मिळाले त्यांस रडतां पाहून आत्म्यांत कण्हला, आणि विव्हल झाला आणि बोलला, "तुह्मी त्याला कोठें ठेविलें." ते ह्मणाले, "हे प्रभू, येऊन पाहा." तेव्हां येशू रडला. मग यहूदी बोलले, "पाहा, याने त्यावर केवढी प्रीति केली." आणि त्यांतील कित्येक बोलले, "ज्याने अंधळ्यांचे डोळे उघडिले, त्याला हाहि न मरावा असें करण्याची शक्ति नव्हती काय?" त्यावर येशू फिरून आपल्यांत कण्हून कबरेजवळ आला. ती तर गुहा होती, आणि तिजवर धोंड ठेविली होती. येशू ह्मणाला, "धोंड

काढा.” तेव्हां त्या मेलेल्याची बहीण जी मार्था ती ह्मणाली, “हे प्रभू, त्याची आतां घाण येती, कारण चार दिवस त्याला झाले आहेत.” येशू तिला ह्मणाला, “जर तूं विश्वास धरसील, तर देवाचें गौरव पाहासील, असें म्या तुला सांगितलें कीं नाहीं?”

मग जेथें तो मेलेला ठेविला होता, तेथून त्यानी धोंड काढिली; तेव्हां येशू आपले डोळे वर करून बोलला, “हे बापा, त्वां माझें ऐकिलें यास्तव मी तुझा उपकार मानितों. आणि तूं सर्वदां माझें ऐकतोस हें मला ठाऊक आहे; परंतु जे लोक सभोंवते उभे आहेत त्यांमुळें बोललों, यासाठीं कीं, त्वां मला पाठविलें आहे असा त्यानी विश्वास धरावा.” असें बोलून तो मोठ्याने बोलला, “हे लाजारसा, बाहेर ये.” तेव्हां जो मेला होता, तो बाहेर आला; त्याचे पाय व हात वेष्टनानी बांधलेले, आणि तोंड रुमालाने वेष्टिलेलें होतें. येशू त्यांस ह्मणाला, “त्याला मोकळें करून जाऊं द्या.”

नंतर येशू कांहीं दिवस गुप्त राहिला; आणि वल्हांडणाच्या सणास साहा दिवस राहिले, तों पुन्हा बेथानी गांवांत गेला. तेव्हां त्याला शिमोन नामक गृहस्थाच्या घरीं मेजवानी झाली. तेथें मार्था त्या खटपटींत होती; व लाजारसहि त्या मंडळींत होता. मारयेने तर मोठ्या मोलाचें शेरभर तेल आणून येशूच्या पायांस लाविलें; आणि आपल्या केसानी पाय पुसले. त्या तेलाच्या सुगंधाने तें सर्व घर घमघमित झालें.

हें पाहून त्याच्या शिष्यांपैकीं यहूदा इस्कारीयोतेस जो त्याला परस्वाधीन करणारा होता, तो ह्मणाला, “हें

सुगंधी तेल पाउणशें रुपयांच्या किमतीचें होतें; मग हें विकून तें द्रव्य दरिद्र्यांस कां दिल्हें नाहीं?" तथापि त्याला दरिद्र्यांची चिंता होती ह्मणून त्यानें असें ह्मटलें, असें नाहीं; तो चोर होता, आणि त्याच्याजवळ कसणी होती, तींत जीं सांठवून ठेविलीं तीं तो वाहात असे; ह्मणून येशू बोलला, "इला असूं द्या; इला त्रास कां देतां? इनें मजकरितां चांगलें काम केलें आहे; कारण कीं दरिद्री सर्वदां तुह्माजवळ आहेत, आणि जेव्हां तुमच्या मनांस येईल तेव्हां त्यांचें बरें करावयास सांपडेल; परंतु मी तुह्माजवळ सर्वकाळ नाहीं. इनें आपल्याकडून जितकें होण्याजोगें तितकें केलें आहे. उत्तरकार्यासाठीं माझ्या देहाला पूर्वींच अभ्यंग घातला. मी तुह्माला खचीत सांगतों कीं, संपूर्ण पृथ्वीमध्यें जेथें जेथें शुभवर्त्तमान गाजविलें जाईल तेथें तेथें हेंहि इच्या आठवणीसाठीं सांगितलें जाईल." हा येशूचा भविष्यलेख आजपर्यंत पूर्ण होत आला, याविषयीं आह्मी साक्षी आहों.

अध्याय ३१.

यरूशालेमास येशूचें जाणें.

दुसऱ्या दिवशीं येशू बेथानी एथून यरूशालेमास गेला. त्या वाटेंत एक बेथफागा ह्मणून गांव आहे, त्याजवळ येऊन तो आपल्या शिष्यांस ह्मणाला, "तुह्मी या समोरच्या गांवांत जा, आणि बांधलेली गाढवी व तिच्याबरोबर शिंगरूं तुह्मास लागलेंच सांपडेल, त्यांस सोडून माझ्याजवळ आणा; आणि जर कोणी तुह्मास कांहीं ह्मणेल तर, 'यांचें अगत्य प्रभुला आहे,' असें सांगा, ह्मणजे तो त्यांस लागलेंच पाठवील." आणि हें अवघें यासाठीं झालें

कीं, भविष्यवाद्यांकडून जें सांगितलें होतें तें पूर्ण व्हावें; तें असें कीं, "जीयोनाच्या कन्येला सांगा, पाहा, तुझा राजा नम्र आणि गाढवीबर व शिंगरूं जें गाढवीचें पोर त्यावर बसून तुझ्याजवळ येत आहे." तेव्हां शिष्यांनीं जाऊन आणि येशूनें त्यांस जशी आज्ञा केली तसेंच करून गाढवी व शिंगरूं हीं आणिलीं; आणि त्यांवर आपलीं वस्त्रें घालून त्यांवर त्याला बसविलें. तेव्हां फार मोठ्या समुदायानें आपलीं वस्त्रें वाटेवर पसरलीं; आणि दुसऱ्यांनीं झाडांच्या डाहळ्या तोडून वाटेवर पसरिल्या; आणि पुढें चालणारे व मागें चालणारे समुदाय ओरडत बोलले, "दावीदाच्या पुत्राला होसान्ना; जो प्रभुच्या नांवानें येतो तो धन्यवादित असो. सर्वांहून उंचामध्यें होसान्ना."

नंतर जवळ आल्यावर तो नगराला पाहून त्याविषयीं रडून बोलला कीं, "जर त्वां ह्या आपल्या दिवसांत देखील आपल्या शांतिकारक गोष्टी जाणल्या असत्या तर किती बरें होतें, परंतु आतां त्या तुझ्या दृष्टीपासून लपल्या आहेत, कारण कीं असे दिवस तुजवर येतील कीं, तुझे शत्रू तुझ्या भोंवता मोरचा लावून तुला वेढितील आणि तुला चहुंकडून कोंडतील, आणि तुला व तुझ्यातील व तुझ्या लेंकरांस भूमीबरोबर करतील; आणि तुझ्यामध्यें धोंड्यावर धोंडा राहूं देणार नाहींत; कारण त्वां आपली भेट होण्याचा समय जाणिला नाहीं."

मग तो देवळांत जाऊन त्यांत जे विकणारे आणि विकत घेणारे होते त्यांस घालवूं लागला; आणि त्यांस बोलला, "माझें घर प्रार्थनेचें घर आहे असें लिहिलें आहे, परंतु तुह्मी त्याला लुटाऱ्यांची गुहा असें केलें आहे."

तेव्हां त्याने जे चमत्कार केले ते, आणि देवळांत लेंकरें ओरडतांना दावीदाच्या पुत्राला होसान्ना असें ह्मणत होतीं, तींहि मुख्य याजक व शास्त्री पाहून जळफळले; आणि त्याला बोलले, "हे काय बोलतात, तें तूं ऐकतोस कीं काय ?" तेव्हां येशू त्यांस ह्मणाला, "होय, बालकें व तान्हीं यांच्या तोंडांतून त्वां स्तुति पूर्ण करविली आहे, हें तुह्मी कधीं वाचिलें नाहीं काय ?" नंतर तो त्यांस सोडून नगराबाहेर बेथानींत गेला आणि तेथें वस्तीस राहिला.

आणि सकाळीं तो फिरून नगरास जात असतां, त्याला भूक लागली, तेव्हां वाटेवर एक अंजिराचें झाड पाहून तो त्याजवळ आला; परंतु त्यावर केवळ पानांवांचून त्याला कांहीं मिळालें नाहीं. मग तो त्याला बोलला, "यापुढें सर्वकाळ तुजपासून फळ न होवो." आणि तें अंजिराचें झाड तेव्हांच वाळून गेलें.

हे वाचणाऱ्यानो, यावरून समजावें कीं, ईश्वराने मनुष्यादि सर्व उत्पन्न करून ज्यास जें काम लावून दिल्हें आहे, तें जर त्यापासून न झालें तर त्याची गति या अंजिराच्या झाडासारिखी होती.

अध्याय ३२.

शेतकरी, व राजाच्या लग्नाची जेवणावळ.

येशूने त्या काळीं यरूशालेमांत असतां या दोन उपमा सांगितल्या. पहिली असी कीं, "कोणी माणूस जो घरधनी होता त्याने द्राक्षमळा लाविला, आणि त्या सभोंवतें कुंपण केलें; आणि त्यामध्यें द्राक्षारसासाठीं कुंड खणिलें,

आणि माळा बांधिला, आणि त्याला शेतकऱ्यांस सोपून तो परदेशास गेला. नंतर फळांचा हंगाम आला; तेव्हां त्याचीं फळें घेण्याकरितां त्याने आपल्या चाकरांस त्या शेतकऱ्यांजवळ पाठविलें. तेव्हां त्या शेतकऱ्यानी त्याच्या चाकरांस धरून, कोणाला मार दिल्हा, आणि कोणाला जिवें मारिलें, आणि कोणाला धोंडमार केला. फिरून त्याने दुसरे चाकर पहिल्यापेक्षां अधिक असे पाठविले, परंतु त्यानी त्यांस तसेंच केलें. शेवटीं त्याने आपल्या पुत्राला त्यांजवळ पाठवून ह्मटलें, 'ते माझ्या पुत्राची भीड धरतीलच.' तथापि शेतकरी पुत्राला पाहून आपल्यामध्यें बोलले, 'हा वतनदार आहे; याला आपण जिवें मारूं आणि त्याचें वतन घेऊं. तेव्हां त्यानी त्याला धरून द्राक्षमळ्याबाहेर काढिले आणि जिवें मारिलें. यास्तव जेव्हां द्राक्षमळ्याचा धनी येईल, तेव्हां तो त्या शेतकऱ्यांस काय करील?" लोक येशूला ह्मणाले, "तो त्या दुष्टांचा अतिनाश करील, आणि फळें हंगामावर त्याला देतील अशा दुसऱ्या शेतकऱ्यांस द्राक्षमळा सोपून देईल." येशू त्यांस ह्मणाला कीं, " 'ज्या धोंड्याला घर बांधणाऱ्यानी अव्हेरिलें, तोच कोंपऱ्याचा शिरोभाग झाला आहे, हें प्रभूकडून घडलें आणि आमच्या दृष्टीस चमत्कारिक आहे,' हें शास्त्रामध्यें तुह्मी कधीं वाचिलें नाहीं काय? यास्तव मी तुह्मास सांगतों कीं, देवाचें राज्य तुह्मापासून घेतलें जाईल, आणि जी प्रजा त्यांतलीं फळें देईल तिला दिल्हें जाईल."

अणखी तो बोलला कीं, "आकाशाच्या राज्याला कोणी एक राजाची उपमा द्यावयाची आहे. त्याने

आपल्या पुत्राचें लग्नकार्य केलें, आणि लग्नकार्यास जे आमंत्रित होते त्यांस बोलवावयास त्याने आपल्या चाकरांस पाठविलें, परंतु ते येईनात. पुन्हा त्याने दुसऱ्या चाकरांस पाठवितांना ह्मटलें, 'जे आमंत्रित आहेत त्यांस सांगा कीं,म्या आपलें जेवण सिद्ध केलें आहे; माझे बैल आणि पुष्ट पशु मारिले आहेत, आणि अवघीं सिद्ध आहेत; तुह्मी लग्नाला या. परंतु ते उपेक्षा करून कोणी आपल्या शेताला, आणि कोणी आपल्या व्यापारावर असे गेले, आणि वरकडानी त्याच्या चाकरांस धरून गांजिलें, व जिवें मारिलें. तेव्हां राजा ऐकून रागें भरला, आणि आपलीं सैन्यें पाठवून त्याने त्या घातकांचा नाश केला, आणि त्यांचें नगर जाळिलें. मग तो आपल्या चाकरांस ह्मणाला लग्नकार्य सिद्ध झालें खरें, परंतु जे आमंत्रित होते ते योग्य नव्हते; यास्तव मार्गांच्या चवाठ्यावर जा, आणि जितके तुह्मास सांपडतील तितक्यांस लग्नकार्यास बोलावा. मग ते चाकर मार्गांत बाहेर गेले; आणि बरे वाईट जितके त्यांस सांपडले त्या सर्वांस त्यानी एकवट केलें. मग बसणाऱ्यानी लग्नकार्याची भरती झाली, तेव्हां राजाने बसणाऱ्यांस पाहावयास आंत येऊन तेथें लग्नचें वस्त्र घातलेला नाहीं, असा एक माणूस पाहिला. तेव्हां तो त्याला बोलतो, हे सख्या, लग्नाचें वस्त्र घेतल्यावांचून तूं एथें कां आलास?' तेव्हां तो अनुत्तर राहिला. तेव्हां राजाने चाकरांस ह्मटलें, 'त्याचे हात पाय बांधून त्याला नेऊन बाहेरील अंधारांत टाका; तेथें रडणें आणि दांत खाणें होईल.' कारण कीं बहुत बोलाविलेले परंतु निवडिलेले थोडके आहेत."

यावरून समजावें कीं ख्रिस्ती मंडळींत मिळून त्याचा संस्कार करून घेतला ह्मणजे तारण झालें असें नाहीं. खऱ्या विश्वासानें येशूकडून पुण्यप्राप्ति, व पवित्र आत्म्यानें शुद्धता, हीं ज्याला नाहींत त्याला येशू परीक्षेच्या दिवशीं दूर दुःखांत टाकील. यास्तव आपल्या मनाचा शोध करा कीं, आपला विश्वास दृढ आहे किंवा कसा; आणि आपण तारण पावण्यास योग्य आहों कीं नाहीं, याविषयीं आपलें मनच आपल्यास साक्ष होईल.

अध्याय ३३.

यरूशालेमाविषयीं येशूचें भविष्य सांगणें.

मग येशू देवळांतून बाहेर निघाला, आणि त्याचे शिष्य त्याला देवळाची रचना दाखवायास जवळ आले. तेव्हां येशू त्यांस बोलला, "तुह्मी हीं अवघीं पाहातां कीं नाहीं? मी तुह्मास खचीत सांगतों, खालीं पाडला नाहीं, असा एथें धोंड्यावर धोंडा राहणार नाहीं. आणि यरूशालेम सैन्यानी वेढिलेलें जेव्हां तुह्मी पाहाल, तेव्हां त्याचें ओसाड होणें जवळ आलें, असें जाणा. तेव्हां यहूद्यांत जे त्यानी डोंगरावर पळून जावें, आणि त्याच्यामध्यें जे त्यानी बाहेर जावें, आणि जे शिवारांत त्यानी त्यांत जाऊं नये; कां कीं सर्व जीं लिहिलेलीं तीं पूर्ण होण्यास ते सूड घेण्याचे दिवस आहेत. आणि त्या दिवसांत ज्या गरोदर आहेत, आणि ज्या स्तन पाजितात, त्यांस हाय हाय; कारण कीं भूमीवर मोठें संकट आणि या लोकांवर क्रोध होईल, आणि ते तरवारीच्या धारेनें पडतील, आणि पाडाव होऊन सर्व राष्ट्रांमध्यें नेले जातील,

आणि राष्ट्रांचे काळ पूर्ण होतील, तोंपर्यंत यरूशालेम राष्ट्रांकडून तुडविलें जाईल."

मग तो जाइताच्या डोंगरावर बसला असतां, पेत्रस व योहान्न व याकोब व आन्द्रेयास हे शिष्य त्याजवळ एकीकडे येऊन बोलले, "या गोष्टी केव्हां होतील, आणि तुझ्या येण्याचें आणि जगाच्या समाप्तीचें चिन्ह काय, हें आह्मास सांग." तेव्हां येशू त्यांस बोलला "तुह्मास कोणी न फसवावें ह्मणून संभाळा; कारण कीं बहुत माझ्या नांवाने येऊन असे बोलतील कीं, मी ख्रीस्त आहें, आणि बहुतांस फसवितील. आणि तुह्मी लढाया व लढायाच्या अवया ऐकाल तेव्हां संभाळा, घाबरूं नका, कारण कीं या सर्व गोष्टी होण्याचें अगत्य आहे, परंतु इतक्यांत शेवट होत नाहीं. कारण कीं राष्ट्र राष्ट्रावर, आणि राज्य राज्यावर उठेल. आणि दुकाळ व मऱ्या व भूमीकंप जागोजागीं होतील; परंतु या सर्व गोष्टी दुःखाचा प्रारंभच आहेत. तेव्हां तुमचे हाल व्हावे, ह्मणून ते तुह्मास परस्वाधीन करतील, आणि तुह्मास जिवें मारितील, आणि माझ्या नांवामुळें तुह्मी अवघ्या राष्ट्रांनीं द्वेषित व्हाल; आणि अवघ्या राष्ट्रांस साक्ष व्हावी ह्मणून या राज्याचें हें शुभवर्त्तमान सर्व देशामध्यें गाजविलें जाईल. आणि ज्या काळीं शेवट होईल, तेव्हां जगाच्या प्रारंभापासून आजपर्यंत जें झालें नाहीं, आणि पुढें होणारहि नाहींच, असें मोठें संकट त्या काळीं होईल. तेव्हां जर कोणी तुह्मास ह्मणेल, 'पाहा ख्रीस्त एथें किंवा तेथें आहे,' तर तुह्मी विश्वास धरूं नका, कारण कीं जसी वीज पूर्वेपासून निघून पश्चिमेपर्यंत प्रकाशिती, तसें मनुष्याच्या पुत्राचें येणें

होईल. कारण कीं जेथें प्रेत आहे तेथें गीध एकवट होतील.

आणि त्वरेने त्या दिवसांतील संकटानंतर सूर्य अंधारमय होईल; आणि चंद्र आपला प्रकाश देणार नाहीं; आणि तारे आकाशांतून पडतील; आणि आकाशांतील सैन्यें हालविलीं जातील; आणि त्या काळीं मनुष्याच्या पुत्राचें चिन्ह आकाशामध्यें दिसेल. अणखी त्या काळीं पृथ्वीच्या सर्व जाती बडवून घेतील, आणि मनुष्याच्या पुत्राला सामर्थ्याने व मोठ्या वैभवाने आकाशाच्या मेघांवर येतां पाहातील. आणि कर्ण्याच्या मोठ्या आवाजाने तो आपल्या दूतांस पाठवील, आणि ते चहुंकडून आकाशाच्या एका शेवटापासून त्याच्या दुसऱ्या शेवटापर्यंत त्याच्या निवडलेल्यांस एकवट करतील. परंतु त्या दिवसाविषयीं आणि त्या घटकेविषयीं कोणाला कळलें नाहीं, आकाशांतील दूतांसहि नाहीं, केवळ माझ्या बापास मात्र कळलें आहे. यास्तव तुह्मी जागे असा, कां कीं कोणत्या घटकेस तुमचा प्रभु येईल हें तुह्मास कळलें नाहीं."

येणेप्रमाणें यरूशालेमाच्या नाशाविषयीं येशूने भविष्य सांगितलें, त्या शहरावर व यहूद्यांवर येशूची फार प्रीति होती ह्मणून दयेने त्याचें संरक्षण, कोंबडी जसें आपल्या पिलांचें करिती तसें त्याने करायास इच्छिलें; परंतु त्याच्या प्रीतीचें प्रतिदान यहूद्यांनी त्याचा द्वेष हेंच केलें. ह्मणून त्या कर्माचें फळ ह्मणजे त्यांस ईश्वराच्या महाक्रोधाने पराकाष्ठेचीं संकटें प्राप्त व्हावीं हेंच योग्य आहे. पुढें येशू मरून चाळीस वर्षें झालीं नाहींत, तोंच त्या लोकांवर मोठमोठीं बहुत अरिष्टें येऊन ते नाश पावले; आणि तें

शहरहि लयास गेलें, आणि इतर यहूदी देशोधडीं लागले; जसे आतां कोठें कोठें दृष्टीस पडतात तसे.

अध्याय ३४.

दाहा कुमारी, आणि आपली मालमत्ता चाकरांच्या स्वाधीन करून प्रवासास जाणारा गृहस्थ, यांचे दोन दाखले.

येशू ह्मणाला, “आकाशाच्या राज्याला दाहा कुमारींची उपमा दिल्ही जाईल; त्या आपल्या मशाली घेऊन वराला भेटावयासाठीं बाहेर गेल्या. त्यांत पांच बुद्धिमंत व पांच मूर्ख अशा होत्या. ज्या मूर्ख त्यांनी आपल्या मशाली घेतल्या, पण आपल्याबरोबर तेल घेतलें नाहीं. परंतु बुद्धिमंतींनी आपल्या मशालींबरोबर आपल्या बुधल्यांत तेल घेतलें. आणि वराला उशीर झाला असतां, त्या सर्वांस डुकल्या येऊन झोंप लागली. तेव्हां मध्यरात्रीं अशी हाक झाली कीं, ‘पाहा, वर येतो आहे; त्याच्या भेटींस बाहेर चला.’ मग त्या सर्व कुमारी उठल्या, आणि त्यांनी आपल्या मशाली नीट केल्या, तेव्हां मूर्खांनी बुद्धिमंतींनीस ह्मटलें, तुमच्या तेलांतून आह्मास द्या, कां कीं आमच्या मशाली विझून जातात. तेव्हां बुद्धिमंत कुमारींनी उत्तर केलें कीं, ‘कदाचित् आह्मास व तुह्मास पुरणार नाहीं, तर त्यापेक्षां तुह्मी विकणाऱ्यांजवळ जा, आणि आपल्याकरितां विकत घ्या.’ मग त्या विकत घ्यावयास गेल्या, इतक्यांत वर आला, आणि ज्या सिद्ध होत्या त्या त्याच्याबरोबर लग्नास आंत गेल्या, मग दार बंद झालें. नंतर त्या दुसऱ्या कुमारी मागून येऊन ह्मणतात, ‘हे प्रभु, प्रभु, आह्मासाठीं उघड.’ परंतु तो बोलला, ‘मी

तुह्मास खचीत सांगतों, मी तुह्मास ओळखत नाहीं.' यास्तव तुह्मी जागे व्हा, कां कीं ज्या दिवसीं किंवा ज्या घटकेस मनुष्याचा पुत्र येईल ती तुह्मास कळली नाहीं."

"अणखी असीहि उपमा आहे कीं, एका प्रवासास जाणाऱ्या माणसाने आपल्या चाकरांस बोलाविलें, आणि आपल्या मालमत्ता त्यांस सोपिल्या. आणि त्याने एकाला तर पांच मण पैका, आणि एकाला दोन, आणि एकाला एक, प्रत्येकास त्याच्या योग्यतेप्रमाणें असें दिल्हें; आणि लागलाच प्रवासास गेला. मग ज्याने पांच मण घेतले त्याने जाऊन त्याचा व्यापार केला, आणि दुसरे पांच मण मिळविले. तसेंच ज्याने दोन घेतले त्यानेंहि दुसरे दोन मिळविले. परंतु ज्याने एक घेतला त्याने जाऊन भूमी खणिली, आणि तींत आपल्या धन्याचा पैका लपविला. मग बहुत काळानंतर त्या चाकरांचा धनी येऊन त्याचा हिशोब घेऊं लागला. तेव्हां ज्याने पांच मण



पैका घेतला तो येऊन अणखी पांच मण सादर करून बोलला, 'हे प्रभू, त्वां मला पांच मण सोपिले; पाहा, म्या

त्यांवर अणखी पांच मण मिळविले.’ तेव्हां त्याचा धनी त्याला बोलला, ‘बरें, उत्तम विश्वासू चाकरा, तूं थोडक्यावर विश्वासू झालास, मी तुला बहुतांवर ठेवीन, तूं आपल्या धन्याच्या सुखांत ये.’ आणि ज्याने दोन मण घेतले तोहि येऊन बोलला, ‘हे प्रभू, त्वां मला दोन मण सोंपिले; पाहा, म्या अणखी त्यांवर दोन मण मिळविले.’ त्याला त्याचा धनी बोलला, ‘बरें, उत्तम व विश्वासू चाकरा, तूं थोडक्यांवर विश्वासू ठरलास, मी तुला बहुतांवर ठेवीन तूं आपल्या धन्याच्या सुखांत ये.’ मग ज्याने एक मण पैका घेतला तोहि येऊन बोलला, ‘हे प्रभू, जेथें त्वां पेरिलें नाहीं तेथें तूं कापणारा, आणि जेथें त्वां विखरिलें नाहीं तेथून गोळा करणारा, असा तूं कठोर माणूस आहेस, हें म्या जाणिलें; तर भयामुळें जाऊन म्या तुझा मण पैका भूमींत लपविला. पाहा, तुझें जें तें तुला आहे.’ तेव्हां त्याचा धनी त्याला बोलला, ‘अरे दुष्ट व आळसी चाकरा, जेथें म्या पेरिलें नाहीं तेथें मी कापितों, आणि जेथें म्या विखरिलें नाहीं तेथून गोळा करितों, हें तुला कळलें होतें; तर त्वां माझा पैका सावकाराजवळ ठेवायाचा होता, म्हणजे मी आल्यावर जें माझें तें म्या व्याजासुद्धां घेतलें असतें, यास्तव तो मण पैका त्यापासून घ्या, आणि ज्याजवळ दाहा मण आहेत त्याला द्या; कां कीं ज्या कोणाजवळ आहे त्याला दिल्हें जाईल, आणि त्याला फार होईल; आणि ज्याजवळ नाहीं त्याचें जें आहे तें देखील त्यापासून घेतलें जाईल. आणि त्या निरुपयोगी चाकराला बाहेरील अंधारांत टाका, तेथें रडणें आणि दांत खाणें होईल.

अध्याय ३५.

होणार जें न्याय ठरविणें तें.

या दोन दाखल्यांनी ईश्वराजवळ सर्वकाळ राहाण्याची तयारी करण्याचें अगत्य, व त्याने जें आपल्यास बुद्धि इंद्रियें द्रव्य इत्यादि दिल्हें आहे, त्यांचा यथास्थित उपयोग न करितां त्याची सेवा न करणारा जो त्यास दंड, हीं येशूने क्रमेंकरून दाखविलीं आहेत. नंतर तो न्याय ठरविण्याविषयीं पुढील दाखला बोलला.

"जेव्हां मनुष्याचा पुत्र आपल्या वैभवाने येईल, आणि त्याबरोबर सर्व पवित्र दूत येतील, तेव्हां तो आपल्या वैभवाच्या राजासनावर बसेल; आणि त्यासमोर सर्व राष्ट्रें एकवट केलीं जातील; आणि ज्या प्रकारें मेंढक्या शेरडांपासून मेंढरें वेगळीं करितो, त्या प्रकारें तो त्यांस वेगळें करील. आणि मेंढरांस तो आपल्या उजव्याकडे, आणि शेरडांस आपल्या डाव्याकडे उभें करील.

तेव्हां राजा आपल्या उजव्याकडल्यांस ह्मणेल, 'अहो माझ्या बापाचे आशीर्वादित, तुह्मी या, जें राज्य जगाच्या मांडण्यापासून सिद्ध केलेलें त्याचें वतन घ्या; कारण कीं मी भुकेलों होतों, तेव्हां तुह्मी मला खावयास दिल्हें; मी तान्हेलों होतों, तेव्हां तुह्मी मला प्यावयास दिल्हें; मी विदेशी होतों, तेव्हां तुह्मी मला अंगीकारून घेतलें; उघडा होतों, तेव्हां तुह्मी मला पांघरूण दिल्हें; मी रोगी होतों, तेव्हां तुह्मी माझा समाचार घेतला; मी बंदीशाळेंत होतों, तेव्हां तुह्मी माझ्याजवळ आलां.' त्या काळीं नीतिमान ते त्याला ह्मणतील कीं, 'हे प्रभू, आह्मी तुला भुकेला केव्हां पाहून पोषिलें? आणि तान्हेला केव्हां पाहून प्यावयास दिल्हें? आणि तुला विदेशी केव्हां पाहून

अंगीकारून घेतलें; आणि उघडा केव्हां पाहून पांघरूण दिल्हें? आणि तुला रोगी अथवा बंदिशाळेंत केव्हां पाहून तुजजवळ आलों?' मग राजा त्यांस ह्मणेल, 'मी तुह्मास खचीत सांगतों कीं, या माझ्या भावांतील जे फार लाहान त्यांतून एकाला तुह्मी असें केलें तितक्यावरून मला केलें आहे.'

मग डाव्याकडल्यांसहि तो बोलेल, 'अहो शापग्रस्त-हो, जो सर्वकाळचा अग्नि सैतानासाठीं व त्याच्या दूतांसाठीं सिद्ध केलेला, त्यांत मजपासून जा; कारण कीं मी भुकेलों होतों, आणि तुह्मी मला खावयास दिल्हें नाहीं; मी तान्हेलों होतों, तेव्हां तुह्मी मला प्यावयास दिल्हें नाहीं; मी विदेशी होतों, आणि तुह्मी मला अंगीकारून घेतलें नाहीं; उघडा होतों, आणि तुह्मी मला पांघरूण दिल्हें नाहीं; रोगी व बंदिशाळेंत होतों, आणि तुह्मी माझा समाचार घेतला नाहीं." त्या काळीं हेहि त्याला ह्मणतील कीं, 'हे प्रभू, आह्मी तुला भुकेला, आणि तान्हेला, अथवा विदेशी, अथवा उघडा, अथवा रोगी, अथवा बंदिशाळेंत असें केव्हां पाहून तुझी सेवा केली नाहीं?' तेव्हां तो त्यांस उत्तर देईल कीं, 'मी तुह्मास खचीत सांगतों तुह्मी या फार लाहानांतील एकाला असें केलें नाहीं, तितक्यावरून मलाहि केलें नाहीं. तेव्हां हे निरंतर शासनांत, आणि नीतिमान जे ते निरंतर जीवनांत जातील."

अध्याय ३६.

शिष्यांचे पाय धुणें.

येशू मरणापूर्वीं चार पांच दिवस दिवसास देवळांत उपदेशकरून रात्र बेथानी गांवांत जाऊन घालवीत असे.

एकदां तो आपल्या शिष्यांसुद्धां जेवायास बसला असतां, जेवणावरून उठला, आणि त्याने आपलीं वस्त्रें ठेवून फडक घेऊन आपणाला वेष्टिलें. नंतर तो गंगाळांत पाणी घालून शिष्यांचे पाय धुऊं व ज्या फडक्याने आपण वेष्टिला होता, त्याने पुसूं लागला. मग शीमोन पेत्रसाजवळ आला, तेव्हां तो त्याला ह्मणाला, "हे प्रभू, तूं माझे पाय धुतोस?" येशू बोलला, "जें मी करितों तें तूं आतां जाणत नाहींस, परंतु पुढें जाणसील." पेत्रस त्याला ह्मणाला, "तूं माझे पाय कधींहि धुणार नाहींस." येशूने उत्तर केलें कीं, "जर मी तुला धुणार नाहीं, तर माझ्या बरोबर तुला वांटा नाहीं." तेव्हां शिमोन पेत्रस त्याला ह्मणाला, "हे प्रभू, माझे पाय केवळ नव्हत, परंतु हात व डोकेंहि." येशू ह्मणाला, "ज्याची अंघूळ झाली, त्याला पाय धुण्यापेक्षां अणखी अगत्य नाहीं, परंतु तो सर्वांगीं निर्मळ आहे. आणि तुह्मी निर्मळ आहां, परंतु सर्व नाहीं." त्याचा परस्वाधीन करणारा त्याला ठाऊक होता, यास्तव तो बोलला, "तुह्मी सर्व निर्मळ नाहीं."

त्याने तर त्याचे पाय धुतले, आणि मग आपलीं वस्त्रें घेऊन फिरून जेवावयास बसला असतां, त्याने त्यांस ह्मटलें, "म्या तुह्मास जें केलें तें तुह्मी समजतां काय? तुह्मी मला गुरू व प्रभु असी हाक मारितां, तें ठीक ह्मणतां, कारण कीं मी तसा आहें. यास्तव मी प्रभु व गुरू असतां, जर म्या तुमचे पाय धुतले, तर तुह्मासहि एकमेकाचे पाय धुतले पाहिजेत, कारण कीं जसें म्या तुह्मास केलें तसें तुह्मीहि करावें, ह्मणून म्या तुह्मास उदाहरण दिल्हें आहे. मी तुह्मास खचीत खचीत सांगतों, चाकर आप-

ल्या प्रभूपेक्षां थोर नाहीं, आणि जो पाठविलेला तो आपल्या पाठविणाऱ्यापेक्षां थोर नाहीं; या गोष्टी जर तुह्मी जाणतां आणि त्याप्रमाणें करितां तर तुह्मी धन्य आहां.

अध्याय ३७.

प्रभूचें भोजन.

तेव्हां न फुगलेल्या भाकरीचा दिवस आला. त्यांत वल्हांडणाचा यज्ञपशु मारावयाचा होता. आणि पेत्रस व योहान्न यांस पाठवून त्याने सांगितलें, "आह्मी वल्हांडणाचें जेवण करावें, ह्मणून तुह्मी जाऊन आह्मासाठीं सिद्ध करा." तेव्हां ते त्याला बोलले, "आह्मी कोठें सिद्ध करावें ह्मणून इच्छितोस?" मग तो त्यांस बोलला, "पाहा, तुह्मी नगरांत जात असतां, एक माणूस पाण्याची घागर नेतांना तुह्मास भेटेल; ज्या घरांत तो जातो त्यांत त्याच्यामागें तुह्मी जा; आणि त्या घराच्या धन्याला असें सांगा कीं, गुरू तुला ह्मणतो म्या आपल्या शिष्यांबरोबर वल्हांडणाचें जेवण करावें, असी उतरावयाची जागा कोठें आहे? मग तो तुह्मास सिद्ध केलेली एक मोठी माडी दाखवील, तेथें सिद्ध करा." तेव्हां ते गेले, आणि त्यांस त्याने सांगितल्याप्रमाणें सांपडलें; आणि त्यांनी वल्हांडणाचें जेवण सिद्ध केलें.

मग संध्याकाळीं येशू शिष्यांसुद्धां यरूशालेम शहरास गेला, तो जातांना त्यास वाटेंत एक द्राक्षींचा मळा लागला असें दिसलें. तो बोलला कीं, "मी खरा द्राक्षवेल आहें, आणि माझा बाप शेतकरी आहे. मजमध्यें जो प्रत्येक फांटा फळ देत नाहीं, त्याला तो काढितो; आणि


प्रत्येक जो फळ देतो त्याने अधिक फळ द्यावें ह्मणून तो त्याला शुद्ध करितो. जी गोष्ट म्या तुह्मास सांगितली तिजकडून तुह्मी आतां शुद्ध आहां, तुह्मी मजमध्यें आणि मी तुह्मामध्यें असे राहा; जसा फांटा वेलांत राहिल्यावांचून आपल्या आपण फळ द्यावयास शक्तिमान् नाहीं, तसे तुह्मीहि मजमध्यें राहिल्यावांचून शक्तिमान नाहीं. मी वेल आहें; तुह्मी फांटे आहां. जो मजमध्यें राहतो, आणि मी त्यामध्यें, तोच बहुत फळ देतो; कारण कीं मजवांचून तुमच्याने कांहीं करवत नाहीं. जर कोणी मजमध्यें राहत नाहीं, तर तो फांट्यासारखा बाहेर टाकला जातो, आणि वाळून जातो. मग त्यांस गोळा करून अग्नीमध्यें टाकितात, आणि ते जळून जातात."

याप्रमाणें त्या वेळेस येशूने शिष्यांस बहुत भारी गोष्टी सांगितल्या. "मी तुह्माला पवित्र आत्मा पाठवून देईन," असें वचन त्याने दिलें होतें त्याविषयीं त्याचें आतां फार बोलणें झालें. तें सर्व योहान्नाने लिहिलेल्या शुभवर्त्तमानांत आहे.

ते यरूशालेमांत नेमलेल्या माडीवर जेवीत बसले असतां, येशू शिष्यांस बोलला, "मी तुह्मास खचीत सांगतों कीं तुह्मामधील एक मला परस्वाधीन करील." तेव्हां ते फार खिन्न होऊन त्यांतील एकेक त्याला ह्मणूं लागला, "तो मी आहें कीं काय?" तेव्हां तो बोलला, "जो माझ्या बरोबर पात्रांत हात घालितो तोच मला परस्वाधीन करील. मनुष्याच्या पुत्राविषयीं जसें लिहिलें आहे तसी त्याची गति होत्ये खरी, परंतु ज्याकडून मनुष्याचा पुत्र परस्वाधीन केला जातो, त्या माणसाला हायहाय! जर

तो माणूस जन्मला नसता तर तें त्याला बरें होतें." तेव्हां त्याला परस्वाधीन करणारा जो यहूदा तो बोलला, "हे स्वामी, तो मी आहें कीं काय ?" येशू त्याला ह्मणाला, "तूं बोललास, तसेंच आहे."

आणि ते जेवीत असतां येशूने भाकर घेतली, आणि स्तवन करून मोडिली; मग शिष्यांस दिल्ही, आणि



ह्मटलें, "घ्या, खा, हें माझें शरीर आहे." नंतर प्याला घेऊन उपकारस्तुति करून त्याने त्यांस दिल्हा, आणि ह्मटलें, "यांतून तुह्मी सर्व प्या. कारण कीं हें माझें रक्त आहे. तें नव्या कराराचें आणि बहुताकरितां पापांची क्षमा होण्यासाठीं ओतिलें, असें आहे. आणि मी तुह्मास सांगतों कीं, मी आपल्या बापाच्या राज्यांत तुह्माबरोबर नवा पिईन, त्या दिवसापर्यंत मी आतांपासून द्राक्षवेलाचा हा उपज पिणारच नाहीं."

याप्रमाणें आमचा प्रभु तारणारा जो येशू, त्याने दुःख व मरण यांचे दिवस जवळ आले आहेत, असें जाणून हा प्रभुभोजन नामक संस्कार स्थापिला; आपली आठवण

शेवटपर्यंत लोकांस असावी, व आपलें मरण शेवटपर्यंत लोकांस प्रगट होत जावें, यांसाठीं.

अध्याय ३८.

गेथसेमानी बागांत येशूचें असणें.

भोजन होऊन गीत गाइल्यावर, तो आपल्या शिष्यांसुद्धां शहराबाहेर जाऊन जाईताच्या डोंगरावर गेला. तेव्हां वाटेंत त्याने शिष्यांस ह्मटलें कीं, ‘ तुह्मी सर्व आजच्या रात्रीं मजविषयीं अडखळाल; कारण असें लिहिलें आहे कीं, ‘मी मेंढक्यास मारीन, आणि कळपाच्या मेंढरांची दाणादाण होईल;’ परंतु मी उठल्यानंतर तुमच्या पुढें गालीलांत जाईन.”

पेत्रस त्याला बोलला, “जरी इतर तुजविषयीं अडखळले तरी मी अडखळणार नाहीं.” येशू त्याला ह्मणाला, “मी तुला खचीत सांगतों कीं याच रात्रीं कोंबडा ओरडल्यापूर्वी तूं मजविषयीं तीन वेळा नाकबूल होसील.” पेत्रस त्याला ह्मणाला, “जरीं तुजबरोबर मला मरावें लागलें, तरी मी तुजविषयीं नाकबूल होणार नाहीं.” आणि सर्व शिष्यांनींहि तसेंच ह्मटलें.

मग येशू शिष्यांसुद्धां जाईताच्या डोंगरावर गेथसेमाने बागेंत गेला आणि शिष्यांस ह्मणाला, “मी पलिकडे जाऊन प्रार्थना करीं तोंपर्यंत तुह्मी एथें बसा.” मग तो पेत्रसाला व जेबेदीच्या दोन पुत्रांस बरोबर घेऊन खिन्न आणि कष्टी होऊं लागला; आणि त्यांस ह्मणाला, “माझा जीव मरणासारखा फार कष्टी आहे ; तुह्मी एथें राहा, आणि मजबरोबर जागरण करा.”

मग कांहींसा पुढें जाऊन पालथा पडून त्याने असी प्रार्थना केली कीं, "हे माझ्या बापा, जर साधेल, तर हा प्याला मजपासून जावो, परंतु माझी इच्छा आहे तसें नको, तर तुझी इच्छा आहे तसें होवो." मग तो शिष्यांजवळ आला, आणि ते झोंपी गेले असें पाहून तो पेत्रसाला ह्मणाला, "असेंच काय? एक घटिकाहि माझ्याबरोबर तुमच्याने जागरण करवत नाहीं काय? तुह्मी परीक्षेत न यावें ह्मणून जागृत राहा, आणि प्रार्थना करा. आत्मा मान्य आहे, परंतु देह अशक्त." मग दुसऱ्याने जाऊन त्याने असी प्रार्थना केली कीं, "हे बापा, हा प्याला म्या प्याल्यावांचून मजपासून जात नाहीं, तर तुझ्या इच्छेप्रमाणें होवो." मग त्याने येऊन ते झोंपी गेले असें दुसऱ्याने पाहिलें, कां कीं त्यांचे डोळे जड झाले होते.

नंतर त्यांस सोडून फिरून जाऊन त्याने तिसऱ्याने तेच शब्द बोलून प्रार्थना केली. तेव्हां आकाशांतून दूत त्यांस शक्ति देतां त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां फार कष्टी होऊन त्याने अधिक आग्रहाने प्रार्थना केली; आणि त्याचा घाम रक्ताच्या थेंबासारखा भूमीवर पडला.

पाप ईश्वरास किती नावडतें, आणि करणाऱ्यास घातक कसें हें समजलें पाहिजे, तर या येशूच्या अवस्थेकडे लक्ष द्यावें. याला एवढें दुःख होण्याचें काय कारण? तें दुःख शरीराचें होतें काय? नाहीं; कारण इतर लोकांनी स्वधर्मासाठीं जीवहि दिल्हे, आणि मरते वेळेस शत्रूंच्या हातानी पराकाष्ठेचीं दुःखें मोठ्या आनंदाने भोगिलीं; आणि येशू त्यांपेक्षांहि मोठा धैर्यवान होता यांत संशय

नाहीं. अगखीहि, येशूला आपल्या शिष्यांपैकीं एक आपल्यास परस्वाधीन करील, व एक आपल्याविषयीं नाकबूल होईल, व इतर शेवटीं आपल्याला टाकून जातील, असें पूर्वीं कळलें होतें, ह्मणून त्याला हें दुःख झालें काय? नाहीं; कां कीं बहुत लोक शत्रूंच्या स्वाधीन व अपमानित झाले, आणि संकटकाळीं मित्रानी टाकले गेले, तरी त्यांस इतकें दुःख झालें नाहीं. तर त्याचें एवढें दुःख त्याच्या पापापासून झालें कीं काय? नाहीं; त्याने पाप केलें नाहीं, आणि त्याच्या मुखांत कपट सांपडलें नाहीं. तर, "मी लोकांच्या तारणासाठीं आलों, आणि हें माझें येणें निष्फळ होईल." असें वाटून त्याला दुःख झालें काय? नाहीं; त्याचा निश्चय होता कीं मी जय पावेन.

तर त्या महा दुःखाचें कारण एक, पाप, तें त्याचें नव्हे, सर्व जगाचें. त्याने ईश्वरापासीं विश्वासू लोकांचा जामीन होऊन त्यांच्या पापांचा दंड आपल्यावर घेतला. "तो नीतिमान असतां, त्याने अन्यायी याकरितां सोसिलें. ईश्वर त्याला मृदित करायाला मान्य झाला. आपला एकुलता पुत्र त्याने राखिला नाहीं. त्या समयीं ईश्वराची प्रीति त्यापासून लुप्त झाली; काळोखाच्या अधिकाऱ्यानी त्यावर आपल्या मोठ्या पराक्रमाने उडी घातली. हीं त्याच्या दुःखाचें कारण. हीं सदहु दुःखें जीं त्याने सोसिलीं तींच त्या प्याल्यांतील रस होय. बरें, पाहा, यासाठीं त्याचा प्रत्युपकार आह्मी काय केला?

मग ती प्रार्थना संपवून, तो शिष्यांजवळ आला; तों तेव्हांहि ते निजलेले त्याने पाहिले. मग तो शिष्यांस ह्मणाला, "अगखीहि तुह्मी निजतां, व विसांवा घेतां काय?

पाहा घटिका जवळ आली आहे, आणि मनुष्याचा पुत्र पाप्यांच्या हातीं दिल्हा जातो."

अध्याय ३९.

येशूला धरणें, आणि पेत्रसाचें नाकबूल होणें.

यहूदा जो इस्कारी योतेस त्याने तीस रुपये बक्षीस मान्य करून प्रमुख याजकाजवळ कबूल केलें कीं, मी येशूला धरून देतों. येशू वरचेवर गेथसेमानी बागांत जात असे हें त्याला ठाऊक; ह्मणून तरवारी व सोटे बाळगणारे, यांच्या समुदायाचा आपण पुढारी होऊन त्यासुद्धां त्या बागांत गेला. त्याने समुदायास असी खूण सांगितली होती कीं, "मी ज्याचें चुंबन करीन तोच तो, त्याला तुह्मी धरा, आणि बंदोबस्ताने न्या." आणि येशू त्याच्या दृष्टीस पडला तेव्हां त्याने "हे प्रभू, हे गुरू," असें बोलून त्याचें चुंबन घेतलें. येशू त्याला बोलला, "हे यहूदा, तूं चुंबनाने मनुष्याच्या पुत्राला परस्वाधीन करितोस काय?"

आणि त्याच्या पक्षांतील जे ते त्याला ह्मणाले कीं, "हे प्रभू, आह्मी तरवारीने यांला मारूं?" इतक्यांत पेत्रसाने येशूच्या उत्तराची वाट न पाहून, तरवारीने त्यांपैकीं याजकाच्या चाकराचा उजवा कान तोडिला. तेव्हां पेत्रसाला येशू बोलला, "तूं आपली तरवार म्यानांत घाल; बापाने जो प्याला मला दिल्हा, तो म्या न प्यावा काय?" मग येशूने त्याच्या कानास स्पर्श करून बरें केलें. आणि त्यांस कांहीं प्रतिकार केला नाहीं, हें पाहून शिष्य त्याला सोडून पळाले. तेव्हां कोणीएक नागवा तरुण पुरुष

तागाचें वस्त्र पांघरून येशूच्या मागें होता त्यास इतर तरण्यानीं धरिलें. तेव्हां तो पांघरूण टाकून उघडाच पळाला.

मग त्यानी येशूला धरून जलदीने यरूशालेमांत नेऊन प्रमुख याजकापुढें उभें केलें. तेव्हां जरी मध्यरात्र झाली होती, तरी सभा भरली. त्याला दोषी ठरविण्यास्तव त्याला झोंपहि प्रिय नाहींसी झाली. पेत्रस जो, "सर्व अडखळतील, परंतु मी अडखळणार नाहीं," असें बोलला होता, तो दुरून त्याच्यामागें चालत होत्साता, प्रमुख याजकाच्या वाड्यांत आला; आणि आंत जाऊन परिणाम पाहावयास चाकर लोकांमध्यें शेकत बसला, त्या काळीं कोणी दासीने त्याला विस्तवाजवळ पाहून न्याहाळून ह्मटलें कीं, "तूंहि नाजोरेथकर येशू याजबरोबर होतास." परंतु तो नाकबूल होऊन बोलला, "तूं जें ह्मणतीस तें मला कळत नाहीं." मग थोड्या अवकाशानें पुन्हा ती दासी त्याला पाहून, जवळ जे उभे होते त्यांपासीं बोलली कीं, "हा त्यांपैकीं एक आहे." तेव्हां तो फिरून नाकबूल झाला. नंतर अणखी कांहीं वेळाने जवळ उभे राहाणारे त्याला फिरून बोलले कीं, "निश्चयें तूं त्यांतला आहेस, कारण कीं तूं गालीली आहेस, आणि तुझी भाषाहि तसीच आहे." तेव्हां तो शाप देऊं, आणि शपथ वाहूं लागला कीं, "ज्या माणसाविषयीं तुह्मी बोलतां तो मला ठाऊकच नाहीं." हें बोलला, तों लागलाच कोंबडा ओरडला. तेव्हां येशूने मुरडून त्याकडे पाहिलें. नंतर येशू जें बोलला होता कीं, 'तूं कोंबडा ओरडल्या-

पूर्वी तीन वेळां मजविषयीं नाकबूल होसील' तें अठवून तो दरवाज्याबाहेर गेला, आणि फार खिन्न होऊन रडला.

पाहा बरें पेत्रस येशूविषयीं जरी नाकबूल झाला, तरी येशूने त्या अन्यायाचें फळ त्याला दिल्हें नाहीं. केवळ त्याकडे दृष्टि मात्र लाविली.

अध्याय ४०.

येशूचें कायाफापुढें उभें राहणें.

त्या काळीं कायाफा जो मुख्य याजक त्यापुढें येशू उभा होता. त्याला त्याने शिष्य व उपदेश यांविषयीं विचारिलें. येशू ह्मणाला, "मी जगास उघड बोललों; सभेंत व देवळांत, जेथें यहूदी नित्य मिळत असत तेथें म्या नित्य उपदेश केला; आणि गुप्तांत कांहीं बोललों नाहीं. मग मला कां विचारितोस? ज्यानी ऐकिलें त्यांला विचार कीं मी काय बोललों. पाहा जें मी बोललों तें त्यांस ठाऊक आहे." आणि तो हें बोलत असतां हस्तकांतील एक जो जवळ उभा होता, तो येशूला चपडाक मारून बोलला, "तूं प्रमुख याजकाला असें उत्तर करितोस काय?" येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं, "जर मी त्याला वाईट बोललों, तर त्या वाईटाविषयीं साक्ष दे; परंतु जर बरें, तर कां मारितोस?" तेव्हां मुख्य याजक व वडील व संपूर्ण न्यायसभा यानी येशूला जिवें मारायाकरितां त्याविषयीं खोटी साक्ष शोधिली, परंतु त्यास मिळाली नाहीं. बहुत खोटे साक्षी आले होते, परंतु त्यांचें बोलणें एकमेकांस मिळेना. तेव्हां प्रमुख याजक उठून त्याला बोलला, "तूं कांहींच बोलत नाहींस काय? हे तुजविषयीं कसी साक्ष

देतात!" तथापि येशू आपला अंतकाळ जवळ आला होता ह्मणून उगाच राहिला.

फिरून प्रमुख याजकाने त्याला विचारिलें कीं, "जो स्तुतिमान्य, त्याचा पुत्र जो ख्रीस्त तोच तूं आहेस काय?" येशू बोलला, "तो मी आहें; आणि तुह्मी मनुष्याच्या पुत्राला, तो पराक्रमाच्या उजव्याकडे बसलेला असतां, आणि आकाशाच्या मेघावर बसून येतां पाहाल." तोंपावेतों येशूने, 'मी देवाचा पुत्र ख्रीस्त आहें,' असें फारकरून सांगितलें नव्हतें; उपदेश व चमत्कार करणें यावरूनच लोकांस सुचविलें होतें, परंतु त्या वेळेस त्याने स्पष्ट उघड सांगितलें.

तेव्हां प्रमुख याजक आपलीं वस्त्रें फाडून बोलला, "आह्मास अणखी साक्ष्यांचें अगत्य काय? तुह्मी हें दुर्भाषण ऐकिलें; तुह्मास कसें दिसतें?" तेव्हां तो मरणास योग्य आहे, असा सर्वांनी त्यावर मरणाचा दंड ठरविला. तेव्हां जीं माणसें येशूला राखीत होतीं, त्यानी त्याची थट्टा करून त्याला फटके मारिले; आणि त्याचे डोळे बांधून त्याच्या तोंडावर मारिलें, आणि त्याला ह्मटलें कीं, "तुला कोणी मारिलें, हें अंतर्ज्ञानेंकरून सांग."

मग मोठ्या सकाळीं सर्व मुख्य याजक व लोकांचे वडील, यानी येशूला जिवें मारण्यासाठीं एकमेकासीं विचार केला. आणि त्याला बांधून नेऊन पंतयस पिलातस जो सुभेदार त्याच्या स्वाधीन केलें.

तेव्हां तो अन्यायी ठरविला गेला असें यहूदा जो त्याला परस्वाधीन करणारा त्याने पाहून पश्चात्ताप केला, आणि मुख्य याजक व वडील यांजवळ ते तीस रुपये परत

देऊन ह्मटलें, "निर्दोषी रक्त परस्वाधीन केल्याने, म्या पाप केलें आहे." तेव्हां ते बोलले, "तें आह्मास काय ठाऊक?



तूं जाण." मग तो ते रुपये देवळांत टाकून निघाला, आणि त्याने जाऊन गळफांस घेतला. तेव्हां मुख्य याजक ते रुपये घेऊन बोलले, हें रक्ताचें मोल आहे, यास्तव दानकोशांत ठेवावयास योग्य नाहीं." मग त्यानीं एकमेकासीं विचार करून त्या रुपयानीं कुंभाराचें एक शेत परदेश्यांस पुरण्यासाठीं विकत घेतलें; यास्तव तें शेत रक्ताचें शेत ह्मटलें गेलें.

अध्याय ४१.

पिलातस आणि हेरोद यांपुढें येशूचें उभें राहणें.

यहूद्यानीं येशूला सुभेदाराच्या स्वाधीन केलें, परंतु आपण न्यायसभेंत गेले नाहींत, कारण त्यांच्या मनांत आलें कीं, आह्मी या रोमी सभेंत गेलों असतां अशुद्ध होऊं.

ह्मणून पुढें सण जवळ आला आहे, त्याच्या नियमांचें पा-ळन आमच्या हातून घडणार नाहीं, यामुळें पिलातसानें येशूची चौकसी केली तेव्हां ते समक्ष नव्हते.

मी देवाचा पुत्र आहें, असें येशूचें ह्मणणें यहूद्यांनीं पिलातसाला कळविलें नाहीं, कारण मूर्त्तिपूजक असल्या गोष्टी मनावर घेत नाहींत. ह्मणूनच त्यांनीं हा आपल्यास राजा ह्मणवितो असें त्यास समजाविलें; ह्मणून सुभेदारानें त्याला विचारिलें कीं, "यहूद्यांचा राजा तूं आहेस काय?" येशूनें उत्तर दिल्हें कीं, माझें राज्य या जगाचें नाहीं, जर माझें राज्य या जगाचें असतें, तर मी यहूद्यांच्या स्वाधीन न केला जावा ह्मणून माझ्या चाकरांनीं लढाई केली असती; परंतु आतां माझें राज्य एथील नाहीं." तेव्हां पिलातस त्याला बोलला, "तर तूं राजा आहेस कीं काय?" येशूनें उत्तर केलें कीं, "तूं ह्मणतोस तेंच; मी राजा आहें. मी यासाठीं जन्मलों, आणि यासाठीं जगांत आलों कीं, म्या खरेपणाविषयीं साक्ष द्यावी. जो कोणी खरेपणाकडील आहे, तो माझें बोलणें ऐकतो." पिलातस त्याला ह्मणाला, "खरेपण काय आहे?"

असें विचारून तो फिरून यहूद्यांजवळ बाहेर जाऊन ह्मणाला, "याकडे कांहीं अपराध मला दिसत नाहीं." मग ते आग्रह धरून बोलले कीं, "तो गालीलापासून आरंभ करून एथपर्यंत संपूर्ण यहूद्यांस शिकवीत असतां, लोकांस चिथावून उठवितो." तेव्हां पिलातसानें गा-लील असें ऐकून विचारिलें कीं, "हा माणूस गालिली आहे कीं काय?" आणि तो हेरोदाच्या अधिकारांतील

आहे, असें जाणून त्याने त्याला हेरोदाकडे पाठविलें. तोहि त्या दिवसांत यरूशालेमामध्यें होता.

मग हेरोद येशूला पाहून फार संतोष पावला; कारण कीं त्याविषयीं बहुत ऐकिल्यावरून त्याने त्याला पाहावयास फार वेळ इच्छिलें होतें; आणि त्याने केलेला कांहीं चमत्कार पाहावा, असी त्याला आशा होती. तेव्हां त्याने त्याला बहुत गोष्टींविषयीं विचारिलें; परंतु त्याने त्याला कांहीं उत्तर दिल्हें नाहीं. तेव्हां प्रमुख याजक व शास्त्री यानी उभें राहून आग्रहाने त्यावर दोष ठेविले. आणि हेरोदाने आपल्या शिपायांसुद्धां त्याचा धिक्कार करून व थट्टा करून त्याला तेजस्वी वस्त्रें लेववून माघारें पिलातसाजवळ पाठविलें.

आणि त्याच दिवसीं पिलातस व हेरोद हे परस्पर मित्र झाले; कां कीं त्यांचें पूर्वीं वैर होतें. याप्रमाणें वाईट कर्मावरून दुष्ट लोकांची परस्पर मैत्री होती.

ज्याला समुदायानी मागावें त्या एका बंदिवानास त्या लोकांकरितां सणांत सुभेदार सोडून देत असे. त्या वेळेस त्याजवळ बाराब्बा नामक एक बंदिवान् होता. यहूद्यास पिलातसाने विचारिलें, “म्या तुह्माकरितां कोणाला सोडावें ह्मणून इच्छितां? बाराब्बाला किंवा येशू जो ख्रीस्त ह्मटलेला त्याला? येशूला त्यानी हेव्याने परस्वाधीन केलें, हें त्याला ठाऊक होतें. तेव्हां तो न्यायासनावर बसला असतां त्याच्या बायकोने त्याला असें सांगून पाठविलें कीं, “तुसीं आणि त्या नीतिमानासीं कांहीं नसावें, कारण कीं म्या आज स्वप्नांत त्यासाठीं फार सोसिलें आहे.” तथापि बाराब्बाला मागावें आणि येशूचा घात करावा,

ह्मणून मुख्य याजक व वडील यानी समुदायास सुचविलें. तेव्हां सुभेदार बोलला, "बाराब्बा व येशू, या दोघांतून म्या कोणाला सोडावें ह्मणून इच्छितां?" समुदायाने सांगितलें, "बाराब्बाला." पिलातस त्यांस बोलला, "तर येशू जो ख्रीस्त ह्मटलेला, त्याला म्या काय करावें? सर्व त्याला बोलले, "तो वधस्तंभीं दिल्हा जावा." तेव्हां सुभेदार बोलला, "कशाकरितां ? त्याने काय वाईट केलें?" परंतु ते अधिकच ओरडून बोलले कीं, "तो वधस्तंभीं दिल्हा जावो." तेव्हां आपलें कांहींच चालत नाहीं केवळ गडबड मात्र अधिक होती, हें पाहून पिलातसाने पाणी घेऊन समुदायापुढें आपले हात धुऊन ह्मटलें कीं, "या नीतिमानाच्या रक्ताविषयीं मी निर्दोष आहें; तुह्मीच पाहा." त्यावर सर्व लोक बोलले, त्याचें रक्त आह्मावर व आमच्या लेंकरांवर असो." पाहा, त्यांचें अंधळेपण व कठोरपण केवढें ! त्यानी आपल्यावर निखाऱ्यांचें पांघरूण ओढून घेतलें, आणि आजपर्यंत त्याखालीं जळत आहेत.

अध्याय ४२.

येशूला मारण्यासाठीं यहूद्यांच्या हातीं देणें.

पिलातसाने येशूला जरी निरपराधी ठरविलें तरी त्याला फटके मारिले; आणि हस्तकानी त्याच्या डोईवर कांट्यांचा गुंफलेला मुगुट, व आंगांत जांभळा झगा घातला, आणि उजव्या हातांत वेत देऊन ह्मटलें, "हे यहूद्यांच्या राजा, सुखरूप ऐस." अणखी त्याला चपडाका मारिल्या. भविष्य लेख आहे कीं, "त्याच्या क्षतांकडून आह्मास आ-

रोग्य झालें आहे." नंतर पिलातस फिरून बाहेर जाऊन लोकांस बोलला, "पाहा, मला त्याकडे कांहीं अपराध दिसत नाहीं, हें तुह्मास कळावें, ह्मणून मी त्याला तुह्माकडे बाहेर आणितों." मग येशू कांट्यांचा मुगुट आणि जांभळा झगा घातलेला बाहेर आला. तेव्हां पिलातस त्यांस बोलला, "हा माणूस पाहा." तेव्हां मुख्य याजक व हस्तक यानी त्याला पाहिलें, आणि ते ओरडत बोलले, "याला वधस्तंभीं दे; वधस्तंभीं दे." पिलातस त्यांला बोलला, "तुह्मीच त्याला घेऊन वधस्तंभीं द्या, कारण मला त्याकडे कांहीं दोष सांपडत नाहीं." यहूदी ह्मणाले, आह्मास शास्त्र आहे, आणि आमच्या शास्त्राप्रमाणें त्याला मरावें लागतें, कां कीं त्याने आपल्यास देवाचा पुत्र ह्मटलें आहे." हें ऐकून पिलातस अधिकच भ्याला; आणि कचेरींत जाऊन येशूला बोलला, "तूं कोण



आहेस?" परंतु येशूने त्याला उत्तर दिल्हें नाहीं. कारण पूर्वीं त्याला कांहीं उत्तर दिल्हें होतें; परंतु पुढें तो सुभेदार

आपल्या मनाची खातरी असतांहि त्याप्रमाणें वागला नाहीं असे जे ईश्वराविरुद्ध चालतात ते नाशास जातात.

पिलातस ह्मणाला, "तूं मजसीं बोलत नाहींस काय? तुला वधस्तंभीं द्यायाचा व सोडायाचा अधिकार मला आहे हें तुला ठाऊक नाहीं काय?" येशू बोलला वरून जर तुला दिल्हा नसता, तर तुला मजवर कांहीं अधिकार नसता; ह्मणून ज्यानीं मला तुझ्या स्वाधीन केलें त्यांचें पाप अधिक." तेव्हांपासून पिलातसाने त्याला सोडण्याविषयीं बहुत यत्न केले; परंतु यहूदी ओरडत बोलले, "जर तूं याला सोडितोस तर काइसाराचा मित्र नाहींस. जो कोणी आपणाला राजा ह्मणवितो तो काइसाराला विरुद्ध बोलतो." पिलातसाने ही गोष्ट ऐकून येशूला वधस्तंभीं द्यायास त्यांच्या स्वाधीन केलें.

आणि लोकांचा व स्त्रियांचा मोठा समुदाय त्यामागून चालला. आणि ह्या त्यासाठीं बडवून घेऊन शोक करीत होत्या. प्रेषितहि त्याच्या पक्षांतील आह्मी असें प्रसिद्ध करावयास भ्याले; परंतु या स्त्रियांचें कितीं धैर्य पाहा! ह्या त्याला अनुसरून त्यासाठीं अश्रुपात करावयास भ्याल्या नाहींत, त्यांकडे मुरडून येशू बोलला, "अहो यरूशालेमांतील कन्या हो, तुह्मी मजविषयीं रडूं नका, आपणाविषयीं व आपल्या लेंकरांविषयीं रडा; कां कीं ओल्या झाडास जर हे असें करितात तर वाळलेल्याचें काय होईल?"

अशा मोठ्या दुःखांतहि येशूने इतरांकडे लक्ष्य लाविलें; व त्यांविषयीं फार काळजी केली. त्याच समयीं लवकर मोठें अरिष्ट जें यहूद्यांवर येणार त्याकडे लक्ष लाविलें होतें.

अध्याय ४३.

येशूला वधस्तंभावर देणें.

गलगथा नामें जागा, ह्मणजे कंवटीची जागा, तेथें येऊन पिठासीं मिसळलेली आंब त्याला प्यायास दिल्ही. हा अमली पदार्थ होय, ह्मणून ज्याला जिवें मारायाचें त्याला त्या दुःखाचा फार अनुभव न होण्यासाठीं प्याव-यास देत असत; परंतु आपण सावध असावें ह्मणून येशू ती पिईना.

याप्रमाणें आमचा तारणारा जो न्यायी व पवित्र, तो माझ्या तुमच्या व सर्व जगाच्या पापासाठीं वधस्तंभावर खिळिला गेला.

त्याबरोबर दुसरे दोन अपराधी एक त्याच्या उजवी-कडे आणि एक डावीकडे, असे वधस्तंभीं दिल्हे, असा भविष्यलेखाप्रमाणें, "तो अपराध्यांत मोजला गेला." हें क्रूरकर्म रोमी शिपायानी केलें. परंतु येशूने तेव्हांहि त्यां-साठीं प्रार्थना केली कीं, "हे बापा, यांची क्षमा कर, कारण हे काय करितात हें यांस ठाऊक नाहीं." असले क्रूर शत्रू यांसाठीं जर त्याने त्यांच्या कल्याणार्थ प्रार्थना केली, तर आमच्या शत्रूंसाठीं किती विशेषेंकरून आह्मास प्रार्थना केली पाहिजे!

त्याला वधस्तंभीं दिल्ह्यावर शिपायानी त्याचीं वस्त्रें घे-ऊन, प्रत्येक शिपायासाठीं एक विभाग असे चार विभाग केले; परंतु त्याचा अंगरखा विणलेला शिवणीवांचून होता सबब त्याचे विभाग न करितां तो कोणी घ्यावा याविषयीं पण घातला. याप्रमाणें "त्यानी आपणामध्यें माझीं वस्त्रें वांटून घेतलीं, आणि माझ्या पांघरूणांवर पण घातला."

असा जो शास्त्रलेख तो पूर्ण झाला. पिलातसानें एक लिहिलेली पट्टी तेव्हां त्याच्या वधस्तंभावर लाविली. तिजवर इब्री व रोमी व ग्रीक या तीन लिपींत असें लिहिलें होतें कीं, "येशू नाजोरेथकर, जो यहूद्यांचा राजा." मारण्याचें कारण सर्वांस समजण्यासाठीं ते असी पट्टी वधस्तंभावर लावीत असत. परंतु हें लिहिणें यहूद्यानी गैरमान्य केलें, आणि पिलातसाला ह्मटलें कीं, "मी यहूद्यांचा राजा,' असें हा ह्मणतो, याप्रमाणें लिही." पिलातस ह्मणाला, "म्या जें लिहिलें तें लिहिलें." तेव्हां ते लोक व याजक व शिपाई हे येशूला धिक्कारून बोलले, "तूं ईश्वराचा पुत्र आहेस, तर वधस्तंभावरून उतर." त्यानें उघड इतके मोठे चमत्कार केले तरी त्यांची खातरी झाली नाहीं.

मग टांगलेल्या अपराध्यांतील एक निंदा करून त्याला बोलला, "तूं ख्रीस्त आहेस तर आपल्यास आणि आह्मास तार." परंतु दुसऱ्यानें त्याचा निषेध करून ह्मटलें कीं, "तूं याच दंडांत असतां, देवाचें भय अगदी धरीत नाहींस काय? आपण न्यायानें वधस्तंभीं दिल्हे गेलों, कारण आपण जीं केलीं त्यांचीं फळें भोगितों; परंतु यानें कांहीं वाईट केलें नाहीं." नंतर तो येशूला बोलला, "हे प्रभू, तूं आपल्या राज्यांत येसील, तेव्हां माझी आठवण कर." पाहा बरें, याचा पश्चात्ताप केवढा! हा आपलीं पापें पदरांत घेतो, व सोबत्याचा निषेध करितो, आणि असल्या अवस्थेंत वधस्तंभावर होता तरी लोकांसमोर हा तारणारा मला तारील असा आपला निश्चय त्यानें दाखविला. तेव्हां येशू त्याला बोलला, "मी तुला खचीत सांगतों, तूं

आज माझ्याबरोबर लोकांत सौख्य होसील." त्या काळीं येशूने असल्या संकटांत असूनहि त्या दीन माणसाचें किती सांत्वन केलें; त्याला सर्वकाळचें जीवनहि दिल्हें.

तेव्हां येशूच्या वधस्तंभाजवळ त्याची आई, आणि मारया जी त्याची मावसी, आणि मारया माग्दालीण या उभ्या होत्या; यास्तव येशू आईला आणि ज्या शिष्यावर त्याने प्रीति केली त्याला जवळ उभे राहतां पाहून आपल्या आईला ह्मणाला, "आई, पाहा, तुझा पुत्र." नंतर त्या शिष्याला बोलला, "पाहा, तुझी आई." मग तेव्हांपासून त्या शिष्याने तिला आपल्यामध्यें घेतलें. तिला काळजी व संकटें किती प्राप्त होतील, हें येशूला ठाऊक ह्मणून त्याने आपल्या प्रिय आईची आणि प्रिय शिष्याची गांठ घालून दिल्ही. या उदाहरणाने आईबापांचा सन्मान व यथाशक्ति त्यांचें पालन हीं करण्याची रीति शिकावी.

त्या दिवशीं दुपारपासून तिसरा प्रहरपर्यंत सर्व देशावर अंधकार पडला, आणि सुमारें तिसऱ्या प्रहरीं येशू ओरडून बोलला, "माझ्या देवा, माझ्या देवा, तूं आह्माला कां टाकून दिल्हें!" नंतर अवघीं आतां पूर्ण झालीं हें जाणून येशू शास्त्रलेख पूर्ण व्हावा ह्मणून बोलला, "मला ताहान लागली आहे." तेथें आंबीने भरलेलें एक भांडें ठेविलें होतें, त्यांत त्यांनी स्पंज बुडवून काठीवर ठेवून त्याच्या तोंडाशीं लाविलें. ती आंब घेतल्यावर येशूने ह्मटलें, "पूर्ण झालें आहे." आणि मोठ्याने ओरडून बोलला, "हे बापा, माझा आत्मा तुझ्या हातांत सोपून देतों. हें बोलून त्याने मस्तक लववून प्राण सोडिला.

मस्तक लवविण्यावरून ईश्वराच्या स्वाधीन होणें दाख-

विलें. त्याने आपल्या बापाच्या हातांत आत्मा सोपून दिल्हा, तसें आह्मी केलें पाहिजे, जर आमच्या आकाशांतील बापाच्या हातांत जीवात्मा दिल्हा, तर तो किती निर्भयपणाने मरणाच्या द्वारापासून जाईल; ह्मणून त्याच्या स्वाधीन ठेविला पाहिजे कीं नको ? त्याच्या स्वाधीन केला तर तो घेईल व राखील, आणि सर्वकाळच्या वैभवाच्या मुगुटाने त्याला सर्वकाळ सुशोभित करील.

त्याने प्राण सोडितांच देवळांतील पडदा फाटून त्याचे दोन विभाग झाले. तो पडदा फार उंच आणि जाड बुटीदार सुशोभित असा केलेला, देवळांतील पवित्र स्थानाच्या सीमेवर होता. त्याच वेळेस तेथें उपाध्या सोन्याच्या वेदीवर धूप जाळीत असे. तो पडदा ईश्वराच्या पराक्रमाने दुभंग झाला. आणि ज्यांत प्रमुख याजक मात्र वर्षांत एकदां जाऊन बसत असे, तें स्थान उघड झालें, हें पाहून त्याला किती भय झालें असेल ? यावरून सुचविलें गेलें कीं देऊळ व अर्पणें हीं नाहींसीं होण्याचा दिवस आला; कारण हेंच एक मोठें अर्पण ज्याचीं प्रतिरूपें कोंकरें वगैरेंचीं अर्पणें होतीं, तें हें आतां अर्पिलें.

आणि तेव्हां भूमिकंप झाला व खडक फुटले. आणि थडीं उघडलीं, व निद्रित झालेले जे पवित्र लोक, त्यांतील बहुतांचीं शरीरें उठून ते पवित्र नगरांत गेले, व बहुतांस प्रगट झाले.

तेव्हां शतपति आणि अन्य जे येशूची राखण करीत होते ते तीं भूमिकंपादिक पाहून फार भ्याले आणि ह्मणाले, "हा देवाचा पुत्र होता, खरा." आणि सर्व समुदाय जे

पाहण्याकरितां जमले होते ते झालेल्या गोष्टी पाहून आपलें ऊर बडवून माघारें गेले.

अध्याय ४४.

येशूला कबरेंत ठेविलें.

तो ज्या दिवशीं मरण पावला तो शुक्रवार होता. शनिवार इस्राएलांचा पवित्र दिवस त्या दिवशीं त्याने वधस्तंभावर न राहावें ह्मणून यहूद्यांनीं सुभेदारापाशीं त्याचे पाय मोडून त्यास उतरून घेण्याविषयीं परवानगी मागितली त्यावरून त्यानीं दिल्ही. वधस्तंभावर दिल्हेल्याचे पाय सोट्याने मोडणें असी त्यांची चाल होती. मग शिपायांनीं जाऊन त्या दोघां अपराध्याचे पाय मोडिले आणि येशूचा जीव गेला असें समजून त्याचे पाय मोडिले नाहींत. परंतु एका शिपायाने भाल्याने त्याला कुशींत टोंचलें, ह्मणून त्याच्या शरीरांतून रक्त व पाणी वाहिलें. यावरून हे दोन शास्त्रलेख पूर्ण झाले; एक, "त्याचें हाड मोडलें जाणार नाहीं," हा; आणि दुसरा, "ज्याला त्यानीं भोसकिलें त्याकडेस ते दृष्टि लावितील," हा.

नंतर यहूद्यांचें हारिमाथाई नगर यांतील योसेफ जो सभासद व चांगला नीतिमान त्याने या यहूद्यांच्या कृत्यास संमत दिल्हें नव्हतें; कारण तो येशूचा शिष्य होऊन ईश्वराच्या राज्याची वाट पाहत होता; परंतु यहूद्यांच्या भयामुळें त्याने आपली ती वृत्ति झांकिली होती. त्याने धैर्याने पिलातसाजवळ जाऊन येशूचें शरीर मागितलें. तेव्हां तो इतक्यांत मेला याविषयीं पिलातसाने आश्चर्य केलें. मग त्याने जमादाराला बोलावून विचारिलें कीं, "तो मरून

कांहीं वेळ झाला कीं काय ?" त्या काळीं जें झालें तें त्या जमादारापासून समजल्यावर, त्याने येशूचें शरीर योसेफाला दिल्हें. नंतर त्याने तागाचें वस्त्र विकत घेऊन प्रेत खालीं काढिलें. तेव्हां निकदेमस जो पहिल्याने रात्रीं येशूजवळ आला होता, तो बोळ व अगरू मिळून शंभर शेर घेऊन तेथें आला. त्यानी येशूचें शरीर घेऊन यहूद्यांच्या उत्तरकार्याच्या रीतीप्रमाणें त्या सुगंध द्रव्यासुद्धां प्रेत वस्त्रानीं गुंडाळिलें.

आणि तो जेथें वधस्तंभीं दिल्हा त्याजवळ एक मळा होता. त्यांत एक, ज्यांत तोंपर्यंत प्रेत ठेविलें नव्हतें असें थडें होतें. तें त्या योसेफाचेंच; त्यांत तें प्रेत ठेविलें.

दुसऱ्या दिवसीं मुख्य याजक व फारिशी मिळून पिलातसाजवळ बोलले, "हे प्रभू, तो ठक जिवंत असतांना बो-



लला कीं, "तिसऱ्या दिवसीं मी उठेन, असी आह्मास आठवण आहे. यास्तव तीन दिवसापर्यंत प्रेतस्थलाचा बंदोबस्त करायास आज्ञा दे; नाहीं तर कदाचित् त्याचे

शिष्य रात्रीं येऊन त्याला चोरून नेतील. आणि लोकांस सांगतील कीं, 'तो मेलेल्यांमधून उठला आहे,' मग शेवटलें ठकविणें पहिल्यापेक्षां वाईट होईल." तेव्हां पिलातस त्यांस बोलला, "तुह्माकडे पाहारा आहे; तुह्मी जा, आणि आपल्या समजुतीप्रमाणें बंदोबस्त करा." मग त्यांनी जाऊन दाराच्या धोंड्यावर शिक्का छापून पाहारा ठेवून प्रेतस्थळाचा बंदोबस्त केला.

अध्याय ४५.

येशूचें उठणें.

तिसऱ्या दिवशीं पाहाटेस मोठा भूमिकंप झाला. कारण कीं प्रभूचा दूत आकाशांतून थड्यापासीं आला; आणि दारापासून धोंडा लोटून त्यावर बसला. त्याचें स्वरूप विजेसारिखें, आणि त्याचें वस्त्र बर्फासारिखें होतें. त्याच्या भयाने पाहारेकरी कांपले, आणि मेल्यासारिखे झाले.

कोणी धार्मिक बायका, ज्या गालीलांतून त्याच्यामागें आल्या होत्या, त्यांनी सुगंध द्रव्यें आणून ठेविलीं; कारण शाब्बाथ दिवस गेल्यावर त्या द्रव्यांनी त्याच्या शरीराला लेपन करावें, असें त्यांच्या मनांत होतें. मग तिसऱ्या दिवशीं त्या मोठ्या सकाळीं त्याच्या थड्यापासीं गेल्या. त्यापैकीं मारया माग्दालीण सर्वांच्या अगोदर पोहंचली. आणि ती पाहाती, तों धोंड ढकलेली, आणि थडें मोकळें, असें होतें. हें पाहून धांवत गेली; आणि पेत्रस व योहान्न या शिष्यांस ह्मणाली कीं, प्रभूला थड्यांतून नेलें; आणि कोठें ठेविलें हें ठाऊक नाहीं. तेव्हां ते दोघे तिकडे जाण्यास निघाले; व त्यांमागून तीहि निघाली.

इकडे असें झालें कीं मारयेच्या मागून निघालेल्या दुसऱ्या स्त्रिया थडग्यापासीं गेल्या, तों त्यांसहि तें रिकामेंच दिसलें. इतक्यांत तेजस्वी दोन दूत त्यांच्या दृष्टीस पडले. ते त्यांस बोलले कीं, "तुह्मी मेलेल्यांत जिवंताचा शोध कां करितां? तो एथें नाहीं; उठला आहे, जा, आणि शिष्य मंडळीस सांगा कीं, 'तुमच्यापुढें जो गालीलांत जाणारा, तो सांगितल्याप्रमाणें जाईल." तेव्हां त्यांस भयानें कांप सुटला आणि त्या थडग्यापासून लवकर निघाल्या.

नंतर पेत्रस व योहान्न हे थडग्यापासीं गेले, तों त्यांत प्रेतवस्त्रें मात्र त्यांच्या दृष्टीस पडलीं. तेव्हां त्यांसहि वाटलें कीं त्याला कोणी काढून नेलें. मेलेल्यांमधून उठण्याविषयीं त्यांस भानच राहिलें नाहीं. नंतर ते घरीं गेले.

परंतु मारया मागदालीण थडग्याजवळ उभी राहिली, आणि रडत असतां तिनें थडग्यांत डोकाविलें; तेव्हां जेथें त्याचें शरीर ठेविलें होतें, तेथें पांढरीं वस्त्रें घातलेले दोन दूत एक डोक्याच्या ठिकाणीं, आणि एक पायांच्या ठिकाणीं असे बसलेले पाहिले. ते तिला बोलले, "बाई तूं कां रडतीस?" ती ह्मणाली, "यासाठीं कीं, माझ्या प्रभूला नेऊन कोठें ठेविलें तें मला ठाऊक नाहीं." ती असें बोलून पाठमोहरी झाली, तों येशूला पुढें उभें राहतां, तिनें पाहिलें; परंतु तो येशू असें ती समजली नाहीं. येशू तिला ह्मणाला, "बाई, तूं कां रडतीस? तूं कोणाला शोधितीस?" तो माळी असें समजून ती त्याला ह्मणाली, "हे दादा, जर त्वां त्याला एथून नेलें असलें, तर त्याला कोठें ठेविलें हें सांग; मग मी त्याला नेईन." येशू तिला ह्मणाला, "हे मारये," ती मुरडून त्याला ह्मणती,

"हे राब्बूनी! ह्मणजे हे गुरू. येशू तिला ह्मणाला, "मला स्पर्श करूं नको; कारण कीं मी आपल्या बापाजवळ अझून चढलों नाहीं. परंतु माझ्या भावांकडे जाऊन त्यांस असें सांग कीं, जो माझा बाप व तुमचा बाप आणि माझा देव व तुमचा देव त्याजवळ मी चढतों."

नंतर ती आपल्या घरास धावत जात असतां, आणि इतर बायका यरूशालेमास जात असतां, तो त्यांस भेटून बोलला, "सुखरूप असा." मग त्यांनीं जवळ येऊन त्याचे पाय धरिले आणि त्याचें भजन केलें. नंतर मारयेने त्या बायकांसुद्धां प्रेषितांपासीं जाऊन तें सर्व वर्त्तमान सांगितलें, परंतु ते त्यावर विश्वासले नाहींत.

अध्याय ४६.

त्याच दिवसीं पेत्रसाला येशूने दर्शन दिल्हें.

त्याच दिवसीं त्या शिष्यांतील दोघे जण एम्माउस नामें गांवास जात होते. तो यरूशालेमापासून पावणेचार कोश लांब आहे; आणि ते ह्या सर्व गोष्टींविषयीं परस्पर संभाषण करीत होते. तेव्हां कोणी जवळ येऊन त्यांच्या बरोबर चालला. तो त्यास बोलला, "तह्मी चालत असतां एकमेकांसीं ज्या गोष्टी काढून म्लानमुख होतां, त्या कोणत्या? मग एक ज्याचें नांव क्लेयपास, तो बोलला तूं यरूशालेमांत केवळ प्रवासी आहेस आणि त्यांत या दिवसांमध्यें ज्या गोष्टी घडल्या त्या तुला ठाऊक नाहींत काय?" तो त्यांस ह्मणाला, "त्या कोणत्या?" ते बोलले, "नाजोरेथकर येशू याविषयींच्या, त्या तो माणूस देवाच्या व अवघ्या माणसांच्या समोर करण्यांत व बोलण्यांत साम-

र्थ्यवान् भविष्यवादी होता; आणि आमच्या प्रमुख याजकानी व अधिकाऱ्यानी मरणाच्या दंडासाठीं त्याला कसें परस्वाधीन करून वधस्तंभीं दिल्हें. परंतु आह्मी आशा करीत होतों कीं, जो इस्राएलांचा उद्धार करणारा तो हाच आहे; आणि या अशा गोष्टी घडल्याला आज तिसरा दिवस आहे. आणि आमच्यांतील कित्येक स्त्रि-



यानीहि आह्मास विस्मित केलें. त्या मोठ्या पाहाटेस थडग्यापासीं गेल्या असतां, आणि त्याचें शरीर त्यांस सांपडलें नसतां, त्यानी येऊन सांगितलें, "तो जिवंत आहे," असें सांगणाऱ्या दूतांचें दर्शनहि आह्मास झालें; आणि आमच्या बरोबरच्यांतून कित्येक थड्याकडे गेले, आणि जसें स्त्रियानी सांगितलें तसेंच त्यांसहि सांपडलें; परंतु त्यानी त्याला पाहिलें नाहीं.

मग तो त्यांस बोलला, "अहो निर्बुद्धी हो, आणि भविष्यवाद्यानी अवघीं जीं सांगितलीं त्यांवर विश्वास धरण्यास मतिमंद हो; ख्रीस्तानें हीं सोसावीं, आणि आपल्या गौरवांत जावें, याचें अगत्य नव्हतें काय?" मग त्यानें मोशे व सर्व भविष्यवादी यांपासून आरंभ करून सर्व शास्त्रांतील आपणाविषयीं ज्या गोष्टी त्या त्यांस समजाविल्या आणि ज्या गांवास ते जात होते त्याजवळ आले. तेव्हां तो पुढें जाण्यासारिखें करीत होता. परंतु ते त्याला आग्रह करून बोलले, "आमच्या संगतीं राहा, कारण कीं सांज जवळ आली आणि दिवस कलला." नंतर तो त्यांच्या बरोबर राहावयास आंत गेला. मग तो त्यांबरोबर जेवायास बसला. तेव्हां असें झालें कीं त्यानें भाकर घेऊन स्तुति केली आणि मोडून त्यांस दिल्ही, तेव्हां त्यांचे डोळे उघडले गेले, आणि त्यानीं त्याला ओळखिलें तेव्हां तो त्यांस अदृश्य झाला. नंतर ते एकमेकांसीं बोलले, "जेव्हां तो वाटेंत आह्मासीं बोलत होता आणि आह्मासाठीं शास्त्र उघडें करीत होता, तेव्हां आह्मामध्यें आमचें हृदय प्रज्वलित नव्हतें काय?"

मग त्याच घटिकेस ते उठून यरूशालेमास माघारें गेले, आणि त्यांस ते अकरा व त्यांचे संगतीचे जे, ते एकवटलेले सांपडले. आणि त्यानीं सांगितलें कीं, "प्रभू उठला आहे खरें, आणि शिमोनाला दिसला आहे." मग यानीं वाटेंतील गोष्टी, आणि तो भाकर मोडण्यानें त्यांस कसा ओळखला गेला, हें सांगितलें.

आणि ते या गोष्टी सांगत असतां, येशू स्वतां त्यांच्यामध्यें उभा राहिला, आणि त्यांस ह्मणाला, "तुमचें कल्याण

असो." परंतु ते घाबरले, आणि भयभीत होऊन आपण भूत पाहिलें, असें त्यांस वाटलें. मग तो त्यांस बोलला, "तुह्मी कां घाबरलां आहां? आणि तुमच्या हृदयांत विचार कां उठतात? माझे हात आणि माझे पाय यांस पाहा कीं स्वतां मी आहें; मला चांचपा आणि पाहा; कां कीं जसीं मला मांस व हाडें आहेत ह्मणून तुह्मी पाहतां तसीं भूतांला नाहींत." आणि हें बोलून, त्याने आपले हात आणि पाय त्यांस दाखविले. तेव्हांहि ते आनंदामुळें विश्वास न ठेऊन आश्चर्य करीत असतां, तो त्यांस बोलला, "तुह्माजवळ एथें कांहीं भक्ष्य आहे काय?" मग त्यानी त्याला भाजलेल्या माशाचा तुकडा, आणि मोहळाचें कांहीं दिल्हें, आणि त्याने घेऊन त्यांच्या समक्ष खाल्लें.

अध्याय ४७.

थोमा, आणि इतर प्रेषित यांला येशूने दर्शन दिल्हें.

पूर्वीं ज्या प्रेषितांस येशूने दर्शन दिल्हें, त्यांत थोमा नव्हता; ह्मणून त्या प्रेषितानी थोमाला सांगितलें कीं, "आह्मी प्रभुला पाहिलें आहे." तो त्यांस ह्मणाला, "मी त्याच्या हातांस खिळ्यांची खूण पाहिल्यावांचून, आणि तींत बोट व कुशींत हात घातल्यावांचून, विश्वास धरणारच नाहीं."

नंतर आठ दिवसानी शिष्य एकत्र जमले होते, आणि त्यांत थोमाहि होता; तेव्हां दारें बंद केलीं असतां, येशू येऊन मध्यें उभा राहून बोलला, "तुह्मास शांति असो." नंतर थोमाला बोलला, "माझ्या हातांत बोट व कुशींत

हात घालून पाहा, आणि अविश्वासी होऊं नको, परंतु विश्वासी हो." तेव्हां थोमा बोलला, "माझा प्रभु, आणि माझा देव येशू ह्मणाला, "हे थोमा, त्वां मला पाहून विश्वास धरिला; परंतु जे न पाहून विश्वास धरितात ते धन्य."

नंतर ते शिष्य मासे धरण्यास गेले; आणि एका रात्रीं उजाडे तों त्यानी जाळीं टाकून खटपट केली, परंतु त्यांस कांहीं सांपडलें नाहीं. सकाळीं येशू तीरीं येऊन उभा राहिला, परंतु त्यानी त्याला ओळखिलें नाहीं. येशू त्याला बोलला, "अरे मुलानो, तुह्माजवळ कांहीं खायास आहे काय!" ते ह्मणाले, "नाहीं." मग तो बोलला, "तुह्मी तारवाच्या उजव्या बाजूस जाळें टाका, ह्मणजे तुह्मास मिळेल." यास्तव त्यानी तिकडे टाकिलें. मग माशांच्या घोळक्यामुळें ते त्यांच्याने ओढवेना. तेव्हां योहान्न पेत्रसाला बोलला, "प्रभुच आहे." हें ऐकून पेत्रस उडी टाकून पोहत तीरीं आला.

मग ते सर्व तीरीं उतरले असतां, कोळशांच्या विस्तवावर घातलेली मासळी आणि भाकर त्यानी पाहिली. नंतर तें जाळें काठीं ओढलें तेव्हां त्यांत एकशें त्रेपन मोठे मासे होते; आणि इतकें ओझें होतें, तरी तें जाळें तुटलें नाहीं.

मग येशू त्यांस बोलला, "या, जेवा," तेव्हां तो प्रभु आहे हें जाणून तूं कोण आहेस हें पुसावयास शिष्यांतील कोणी धजला नाहीं. आणि येशूनें भाकरी व मासळी घेऊन त्यांला दिल्ही.

नंतर ते सर्व जेवल्यावर, येशू शीमोन पेत्रसाला बोलला, "योनाच्या पुत्रा शीमोना, तूं मजवर यापेक्षां अधिक

प्रीति करितोस काय?" तो बोलला, "हे प्रभू, होय, मी तुजवर प्रीति करितों, हें तुला ठाऊक आहे." या बोलण्यावरून मी सर्वांपेक्षां अधिक प्रीति करितों, असा जो त्याचा अभिमान होता, तो गळाला असें समजावें. येशू त्याला ह्मणाला, "तूं माझ्या कोंकरांस चार." नंतर पुन्हा तो बोलला कीं, "योनाच्या शीमोना, मजवर प्रीति करितोस काय?" तो बोलला, "हे प्रभू, मी तुजवर प्रीति करितों, हें तुला ठाऊक आहे." येशू बोलला, "माझ्या मेंढरांस पाळ;" आणि तिसऱ्याने बोलला कीं, "योनाच्या पुत्रा शीमोना, तूं मजवर प्रीति करितोस काय?" असें त्याने तीन वेळा विचारिल्यावरून पेत्रस खिन्न झाला, आणि बोलला, "हे प्रभू, तूं अवघीं जाणतोस; मी तुजवर प्रीति करितों, हें तुला ठाऊक आहे." जसें पेत्रस येशूविषयीं तीन वेळ नाकबूल झाला होता, तसें येशूने त्याला तीनदां विचारिलें. मग येशू त्याला ह्मणाला, "माझ्या मेंढरांस चार. मी तुला खचीत सांगतों, जेव्हां तूं तरूण होतास, तेव्हां कंबर बांधून जेथें तुझी इच्छा तेथें गेलास, परंतु जेव्हां तूं ह्मातारा होसील, तेव्हां आपले हात लांबविसील, आणि दुसरा तुला बांधून जेथें तुझी नसेल तेथें तुला नेईल." असें तो कोणत्या मरणाने देवाचें गौरव करणार हें सुचवून तो बोलला.

दुसऱ्या वेळेस येशूने जेथें पांचशांहून अधिक शिष्य जमले होते, तेथें जाऊन त्यांस दर्शन दिल्हें. याप्रमाणें तो मेलेल्यांमधून उठला, असें पुरतेपणें समजण्यास बहुत साक्षी झाले.

———

अध्याय ४८.

येशूचें आकाशलोकीं जाणें.

येशू वर जाण्यापूर्वीं त्याने आपल्या शिष्यांस कांहीं आज्ञा व वचनें सांगितलीं; असीं कीं, "आकाशांत आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिल्हा आहे, यास्तव तुह्मी जाऊन सर्व देशांतील लोकांस शिष्य करा; त्यांस बापाच्या, व पुत्राच्या, व पवित्र आत्म्याच्या नांवाने बाप्तिस्मा द्या. ज्या ज्या सर्व आज्ञा तुह्मास दिल्ह्या त्या पाळा, व त्या त्यांस शिकवा. जो विश्वास धरील, आणि बाप्तिस्मा घेईल, त्याचें तारण होईल; परंतु जो विश्वास धरणार नाहीं, तो दंडी ठरविला जाईल. आणि जे विश्वास धरितात त्यांच्या जवळ हे साक्षात्कार राहतील; ह्मणजे ते भूतांस घालवितील, नव्या नव्या भाषा बोलतील, साप धरून उचलतील, आणि कांहीं मृत्युकारक पदार्थ जरी प्याले तरी तो त्यांस बाधणारच नाहीं. आणि ते रोग्यांवर हात ठेवितील, तेणेंकरून ते बरे होतील. आणि पाहा, जगाच्या समाप्तीपर्यंत मी तुह्माबरोबर सर्वकाळ असेन."

शेवटल्या वेळेस त्याने शिष्य जमवून त्यांस आज्ञा केली कीं, "वचनाप्रमाणें पवित्र आत्म्याने तुमचा बाप्तिस्मा होईतोंपर्यंत तुह्मी यरूशालेमापासून बाहेर जाऊं नका. तेव्हां त्यांनी विचारिलें कीं, "हे प्रभू, तूं या वेळेस पुन्हा इस्राएलास राज्य देसील काय?" तेव्हां तो बोलला, "जे काळ आणि प्रसंग बापाने आपल्या हातीं ठेविले आहेत ते जाणावे, हें तुह्माकडे नाहीं; परंतु पवित्र आत्मा तुह्मावर येईल, तेव्हां तुह्मी सामर्थ्य पावाल, आणि यरूशा-

लेम आणि सर्व यहूदा आणि शोमरोन आणि सर्व पृथ्वीच्या शेवटपर्यंत तुह्मी माझे साक्षी व्हाल."

आणि असें बोलल्यावर तो त्यांच्या समक्ष वर घेतला गेला; तेव्हां मेघाने त्यांच्या दृष्टीपासून त्याला आच्छादून घेतलें. असा जरी तो त्यांच्या दृष्टीपुढून गेला तरी त्याने त्यांस तळमळ लागूं दिल्ही नाहीं. तो आपल्या वैभवांत गेला, तरी त्याने त्यांची आठवण राखिली. नंतर ते आकाशाकडे निरखून पाहत असतां, पांढरीं वस्त्रें ल्यालेले दोन पुरुष त्यांजवळ येऊन उभे राहिले; आणि बोलले कीं, "अहो गालीली माणसानो, तुह्मी आकाशाकडे पाहत कां उभे राहिलां? जो तुह्मापासून वर आकाशांत घेतला गेला तोच येशू, जसें तुह्मी त्याला आकाशांत जातां पाहिलें, तसाच येईल."

मग ते तेथें त्याचें भजन करून यरूशालेमास परतले; आणि तेथें देवळांत नित्य आनंदाने त्याची स्तुति करीत. मग भविष्यलेखांचा अर्थ आणि आपल्या धन्याचें राज्य, यांविषयीं बरोबर समजूं लागले.

अध्याय ४९.

पन्नासाव्या दिवसाविषयीं.

मग यरूशालेमांत एकांतीं राहून, ते शिष्य पवित्र आत्म्याची प्राप्ती व्हावी ह्मणून प्रार्थना करीत असत. मग त्यानीं यहूदा जो फितलेला, त्याच्या बद्दल दुसरा स्थापावयासाठीं प्रार्थना करून, चिठ्या टाकिल्या; नंतर मात्थियस, याच्या नांवें चिठी आल्यावरून त्यास स्थापिलें. तेव्हां तेथें

जमलेले लोक सुमारें १२० होते; आणि ते नित्य कांहीं अद्भुत कृतीची वाट पाहत असत.

वल्हांडण सणापासून पन्नासावा दिवस आला असतां, ते सर्व शिष्य एकचित्ताने एकत्र मिळाले होते. त्या दिवसीं सीना पर्वतावर ईश्वराने मोश्यास नेमशास्त्र दिल्हें होतें. आणि तो हंगामाचा प्रारंभ, ह्मणून इस्राएल लोक सण मानीत असत. तेव्हां अकस्मात् मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्यासारिखा आकाशांतून नाद आला, आणि त्याने ज्यांत ते बसले होते तें सर्व घर भरलें. मग विभागलेल्या जिभा अग्निज्वालांसारिख्या त्यांस दिसल्या, आणि त्या त्यांतील प्रत्येक जणांवर बसल्या. तेव्हां ते अवघे पवित्र आत्म्याने पूर्ण झाले. आत्म्याने जसी त्यांस उच्चाराविषयीं शक्ति दिल्ही तसे ते दुसऱ्या भाषानी बोलूं लागले. त्या वेळेस आकाशाखालच्या प्रत्येक राष्ट्रांतील पारमार्थिक यहूदी माणसें यरूशालेमांत राहत होतीं. तेव्हां ही गोष्ट वाजल्यावर समुदाय एकत्र होऊन त्यांचा एक गलबा झाला, कारण कीं प्रत्येकानी आपापल्या भाषेंत त्यास बोलतां ऐकिलें. आणि ते सर्व विस्मित व चकित होऊन एकमेकांस बोलले कीं, “पाहा, हे जे बोलतात ते सर्व गालीली नव्हतना ! तर आह्मी प्रत्येक आपापल्या जन्मभाषेंत त्यांचें बोलणें ऐकतों हें कसें !” तेव्हां ते सर्व विस्मित होऊन आणि संशय धरून एकमेकांस बोलले, “हें काय असेल !” परंतु कित्येक थट्टा करून बोलले, “हे द्राक्षारसाने मस्त झाले आहेत.”

त्या काळीं पेत्रस अकरा जणांसुद्धां उभा राहून त्यांस मोठ्याने बोलूं लागला कीं, “अहो यहूदी माणसानो,

आणि यरूशालेमांतील सर्व राहणाऱ्यानो, हें तुह्माला ठाऊक असो, तुह्मी माझी गोष्ट ऐका; कारण कीं तुमच्या कल्पनेप्रमाणें हे मस्त झाले असें नाहीं, कां तर दिवसाचा पहिला प्रहर आहे. परंतु योएल भविष्यवाद्याकडून जें सांगितलें होतें तें हेंच आहे कीं, 'मी आपला आत्मा सर्व मनुष्यजातीवर घालीन, तेव्हां तुमचे पुत्र आणि तुमच्या कन्या भविष्यें सांगतील, आणि तुमचे तरूण दृष्टांत पाहतील, आणि तुमच्या ह्मातान्यांस स्वप्नें पडतील. अणखी त्या दिवसांमध्यें मी आपल्या दासांवर व आपल्या दासींवर आपला आत्मा घालीन, आणि तीं भविष्य सांगतील.' अहो इस्राएल मनुष्यानो, तुह्मी ह्या गोष्टी ऐका; येशू जो नाजोरी, त्याच्या हातून देवाने जे चमत्कार आणि अद्भुतें आणि चिन्हें तुह्मामध्यें केलीं, ह्मणून तुह्मी जाणतां; त्यांवरून तो देवाने प्रदर्शविलेला असा मनुष्य असतां, त्याला देवाने मरणाच्या वेदना सोडवून उठविलें; कारण त्याने मरणाच्या स्वाधीन राहावें, ही गोष्ट अशक्य होती. त्या येशूला देवाने उठविलें आहे; याविषयीं आह्मी अवघे साक्षी आहों. तो तर देवाच्या उजवीकडे उंचावलेला होऊन, आणि पवित्र आत्म्याविषयीं जें वचन तें बापापासून पावून, जें तुह्मी आतां पाहतां व ऐकतां, तें त्याने ओतून दिल्हें आहे. यास्तव सर्व इस्राएल लोक निश्चयें जाणोत कीं, ज्याला तुह्मी वधस्तंभीं मारिलें, तोच येशू देवाने प्रभु आणि ख्रीस्त असा करून ठेविला आहे.

'हें ऐकून ते लोक चरमले, आणि पेत्रसाला व इतर प्रेषितांस बोलले, "अहो बंधुजनहो, आह्मी काय करावें?" मग पेत्रस त्यांस बोलला कीं, "पापांची क्षमा होण्या-

साठीं तुह्मी प्रत्येक पश्चात्ताप करा, आणि येशू ख्रीस्ताच्या नांवें बाप्तिस्मा घ्या. ह्मणजे पवित्र आत्म्याचें दान तुह्मास प्राप्त होईल. कां तर तें वचन तुह्मास, आणि तुमच्या लेंकरांस, आणि सर्व जे दूर त्यांस देखील, जितक्यांस प्रभु आमचा देव बोलावील, त्यांस आहे.

तेव्हां ज्यांनी आनंदाने ती गोष्ट घेतली त्यांचा बाप्तिस्मा झाला; आणि त्या दिवशीं सुमारे तीन हजार मनुष्यें त्यांकडे झालीं. आणि प्रेषितांचा उपदेश व सहवास आणि भाकर मोडण्याचा संस्कार, आणि प्रार्थना यांत ते तत्पर राहत होते. तेव्हां जे विश्वास ठेवणारे ते एकत्र राहत असत, आणि त्यांचे अवघे पदार्थ समाईक होते. आणि त्यांनी आपापली मालमत्ता वस्तभाव विकून जसी प्रत्येकाला गरज होती तसी तीं सर्वांस वांटून दिल्हीं. ते सर्वांपासून सन्मान पावत असत, आणि तारण पावणाऱ्यांस प्रभु त्या मंडळींत मिळवीत होता.

नंतर आपल्या प्रभूचें राज्य पृथ्वीवर आहे असी त्यांनी चूक केली नाहीं. पवित्र आत्म्याने त्यांचें मन प्रकाशित केलें, व त्यांस शास्त्राचा अर्थ उघड करून दाखविला, आणि वधस्तंभीं दिल्हेल्या येशूकडूनच तारणोपाय होतो असें गाजविण्याविषयीं त्यांचें सहाय केलें. मग आपण प्रतिष्ठेने मिरवावें व आपल्यास बहुत वैभव मिळावें असी त्यांची इच्छा, ती नाहींसी झाली; कारण येशूवर विश्वास ठेवणारे जे, त्यांचें मन या संसारांत गोंधळत नाहीं; कारण त्याजबरोबर तेहि जगाविषयीं वधस्तंभीं दिल्हेले आहेत.

अध्याय ५०.

पांगळ्यास पाय देणें.

पेत्रस व योहान्न हे प्रार्थनेच्या वेळेस दिवसाच्या तिसऱ्या प्रहरीं देवळांत जात होते. तेव्हां कोणी एक माणूस जो



जन्मापासून पांगळा होता ज्याला उचलून नेत असत, आणि देवळांत जाणाऱ्यांपासीं भीक मागण्यासाठीं सुंदर नामक दरवाज्याजवळ निन्य ठेवीत असत, त्याने यांस देवळांत जाणार असें पाहून भीक मागितली. तेव्हां पेत्रस योहान्नासुद्धां त्याला निरखून पाहून बोलला, "तूं आमच्याकडे पाहा." तेव्हां त्यांपासून कांहीं मिळेल, असी आशा धरून त्याने त्यांकडे लक्ष लाविलें. मग पेत्रस बोलला कीं, "माझ्याजवळ रूपें व सोनें नाहीं, परंतु जें मजपासीं आहे तें मी तुला देतों; येशू ख्रिस्त जो नाजोरी, त्याच्या नांवाने तूं उठून चाल." मग त्याने त्याचा उजवा हात

धरून त्याला उठविलें; तेव्हां त्याचीं पावलें व घोटे लाग-लेंच बळकट झाले. आणि तो उडी मारून उभा राहिला आणि चालूं लागला. नंतर तो चालत, व उड्या मारीत, आणि देवाची स्तुति करीत, त्यांच्या बरोबर देवळांत गेला. आणि सर्व लोकानी त्याला चालतां, आणि देवाची स्तुति करितां पाहिलें; आणि जो देवळाच्या सुंदर दरवाज्याजवळ भीक मागण्यासाठीं बसला होता तो हाच आहे, असें त्यानी त्याला ओळखिलें. तेव्हां त्याला जें झालें, त्यावरून ते आश्चर्याने आणि विस्मयानें व्याप्त झाले.

नंतर जो पांगळा बरा झाला होता तो पेत्रसाला आणि योहान्नाला धरीत असतां, सर्व लोक त्यांच्याजवळ शलमोनाच्या ह्मटलेल्या देवडीमध्यें धांवत आले, हें पाहून पेत्रसाने त्या लोकांला ह्मटलें, "अहो इस्राएल मनुष्यानो, तुह्मी यावरून आश्चर्य कां करितां? किंवा आह्मी आपल्या सामर्थ्याने अथवा पुण्याने याला चालविलें असें समजून आह्माकडे कां न्याहाळून पाहातां? आब्राहाम, व इझाक, व याकोब यांचा देव जो आमच्या पूर्वजांचा देव, त्याने आपला पुत्र येशू याला गौरविलें आहे; त्याला तुह्मी परस्वाधीन करून पिलातस ज्याने सोडवायास निश्चय केला होता, त्याच्या समक्ष त्याला नाकारिलें. तुह्मी तर जो पवित्र आणि नीतिमान् त्याला नाकारिलें, आणि घातक मनुष्य आह्मासाठीं सोडावा असें मागितलें; आणि जीवनाच्या धन्याला जिवें मारिलें. त्याला देवाने मेलेल्यांमधून उठविलें याविषयीं आह्मी साक्षी आहों. त्याच्या नांवाच्या विश्वासाकडून हा मनुष्य ज्याला

तुह्मी पाहतां व ओळखतां तो शक्तिमान् झाला आहे. त्यावरल्या विश्वासानेच याला तुह्मा सर्वांच्या समक्ष शरीरसंपत्ति मिळाली.

आतां तर भावानो, तुह्मी आणि तुमच्या अधिकाऱ्यानीहि तें अज्ञानपणानें केलें, हें मला ठाऊक आहे, परंतु ज्या गोष्टी ख्रीस्ताने सोसाव्या ह्मणून देवानें आपल्या सर्व भविष्यवाद्यांच्या मुखानें पूर्वीं सांगितल्या होत्या, त्या त्यानें याप्रमाणें प्रतीतीस आणिल्या यास्तव तुमचीं पापें पुसून टाकलीं जावीं, ह्मणून तुह्मी पश्चात्ताप करून फिरा; यासाठीं कीं विसांव्याचे समय प्रभूपासून यावे, आणि तुह्मासाठीं पूर्वीं नेमलेला येशू ख्रीस्त याला त्यानें पाठवावें, ज्याविषयीं पहिल्यापासून देवानें आपल्या सर्व पवित्र भविष्यवाद्यांच्या मुखानें सांगितलें, त्या सर्वांची पूर्वस्थिति होण्याच्या समयापर्यंत, त्या येशूला आकाशांत राहणें प्राप्त आहे.

अध्याय ५१.

पेत्रस व योहान्न यांचें सभासदांपुढें उभें राहणें.

आणि ते लोकांसीं बोलत असतां, याजक व देवळाचा नायक व सादुकपंथी त्यांजवर चालून आले; कां तर ते लोकांस उपदेश करितात, आणि येशूकडून मेलेल्याचें पुन्हा उठणें होईल असें सांगतात, हें त्यांस वाईट वाटलें; आणि त्यांनी त्यांवर हात टाकिले. तेव्हां सांज झाली ह्मणून सकाळपर्यंत त्यांस कैदेंत ठेविलें; तथापि ज्यांनीं वार्त्ता ऐकिली त्यांतील वहुतांनी विश्वास ठेविला. त्या मनुष्यांची गणना सुमारें पांच हजार झाली.

नंतर दुसऱ्या दिवशीं असें झालें कीं, त्यांचे अधिकारी आणि वडील, व शास्त्री, आणि मुख्य याजक व मुख्य याजकांचे नातलग, जितके होते तितके यरूशालेमांत मिळाले, आणि त्यांनी त्या प्रेषितांस मध्यें उभें करून पुसिलें कीं, "हें तुह्मी कोणत्या सामर्थ्यानें किंवा कोणत्या नांवानें केलें?" तेव्हां पेत्रस पवित्र आत्म्यानें पूर्ण होऊन त्यांस बोलला, "अहो लोकांच्या अधिकाऱ्यांनो, आणि इस्राएलांच्या वडिलांनो, ज्या रोगी माणसावर उपकार झाला, तो कशानें पार पडला, याविषयीं जर आमची चौकसी आज करावयाची आहे तर तुह्मा सर्वांस, आणि सर्व इस्राएल लोकांस हें ठाऊक असो कीं, येशू ख्रीस्त जो नाजोरी, ज्याला तुह्मी वधस्तंभावर मारिलें, ज्याला देवानें मेलेल्यांमधून उठविलें, त्याच्या नांवानें हा मनुष्य तुमच्यापुढें यथास्थित उभा राहिला आहे. जो धोंडा तुह्मी बांधणाऱ्यांनी नाकारिला असतां, कोंपऱ्याचा शिरोभाग झाला तो हाच आहे, आणि दुसऱ्या कोणाकडून तारण नाहीं; कां कीं जेणेकरून आमचें तारण व्हावें, असें दुसरें नांव आकाशाखालीं मनुष्यांमध्यें दिल्हेलें नाहीं."

तेव्हां पेत्रसाचें आणि योहान्नाचें प्रशस्तपण पाहून आणि हे निरक्षर व असभ्य मनुष्य आहेत असें समजून त्यांनी आश्चर्य केलें; आणि हे येशूच्या संगतीं होते असें त्यांस ओळखिलें. तेव्हां निरोगी झालेला माणूस त्यांच्या बरोबर उभा पाहून त्यांच्यानें कांहीं विरुद्ध बोलवेना. तेव्हां सभेच्या बाहेर जावें असी त्यांस आज्ञा देऊन ते आपल्या-

मध्यें विचार करीत बोलले कीं, “या माणसांस आपण काय करावें? कारण कीं त्यांकडून वास्तविक चमत्कार घडला खरें; हें सर्व यरूशालेमकरांस ठाऊक आहे; आणि तें आमच्याने नाहीं ह्मणवत नाहीं. परंतु लोकांमध्यें अणखी वाजूं नये, ह्मणून त्यांस भेडावून आपण निक्षून मना करावें कीं, या नांवाने कोणालाहि पुढें बोलूं नये.” मग त्यानी त्यांस बोलावून आज्ञा केली कीं, “येशूच्या नांवाने तुह्मी अगदीं बोलूं नका, आणि उपदेशहि करूं नका.”

परंतु पेत्रस आणि योहान्न यानी त्यांस उत्तर केलें कीं “देवापेक्षां तुमचें ऐकावें, हें देवाच्या दृष्टीस योग्य कीं अयोग्य, याचा तुह्मी विचार करा. परंतु आह्मी ज्या गोष्टी पाहिल्या आणि ऐकिल्या, त्या न बोलाव्या हें आमच्याने होत नाहीं.” तेव्हां त्यांस त्यानी अणखी भेडावून सोडून दिल्हें. त्यांस शिक्षा कशी करावी हें लोकांमुळें त्यांस सुचेना, कारण कीं घडल्या गोष्टीमुळें सर्व लोक देवाला गौरवीत होते; कां तर ज्या मनुष्यावर हा निरोगी करण्याचा चमत्कार घडला होता, त्याचें वय चाळीस वर्षांवर होतें.

तेव्हां विश्वासणाऱ्यांचा समुदाय एकचित्ताचा व एकजीवाचा होता; आणि कोणीहि आपलें जें वित्तविषय त्यांतील कांहीं आपलेंसें ह्मणत नव्हता; परंतु त्यांस सर्व पदार्थ समाईक होते. त्यांतील तर कोणालाहि कांहीं उणें नव्हतें. कां कीं जमिनीचे किंवा घराचे मालक जितके होते तितक्यानी विकून, विकलेल्यांचें मोल आणून प्रेषितांच्या पायांसीं ठेविलें; मग जसी कोणाला गरज होती, तसें प्रत्येकाला वांटून दिल्हें.

अध्याय ५२.

अनान्या व साफीरे.

तेव्हां अनान्या नांवाचा कोणी माणूस आणि त्याची बायको साफीरे यानी माल विकला. मग त्याच्या बायकोला ठाऊक असतां त्याने मोलांतून कांहीं ठेऊन घेतलें; आणि बाकी आणून प्रेषितांच्या पायांजवळ ठेऊन त्यांस ह्मटलें, "हें माझें सर्वस्व आहे." तेव्हां पेत्रस बोलला, "हे अनान्या, त्वां पवित्र आत्म्यासीं लबाडी करावी, आणि जमीनीच्या मोलांतून कांहीं ठेवून घ्यावें, ह्मणून सैतानाने तुझ्या अंतःकरणांत कां भरविलें आहे? ती होती तोंवर तुझ्या खासगीची नव्हती? आणि विकल्यावर तुझ्या स्वाधीन नव्हती कीं काय? ही गोष्ट त्वां आपल्या मनांत कां आणिली? त्वां माणसांसीं नव्हे, तर देवासीं



लबाडी केली." हे शब्द ऐकून अनान्याने पडून प्राण सोडिला; आणि ज्यानी ह्या गोष्टी ऐकिल्या त्या सर्वांस मोठें भय प्राप्त झालें. तेव्हां तरण्यानी उठून त्याला गुंडाळलें आणि बाहेर नेऊन पुरिलें.

मग सुमारें एक प्रहराच्या अंतराने त्याची बायको झालेलें वर्तमान न समजून आंत आली. तेव्हां पेत्रस तिला बोलला, "अगे मला सांग, एवढ्याला तुह्मी जमीन विकिली कीं काय?" तिनें उत्तर केलें, "होय, तेवढ्याला." तेव्हां पेत्रस तिला बोलला, "प्रभूच्या आत्म्याची प्रचिती पाहावी ह्मणून तुह्मी एकोपा कशासाठीं केला? पाहा ज्यानी तुझ्या नवऱ्याला पुरिलें त्यांचे पाय दारासीं आहेत, ते तुलाहि बाहेर नेतील." तेव्हां तिने लागलेंच त्याच्या पायांजवळ पडून प्राण सोडिला. तेव्हां तरण्यानी आंत येऊन ती मेली असी पाहिली; आणि तिला बाहेर नेऊन तिच्या नवऱ्याजवळ पुरिलें. नंतर सर्व मंडळीला आणि ज्या सर्वांनी या गोष्टी ऐकिल्या त्यांस मोठें भय प्राप्त झालें.

अध्याय ५३.

स्तेफानसाचें मरण.

तेव्हां ख्रिस्ती मंडळींतील गरीब लोक यासाठीं जमविलेल्या द्रव्यावर सात असामी धर्माध्यक्ष नेमून ठेविले होते; त्यांत एक स्तेफानस होता. त्याने विश्वास व सामर्थ्य यानी पूर्ण होऊन बहुत चमत्कार व अद्भुतें केलीं, त्यासीं कित्येक खळवादी यहूदी यानी ख्रिस्ती धर्माविषयीं वादविवाद केले; परंतु तो अशा ज्ञानाने आणि आत्म्याने बोलला कीं, त्यापुढें त्यांच्याने उभें राहवेना. यामुळें त्यानी त्यासीं चुरस धरून लोकांस आणि वडिलांस आणि शास्त्र्यांस भर दिल्ही. मग त्यानी त्याजवर उठून त्याला धरून न्यायसभेंत नेलें. आणि ते खोटे साक्षी उभे केले असतां बोलले कीं, "हा माणूस या पवित्र स्थानाच्या

आणि शास्त्राच्या विरुद्ध दुर्भाषण करणें सोडीत नाहीं; कां तर आह्मी त्याला असें बोलतां ऐकिलें कीं, येशू जो नाजोरी, तो या स्थानाला मोडून टाकील, आणि मोश्याने ज्या रीती आह्मास लावून दिल्ह्या त्यांस पालटील." तेव्हां जे न्यायसभेंत बसले होते, ते सर्व त्याकडे निरखून पाहत असतां, त्याचें मुख दूतांच्या मुखासारिखें दिसलें.

मग मुख्य याजक बोलला, "या गोष्टी अशाच आहेत कीं काय ?" तेव्हां तो इस्राएलासाठीं देवाने किती चमत्कार केले, व त्यानीं किती अमर्यादा केल्या, याविषयीं बोलूं लागला; आणि शेवटीं बोलला कीं, "अहो ताठ मानेचे आणि हृदयांत व कानांत असुंती लोकानो, तुह्मी पवित्र आत्म्याचा सर्वकाळ विरोध करितां; जसे तुमचे पूर्वज, तसेच तुह्मीहि, ज्याला तुमच्या पूर्वजानीं उपद्रव दिल्हा नाहीं, असा भविष्यवाद्यांमध्यें कोण होता बरें ? आणि त्या न्यायवानाच्या येण्याविषयीं ज्यानीं पूर्वीं सांगितलें त्यांस त्यानीं जिवें मारिलें; त्याचे तुह्मी आतां परस्वाधीन करणारे, आणि प्राणघातकी निघाला, तुह्मास जें नेमशास्त्र दूतांच्या योगाने प्राप्त झालें, तें तुह्मी पाळिलें नाहीं."

इतकें ऐकून त्यानीं पुढें त्याचें बोलणें चालूं दिल्हें नाहीं. त्यांस राग आला तो त्यांच्याने आटोपवेना, ते चिढून त्यावर दांत खाऊं लागले. परंतु तो पवित्र आत्म्याने पूर्ण असतां आकाशाकडे दृष्टि लावून त्याने देवाचें तेज आणि देवाच्या उजवीकडे येशू उभा राहतां पाहिला आणि ह्मटलें कीं, "पाहा, आकाश फाटलें, आणि मनुष्याचा पुत्र देवाच्या उजवीकडे उभा राहिला

आहे, असें माझ्या दृष्टिस पडतें." तेव्हां ते मोठी आरोळी मारून, कानांत बोटें घालून एकचित्ताने त्यावर धांवले; मग त्यानी त्याला शहराच्या बाहेर घालवून धोंडे मारिले; आणि जे साक्षी, त्यानी शाऊलनामक कोणी तरूण याच्या पायांजवळ आपलीं वस्त्रें ठेविलीं. आणि



ते स्तेफानसाला धोंड्यानी मारीत असतां, तो प्रभूचा धांवा करीत बोलला कीं, "हे प्रभू येशू, माझ्या आत्म्याचा स्वीकार कर." मग गुडघे टेंकून तो मोठ्याने ओरडला कीं, "हे प्रभू, त्यांजकडे हें पाप मोजूं नको." असें बोलून तो निजला.

अध्याय ५४.

हबशी षंढ.

स्तेफानसाच्या वधाविषयीं शाऊल मान्य होता, कारण तो आपल्या परंपरागत धर्माविषयीं मोठा अभिमान बाळगीत असे, ह्मणून ख्रिस्ती लोकांस छळणें हें ईश्वरास संतोषकारक आहे असें त्यास वाटे; तो घरोघरीं शोधून

स्त्रिया व पुरुष यांत जे ख्रिस्ती ह्मणून सांपडले त्यांस धरून तुरुंगांत घाली. अशा छळणुकीमुळें ते सर्व लोक प्रेषितांखेरीज यहूदा व शोमरोन, या प्रांतांत पांगले गेले होते; तेथें ते देवाचीं वाक्यें सांगत चहुंकडे फिरले.

सदरहू सात धर्माध्यक्षांपैकीं एक फिलिप्पस ह्मणून होता त्याने शोमरोन शहरांत जाऊन येशू ख्रीस्ताविषयीं घोषण व बहुत चमत्कार केले; तेव्हां तेथें फार आनंद झाला. नंतर त्याला प्रभूचा दूत बोलला, "तूं ऊठ, आणि जी वाट यरूशालेमापासून गाजाकडे जाती, त्या वाटेने दक्षिणेकडे जा." तेव्हां तो उठून गेला; आणि पाहा, कोणी षंढ हबशी मनुष्य हबशी लोकांची राणी, जी कांदाके, तिचा प्रधान जो तिच्या सर्व भांडारावर होता, तो यरूशालेमांत भजन करण्यासाठीं आला होता, तो परतून जातांना, आपल्या रथावर बसून यशाया भविष्यवाद्याचा ग्रंथ वाचीत होता. तेव्हां फिलिप्पसाला आत्मा बोलला कीं, "त्वां जाऊन त्या रथासीं मिळावें." तेव्हां फिलिप्पस जवळ धांवत जाऊन, त्याला यशाया भविष्यवाद्याची गोष्ट वाचतांना ऐकून बोलला कीं, "जें तूं वाचतोस तें तुला समजतें काय?" तेव्हां त्याने उत्तर केलें कीं, "कोणी मला दाखविल्यावांचून मला कसें समजेल?" मग त्याने फिलिप्पसाला आपल्याबरोबर बसायाला वरतें बोलाविलें. तेव्हां शास्त्रांतील हाच लेख तो वाचीत होता कीं, "तो मेंढरासारिखा वधासाठीं नेला गेला; आणि कोंकरूं जसें आपल्या कातरणाऱ्यापुढें मुकें असतें तसें त्याने आपलें तोंड उघडलें नाहीं; अपमानाने त्याचा न्याय बुडाला, आणि त्याच्या पिढीचें वर्णन कोण करील?

कां कीं त्याचें आयुष्य पृथ्वींतून सरून गेलें." तेव्हां तो षंढ फिलिप्पसाला बोलला, "मी तुला विनंती करितों कीं, हा भविष्यवादी कोणाविषयीं असें ह्मणतो, आपल्याविषयीं किंवा दुसऱ्या कोणाविषयीं?" तेव्हां फिलिप्पसाने त्याच लेखापासून प्रारंभ करून, येशूचें शुभवर्त्तमान त्याला सांगितलें.



मग वाटेने जातां जातां पाण्याकडे आले; तेव्हां तो षंढ बोलला कीं, "पाहा, पाणी आहे; मला बाप्तिस्मा घेण्यास काय अडचण आहे?" तेव्हां फिलिप्पस बोलला कीं, "जर तूं आपल्या सर्व अंतःकरणाने विश्वास धरितोस तर योग्य आहे." तेव्हां त्याने ह्मटलें कीं, "येशू हा देवाचा पुत्र आहे, असा मी विश्वास धरितों." मग त्याने रथ उभा करावयाची आज्ञा केली; मग फिलिप्पस आणि षंढ असे ते उभयतां पाण्यांत उतरले; आणि त्याने त्याला बाप्तिस्मा दिल्हा. आणि ते पाण्यांतून वर आले, तेव्हां प्रभूच्या आत्म्याने फिलिप्पसाला नेलें, ह्मणून त्याला षंढाने अणखी पाहिलें नाहीं; नंतर तो आपल्या वाटेने हर्ष करीत चालला.

अध्याय ५५.

शाऊलाच्या मनोवृत्तीचें फिरणें.

शाऊल तर ख्रिस्ती लोकांस अधिक अधिक त्रास देत गेला. त्याने मुख्य याजकाजवळ जाऊन दमास्कसांतल्या सभेस पत्रें मागितलीं, असीं कीं याला जर त्या मार्गांतलीं कोणी मनुष्यें सांपडलीं, तर याने त्यांस बांधून यरूशालेमांत आणावें. मग तो जातां जातां दमास्कसाजवळ पोहंचला. तेव्हां त्याच्या भोंवतीं आकाशापासून प्रकाश अकस्मात् चमकला; तेव्हां तो भूमीवर पडला, आणि त्याने असी वाणी आपणासीं बोलतां ऐकिली कीं, "शाऊला, शाऊला, तूं मला कां त्रासितोस?" यावरून येशूचें व त्याच्या लोकांचें किती ऐक्य आहे पाहा बरें!

तेव्हां शाऊल बोलला, "हे प्रभू, तूं कोण आहेस?" प्रभु बोलला, "ज्या येशूला तूं त्रासितोस तोच मी आहें; कांट्यांवर लात मारणें हें तुला कठीण." तेव्हां तो कांपून आणि विस्मित होऊन बोलला, "हे प्रभू, म्या काय करावें ह्मणून तूं इच्छितोस?" प्रभु बोलला, ऊठ, आणि नगरांत जा, ह्मणजे तुला जें करावें लागतें तें कोणी सांगेल." तेव्हां त्याच्या बरोबर जे मनुष्य जात होते, ते स्तब्ध उभे राहिले, त्यानी शब्द तर ऐकिला परंतु कोणाला पाहिलें नाहीं; मग शाऊलाने भूमीवरून उठून डोळे उघडल्यावर त्याच्या दृष्टीस कोणी पडला नाहीं; मग त्यानी त्याला हातीं धरून दमास्कसांत नेलें. तेथें तो तीन दिवस अंधळा होता, आणि त्याने कांहीं खाल्लें पिलें नाहीं.

त्या वेळेस दमास्कसांत अनान्या नामक कोणी शिष्य

होता, त्याला प्रभु दर्शन देऊन बोलला, "हे अनान्या." तेव्हां तो बोलला, "हे प्रभू, मी एथें आहें." मग प्रभु त्याला बोलला, "तूं उठून नीट ह्मटलेल्या रस्त्यांत जा, आणि यहूदा याच्या घरीं शाऊल नामक तार्ससकर, याचा शोध कर; कां कीं पाहा, तो प्रार्थना करीत आहे. त्यानें तर असा दृष्टांत पाहिला आहे कीं, कोणी अनान्यानें आंत येऊन डोळे नीट होण्यासाठीं आपल्यावर हात ठेविला." अनान्यानें प्रभूला उत्तर केलें कीं, "हे प्रभू, यरूशालेमांतल्या तुझ्या पवित्र लोकांस ह्या माणसानें किती उपद्रव दिल्हा, असें बहुतांपासून त्याविषयीं म्या ऐकिलें आहे; आणि एथेंहि जे तुझें नांव घेतात, त्या सर्वांस बांधावें, असा मुख्य याजकांपासून त्याला अधिकार झाला आहे." तेव्हां प्रभु त्याला बोलला, "तूं जा, कां कीं विदेशी लोक, आणि राजे, आणि इस्राएल लोक, यांच्या समोर माझें नांव सांगण्याकरितां तो माझें निवडिलेलें पात्र असा आहे; आणि त्याला माझ्या नांवासाठीं किती सोसावें लागेल, हें मी त्याला दाखवीन.

तेव्हां अनान्या निघून त्या घरीं गेला आणि त्यावर हात ठेवून बोलला, "हे शाऊल भावा, तूं वाटेनें येत होतास तेव्हां ज्या येशूनें तुला दर्शन दिल्हें, त्याच प्रभूनें मला पाठविलें आहे, यासाठीं कीं तुला दृष्टि यावी, आणि पवित्र आत्म्यानें त्वां पूर्ण व्हावें." तेव्हां त्याच्या डोळ्यावरून खपल्यांसारिखें कांहींसें पडलें; आणि त्याला दृष्टि आली, आणि त्यानें उठून बाप्तिस्मा घेतला. मग अन्न खाल्यावर त्याला शक्ति आली.

आणि शाऊल दमास्कसांतल्या शिष्यांबरोबर कांहीं

दिवस होता. आणि त्यानें लागलेंच सभांमध्यें ख्रीस्ताविषयीं घोषण केलें, असें कीं तो देवाचा पुत्र आहे.

तेव्हां सर्व ऐकणारे विस्मित होऊन बोलले कीं, "हें नांव जे यरूशालेमांत घेत असत, त्यांचा नाश जो करीत होता, तो हाच नव्हे काय? आणि त्यांस बांधून मुख्य याजकांकडे न्यावें ह्मणून हा एथें आला नव्हता काय?" पण शाऊलाला अणखी सामर्थ्य झालें, ह्मणून त्यानें हाच ख्रीस्त आहे असें स्थापून, जे यहूदी लोक दमास्कसांत राहत होते त्यांस कुंठित केलें. तेव्हां बहुत दिवस झाल्यावर यहूदी लोकांनी त्याला जिवें मारायाचा विचार



मांडिला; पण त्यांचा कट शाऊलाला समजला, त्याला तर मारायाकरितां ते रात्रंदिवस दरवाजे राखीत होते.

तेव्हां शिष्यांनीं त्याला रात्रीं घेऊन पाटींत बसवून कोटावरून खालीं सोडिलें.

मग शाऊल यरूशालेमांत येऊन शिष्यास मिळायाला झटला; परंतु तो शिष्य आहे असा विश्वास न धरितां, ते सर्व त्याला भीत होते. तेव्हां बार्णाबाने त्याला घेऊन प्रेषितांकडे आणिलें, आणि त्याने वाटेंत प्रभूला कसें पाहिलें, आणि तो त्यासीं कसा बोलला, आणि दमास्कसांत त्याने येशूच्या नांवें प्रशस्तपणें कसा उपदेश केला, हें त्यांस सांगितलें. तेव्हां तो त्यांबरोबर यरूशालेमांत कांहीं दिवस वहिवाट करीत होता, आणि प्रभू येशूच्या नांवाने निर्भयपणाने बोलत होता. अणखी हेल्लेनी लोकांसीं वादप्रतिवाद करीत होता; तेव्हां त्याला मारायास त्यांनीं हात घातले. हें भावांस जेव्हां समजलें, तेव्हां त्यांनीं त्याला कैसाऱ्यांत नेऊन तार्ससांत पाठविलें.

तेव्हां सर्व यहूदा, व गालील, व शोमरोन, ह्या देशांतील ज्या मंडळ्या त्यांस स्वस्थपण झालें; आणि त्या दृढ होऊन प्रभूच्या भयाने व पवित्र आत्म्याच्या शांतीने चालून वाढत वाढत गेल्या.

अध्याय ५६.

पेत्रसाने ऐन्यासाला निरोगी व दर्कासेला जिवंत केलें.

पेत्रस त्या सर्व प्रांतांत फिरत असतां जे पवित्र मनुष्य लुद्दा गांवांत राहत होते, त्यांच्याजवळ खालीं गेला. तेथें त्याला ऐन्यास नामक कोणी माणूस अढळला, तो वातरोगी होऊन आठ वर्षें खाटेवर पडला होता. आणि त्याला पेत्रस बोलला, "हे ऐन्यासा, येशू ख्रीस्त तुला बरें

करितो; ऊठ, आणि आपलें अंथरूण नीट कर." तेव्हां तो लागलाच उठला. नंतर लुद्दा आणि शारोन यांतील सर्व राहणारे त्याला पाहून प्रभूकडे फिरले.

आणि याप्पेमध्यें टाबिथा ह्मणजे दर्कास या नांवें कोणी शिष्यीण होती. सत्कर्में आणि गरीबांस देणें हीं कामें करण्यांत ती तत्पर होती. आणि त्या दिवसांत ती रोगी होऊन मेली; तेव्हां त्यांनी तिला धुऊन माडीवर ठेविलें. आणि लुद्दा गांव याप्पे गांवाच्या जवळ होता; तेथें पेत्रस आहे असें शिष्यांनी ऐकिलें होतें, ह्मणून त्यांनी दोघा जणांला पाठवून त्याला विनंती केली कीं, "आमच्याजवळ येण्याला उशीर करूं नको." तेव्हां पेत्रस उठून त्यांजबरोबर गेला. तो पोहंचल्यावर त्यांनी त्याला माडीवर नेलें; तों त्याजवळ सर्व विधवा उभ्या राहून रडत होत्या, आणि दर्कास त्यांच्या जवळ होती त्या वेळेस तिने जे अंगरखे व वस्त्रें केलीं होतीं तीं दाखवीत होत्या. परंतु पेत्रसाने त्या सर्वांस बाहेर काढिलें, आणि गुडघे टेंकून प्रार्थना केली; आणि कुडीकडे वळून ह्मटलें, "अगे टाबिथे, ऊठ," तेव्हां तिने आपले डोळे उघडिले, आणि पेत्रसाला पाहून ती उठून बसली. मग त्याने तिला हात देऊन उभें केलें, आणि पवित्र व विधवा यांस बोलावून ती जिवंत असी दाखविली. आणि सर्व याप्पेमध्यें हें प्रसिद्ध झालें; आणि बहुतांनी प्रभूवर विश्वास ठेविला. मग तो बहुत दिवस याप्पेमध्यें शीमोन चांभार याजवळ राहिला.

अध्याय ५७.

कर्नेल्यस नामक शतपति.

कैसाऱ्यामध्यें कर्नेल्यस नामक एक पुरुष इतालीक ह्मटलेली जी पलटन तींत शतपति होता. तो परमार्थिक आणि आपल्या अवघ्या कुटुंबासुद्धां देवाला भीत होता. तो लोकांसहि फार दान धर्म करीत असे, आणि देवाची प्रार्थना नित्य करीत असे. त्याने दिवसाच्या सुमारें तिसऱ्या प्रहरीं साक्षात असा दृष्टांत पाहिला कीं, आपल्याजवळ देवाचा दूत येऊन, "हे कर्नेल्यसा," असें बोलतो. तेव्हां त्याकडे लक्ष लावून तो भयभीत होऊन बोलला, "हे प्रभू, काय आहे!" मग तो त्याला बोलला कीं, "तुझ्या प्रार्थना आणि तुझीं दानें हीं देवाजवळ स्मरणासाठीं वरतीं आलीं आहेत, तर आतां याप्पेस माणसांस पाठवून शीमोन जो पेत्रस ह्मटलेला आहे, त्याला बोलावून आण; कोणी शीमोन चांभार ज्याचें घर समुद्राच्या कांठीं आहे, त्याच्या एथें तो राहिला आहे; त्वां काय करावें हें तो तुला सांगेल.

तेव्हां जो दूत कर्नेल्यसाबरोबर बोलत होता, तो गेल्यानंतर त्याने आपल्या चाकरांतून दोघांस आणि जे आपल्यापासीं नित्य उभे राहत असत, त्यांतील एका परमार्थिक शिपायाला बोलाविलें; आणि त्यांजवळ सर्व गोष्टी सांगून त्यांस याप्पेस पाठविलें.

आणि ते दुसऱ्या दिवसीं वाटेने चालतां चालतां नगराजवळ आले असतां, सुमारें दुसऱ्या प्रहरीं पेत्रस धाब्यावर प्रार्थना करायाला गेला. तेव्हां त्याला मोठी भूक लागून त्याने खायाला इच्छिलें; आणि जेवणाची तयारी

होत आहे, इतक्यांत तो भानरहित झाला. मग आकाश फाटलेलें, आणि मोठ्या चांदव्यासारिखा एक ठाय चार कोंपऱ्यासीं बांधलेला असतां, पृथ्वीवर आपल्याकडे उतरत आहे असा त्याने पाहिला. त्यामध्यें पृथ्वींतलीं सर्व चतुष्पदें, आणि श्वापदें, आणि वळवळणारे जंतु, आणि आकाशांतलीं पांखरें होतीं. मग त्याला असी वाणी झाली कीं, "हे पेत्रसा, ऊठ, आणि मारून खा." परंतु पेत्रस बोलला, "नको प्रभू, कां कीं जें अपवित्र, किंवा अशुद्ध, असें कांहीं म्या कधीं खाल्लें नाहीं." मग दुसऱ्याने त्यास वाणी झाली कीं, "देवाने जें शुद्ध केलें, तें तूं अपवित्र मानूं नको." ही गोष्ट तीन वेळां झाली. नंतर तो ठाय आकाशांत पुन्हा घेतला गेला.

मग आपण जो दृष्टांत पाहिला, तो काय असेल याविषयीं पेत्रसाच्या मनांत संशय आला, इतक्यांत पाहा, जीं माणसें कर्नेल्यसाने पाठविलीं होतीं, तीं शीमोनाचें घर शोधून दारासीं उभीं राहिलीं, आणि त्यांनी हाक मारून विचारिलें कीं, "शीमोन जो पेत्रस ह्मटलेला, तो एथें उतरलेला आहे काय?" त्या वेळेस पेत्रस त्या दृष्टांताविषयीं विचार करीत असतां, आत्मा त्याला बोलला कीं, "पाहा, तीन माणसें तुझा शोध करितात. तर उठून खालीं जा, आणि कांहीं संशय न धरितां त्यांच्या संगतीं जा; कां तर म्या त्यांस पाठविलें आहे." तेव्हां पेत्रस आपल्याकडे जीं माणसें कर्नेल्यसाने पाठविलीं होतीं, त्यांपासीं उतरून जाऊन बोलला कीं, "पाहा, ज्याचा तुह्मी शोध करितां, तो मी आहें; तुह्मी कोणत्या कारणास्तव आलां आहां?" तेव्हां त्यांनी आपल्याकडचा वृत्तांत

त्याला कळविला. मग त्याने त्यांस आंत बोलावून पाहुणचार केला. नंतर दुसऱ्या दिवशीं पेत्रस त्यांच्या बरोबर निघाला, आणि याप्पेंतील जे भाऊ, त्यांतील कित्येक त्याच्या बरोबर गेले. आणि दुसऱ्या दिवशीं ते कैसाऱ्यांत पोहंचले. तेथें कर्नेल्यस आपल्या सोयऱ्यांस आणि इष्टमित्रांस मिळवून त्यांची वाट पाहत होता. मग पेत्रस आंत गेला असतां, त्याला कर्नेल्यसाने भेटून पायां पडून भजन केलें. तेव्हां पेत्रस त्याला उठवून बोलला, "उभा राहा; मीहि मनुष्य आहें." मग तो त्याच्या बरोबर संभाषण करीत आंत गेला. तेव्हां तेथें बहुत लोक मिळाले होते असें त्याने पाहिलें.

नंतर तो त्यांस बोलला कीं, "यहूदी माणसाने दुसऱ्या जातीच्यासीं मिळावें, किंवा त्यापासीं जावें, हा त्याला अधर्म आहे, असें तुह्माला ठाऊक आहे; पण कोणीहि माणूस अपवित्र, किंवा अशुद्ध ह्मणूं नये; असें देवाने मला दाखविलें आहे. यास्तव बोलाविलें असतां मी आडवें घेतल्यावांचून आलों; तर मी विचारितों, तुह्मी मला कशासाठीं बोलाविलें;" तेव्हां कर्नेल्यसाने आपल्या दृष्टांतांतली गोष्ट त्याला कळविली.

तेव्हां पेत्रस बोलला, "मला वास्तवीक समजतें कीं, देव पक्षपाती नाहीं; परंतु सर्व देशांत जो त्याला भितो, आणि नीति करितो, तो त्याला मान्य आहे." मग त्याने त्याला ख्रिस्ती धर्माचा उपदेश केला.

तो उपदेश करीत असतां, तेथें ज्यानी तो ऐकिला त्या सर्वांवर पवित्र आत्मा उतरला. नंतर विदेशी लोकांस पवित्र आत्मा दिल्हा आहे, असें पाहून जे पेत्रसाबरोबर

विश्वासणारे सुंती लोक आले होते, त्या सर्वांस आश्चर्य वाटलें. कां तर इतर भाषांमध्यें ते बोलतां, आणि देवास स्तवितां, त्यांनी ऐकिलें. त्या काळीं पेत्रस बोलला, “हे जे आह्मासारिखेच पवित्र आत्मा पावले, त्यांचा बाप्तिस्मा करण्याकरितां पाण्याचा निषेध करण्याला कोणी शक्तिमान आहे काय?” मग प्रभूच्या नांवाने त्यांचा बाप्तिस्मा करावा असी त्याने आज्ञा केली. नंतर त्याने कांहीं दिवस राहावें ह्मणून त्यांनी त्याला आग्रह केला. हेच लोक विदेशी लोकांपैकीं जे ख्रिस्ती धर्मांत आले ते पहिले होत.

अध्याय ५८.

पेत्रसाला बंदांतून मुक्त करणें.

हेरोद अग्रिप्पा राजा याने याकोब जो योहान्नाचा भाऊ त्याला तरवारीने जिवें मारिलें होतें. हें यहूद्यांला बरें वाटलें असें समजून, तो पेत्रसालाहि धरण्यास उद्युक्त झाला. तेव्हां त्याला धरणें राजास सुगम झालें; कारण त्याने भयाने प्रथम प्रसंगीं प्रभूला जरी नाकारिलें होतें, तरी त्यानंतर तो मोठा धैर्यवान होत गेला, ह्मणून लपला नाहीं. तो आपला प्राण द्यायालाहि तयार झाला होता. तो दानिएलासारिखा दृढ निश्चयाचा होता सबब जाणत असे कीं, मला मारणें आणि तारणें यांविषयीं ईश्वर समर्थ आहे. राजाने त्याला धरिलें, तेव्हां इस्राएलांचा सण होता, ह्मणून त्याचा वध करण्याविषयीं उशीर झाला. याकरितां त्याने त्याला बंदांत ठेविलें, आणि

बंदोबस्त असा केला कीं, त्याला दोन सांखळदंडानी बांधून त्यापासीं चार चौक्या ठेविल्या.

जरी असा पक्का बंदोबस्त केला होता, तरी तो त्याला अडवायास पुरला नाहीं. हेरोद जेव्हां त्याला काढणार होता, त्याच रात्रीं पेत्रस दोन सांखळ्यानी बांधला असतां, दोघां शिपायांच्यामध्यें निजला होता, आणि पाहेरकरी दरवाज्यापुढें बंदीशाळा राखीत होते, तेव्हां पाहा, प्रभूचा दूत आला, आणि बंदीशाळेंत उजेड पडला. मग त्यानें पेत्रसाच्या कुशीवर थापटून, त्याला जागें करून ह्मटलें, "लवकर ऊठ." तेव्हां सांखळदंड त्याच्या हातांतून पडले. मग दूत त्याला बोलला, "कंबर बांध, आणि जोडा पायांत घाल." तेव्हां त्याने तसेंच केलें. मग तो त्याला बोलला, "तूं आपलें वस्त्र पांघरून माझ्या मागें ये."



तेव्हां तो त्याच्या मागें चालला. हेरोदाच्या मनांतील योजना किती वेगळ्या होत्या बरें! आणि तस्याच पेत्रस व त्याचे सोबती यांच्याहि मनांतल्या कल्पना किती वेगळ्या होत्या बरें! नंतर ते दोन दरवाजे वल्हांडून तिसऱ्या दरवाज्याजवळ आले, तों तो आपोआप उघडला. थोड्या

वेळांत किती चमत्कार झाले बरें! पेत्रसालाहि वाटलें कीं स्वप्न आहे. मग त्या दरवाज्यांतून निघून कांहीं रस्ता चालून, तो दूत गुप्त झाला. मग पेत्रसाने शुद्धीवर येऊन ह्मटलें, "आतां मला निश्चयें कळलें कीं, प्रभूने आपला दूत पाठवून मला हेरोदाच्या हातांतून आणि सर्व यहूद्यांच्या इच्छेपासून सोडविलें आहे; आणि हें समजून योहान्न ज्याचें उपनाम मार्कस, त्याची आई मारया इच्या घरास तो आला. तेथें बहुत लोक एकत्र मिळून प्रार्थना करीत होते. तेव्हां पेत्रस दरवाज्याच्या दिंडीवर ठोकीत असतां, रोदे नामक कन्या कानवसा घ्यायास आली. आणि तिने पेत्रसाची वाणी ओळखून हर्षामुळें दरवाजा न उघडतां, धांवत आंत जाऊन सांगितलें कीं, "पेत्रस दरवाज्याजवळ उभा आहे." तेव्हां त्यानी तिला ह्मटलें, "तूं चळलीस." परंतु तिने निर्धाराने सांगितलें कीं, "तसेंच आहे." तेव्हां ते बोलले कीं, "त्याचा दूत असेल." पुन्हां पेत्रस ठोकीत असतां, ते दरवाजा उघडून त्याला पाहून विस्मित झाले. तेव्हां उगेंच राहावें, ह्मणून त्याने त्यांस खुणाविलें. मग आपल्याला प्रभूने बंदीशाळेंतून कसें काढिलें, हें त्यांस सांगितलें; अणखी ह्मटलें कीं, "या गोष्टी याकोबाला, आणि भावांस सांगा." मग तो तेथून दुसऱ्या ठिकाणीं गेला. इकडे दिवस उगवल्यावर पेत्रस कोठें गेला असी शिपायांमध्यें गडबड झाली. नंतर हेरोदाने त्याचा शोध केला असतांहि, लागला नाहीं; ह्मणून त्याने पाहरेकऱ्यांची चौकसी करून ते ठार मारावे, असी आज्ञा दिल्ही.

हेरोद तुरकरांसीं आणि सिदोनकरांसीं वैरभाव करीत

होता, परंतु त्यानी एकाचित्ताने राजाकडे येऊन राजाच्या रंगमहालावर जो बलास्तस, त्याला समजाऊन समेट मागितला; कां कीं त्यांचा देश राजाच्या देशाने पाळिला होता. तेव्हां नेमलेल्या दिवशीं हेरोदाने बादशाही वस्त्रांचें धारण करून, राजासनावर बसून त्यांस लौकिक गोष्टी सांगितल्या. त्या वेळेस लोकानी आरोळी केली कीं, हा मनुष्याचा शब्द नव्हे, देवाचाच आहे. तेव्हां त्याने देवाला गौरव दिल्हें नाहीं, ह्मणून प्रभूच्या दूताने त्याला लागलेंच मारिलें. नंतर किड्यानी त्याचा देह खाऊन तो मरण पावला.

याप्रमाणें ईश्वराने आपल्या लेंकरांस कठोर माणसांच्या हातून सोडविलें, आणि अभिमानी माणसासीं आपला किती द्वेष हें प्रगट केलें.

अध्याय ७९.

लुस्त्रा गांवीं पाऊलसाचें राहणें.

पाऊलस जो पूर्वीं शाऊल ह्मटला गेला, तो फिरतां फिरतां एशामैनर देशांतील लूस्त्रा शहरास पोहंचला. तेव्हां तेथें कोणी एक माणूस पायानी अधु, असा बसलेला होता. तो जन्मापासून पांगळा असतां कधीं चालला नव्हता. त्याने पाऊलस बोलत असतां ऐकिलें. तेव्हां हा त्याकडे दृष्टि लावून, आणि त्याला निरोगी होण्याचा विश्वास आहे असें पाह्रन, मोठ्याने बोलला कीं, "तूं आपल्या पायांवर नीट उभा राहा." तेव्हां तो उडी मारून चालूं लागला. मग पाऊलसाने जें केलें तें समुदायानी पाह्रन लुकानी भाषेंत मोठ्याने ओरडून ह्म-

टलें कीं, "देव मनुष्यरूपी होऊन आह्माजवळ उतरले आहेत."

त्या ग्रीक लोकांचा बृहस्पति ह्मणून एक देव होता. त्याची मूर्त्ति नगरासमोर बांधलेलें जें देऊळ त्यांत स्थापिली होती, त्या देवळाच्या दरवाज्यांत तेथील लोकांसुद्धां याजक यांच्यासाठीं यज्ञ करावा, ह्मणून बैल व माळा घेऊन आले. तें पाहून बार्णाबा आणि पाऊलस हे प्रेषित आपलीं वस्त्रें फाडून ओरडत लोकांस बोलले, "अहो मनुष्यानो, असें तुह्मी कां करितां? आह्मीहि तुह्मासारिखेच सुखदुःखांचे भोगणारे मनुष्य आहों; आणि तुह्मास सांगतों कीं, या निरर्थक गोष्टी सोडून आपण सजीव देवाकडे फिरावें. त्याने आकाश, व पृथ्वी, व समुद्र आणि त्यांतील जीं अवघीं तीं उत्पन्न केलीं." असें बोलून त्यानी आपल्यासाठीं यज्ञ करण्यापासून लोकांस कष्टाने निवारिलें.

नंतर अंत्युख आणि इकन्यम, यांपासून कित्येक यहूदी आले, आणि त्यानी लोकांस चिथावून पाऊलसाला धोंडमार केला; आणि तो मेला असें समजून त्याला नगराबाहेर ओढून टाकिलें; तथापि शिष्य त्याच्या भोंवतीं उभे असतां, तो उठला आणि नगरांत गेला. मग दुसऱ्या दिवशीं निघून बार्णाबाबरोबर देर्बेस गेला. मनुष्याचे मान अपमान किती अनिश्चित आहेत, पाहा बरें! पाऊलसाच्या सत्कारार्थ एका दिवशीं यज्ञ होणार होता, आणि त्यालाच पुढें कांहीं दिवसानी धोंडमार झाला. हे वाचणाऱ्यानो, यावरून समजावें कीं, मनुष्याची स्तुति व निंदा यानी आपल्यास सुखदुःखें प्राप्त होतील असें नाहीं; परंतु

ईश्वर जो मनाचा साक्षी आणि स्थिर ज्याला फिरण्याची छाया देखील नाहीं त्यापासून होतात.

अध्याय ६०.

तिमथ्यस.

कांहीं वर्षांनंतर पाऊलस फिरून लूस्त्रा शहरास गेला. तेथें त्याला एक तिमथ्यस नामक तरुण मनुष्य भेटला. त्याची धर्मशील आई इने त्याच्या लाहानपणापासून त्याला ईश्वराविषयीं चांगलें ज्ञान मिळावें, यासाठीं बहुत प्रयत्न केला होता. तो तिचा प्रयत्न व्यर्थ गेला नाहीं. तो असा शाहाणा व धर्मशील झाला कीं, त्याला त्या तारुण्य-दशेंतहि पाऊलसाने आपल्याबरोबर धर्मवृद्धि करण्याच्या कामास योग्य, ह्मणून प्रवास करावयास निवडिलें. त्याला पाऊलसाने पाठविलेलीं दोन प्रेमाचीं पत्रें शास्त्रांत आहेत; ज्यांत त्याला बोध, व धैर्याविषयीं उत्तेजन, व त्याची आई व आजी यानीं ज्या काळजीने त्याला पवित्र शास्त्रांत वि-



द्वान केलें ती, हीं सुचविलीं आहेत. या देशांतील आ-या मुलांविषयीं असी काळजी बाळगीत नाहींत; परंतु हे

मुलांनो, तुह्मी आतां पवित्र शास्त्र वाचून तिमथ्यसारिखे विद्वान व धर्मशील व्हा, आणि या शास्त्रास उपकारक माना.

अध्याय ६१.

लुदिया आणि फिलिप्पैंतील बंदीशाळेचा नायक.

एशामैनर देशांतील त्रोवास शहरीं पाऊलस असतां, त्याला दृष्टांत झाला, कीं कोणी माकेदनी माणूस उभा राहून आपल्याला विनंती करितो कीं, "तूं माकेदन्यांत येऊन आमचें सहाय कर." यावरून तो उठल्यावर जहाजांत बसून त्या देशांतील मुख्य जें फिलिप्पै शहर, तेथें गेला. त्यांत राहणारे कांहीं धर्मशील यहूदी तेथील नदीच्या तिरीं प्रार्थना करायास जमत असत. त्यांच्या सभेंत आदित्यवारीं पाऊलसाने आपल्या सोबत्यांसुद्धां जाऊन तेथें ज्या स्त्रिया जमल्या होत्या, त्यांस उपदेश केला. त्यांत थुवातिरा नगरची एक लुदिया ह्मणून जांबळीं वस्त्रे तयार करून विकणारीण, व देवाची भक्तीण असी होती; तिने ऐकिला. तिचें अंतःकरण प्रभूने खुलविलें, असें कीं पाऊलसाने ज्या गोष्टी सांगितल्या, त्यांवर तिने लक्ष दिल्हें. मग तिने आपल्या कुटुंबासुद्धां बाप्तिस्मा घेऊन, पाऊलस व त्याचे सोबती, यांस फार आग्रह करून ह्मटलें कीं, "माझ्या घरीं येऊन राहा."

पुढें पाऊलसाने तेथील एका मुलीच्या अंगांत संचारक भूत होतें, तें घालविलें. तेणेकरून तिच्या धन्यांस फार राग आला; कारण कीं तिजकडून शाबरी मंत्राच्या योगाने त्यांला लाभ होत असे. ह्मणून त्यांनी पाऊलस व

सिलास या दोघांस धरून नेऊन, पेठेंत अधिकाऱ्यांपुढें उभें केलें; आणि हे परधर्माचा एथें प्रसार करितात, असा त्यांवर दोष ठेविला. हें ऐकून त्या अधिकाऱ्यानी यांस मार देऊन बंदीशाळेंत घाला, असा हुकूम केला. आणि नायकाला सांगितलें कीं, "यांस पक्क्या बंदोबस्ताने ठेव." त्यावरून त्याने त्यांस आंतल्या बंदीखान्यांत ठेवून, त्यांचे पाय खोड्यांत अडकविले. तथापि पाऊलस व सिलास यानी मध्यरात्रीं देवाची प्रार्थना व गायन केलें. आणि इतर बंदीवानानी तें ऐकिलें. खिस्ती धर्मासारिखा धैर्य, आनंद, शांति देण्याविषयीं इतर कोणताहि धर्म समर्थ नाहीं. त्यानी बंदीशाळेंत अस्या हालांत असूनहि आनंदाने गायन केलें.

मग एकाएकीं मोठा भूकंप झाला; असा कीं त्या बंदीशाळेचे पाये डगमगले; आणि सर्व दरवाजे उघडले, व सर्वांचे बंद सुटले. इतक्यांत नायकाने जागें होऊन, ते उघडे दर्वाजे पाहिले, आणि बंदीवान पळाले असें समजून तो तरवार उपसून आपला घात करणार होता. तेव्हां पाऊलस त्याला मोठ्याने हाक मारून बोलला कीं, "तूं आपणाला कांहीं वाईट करूं नको, कां तर आह्मी सर्व एथेंच आहों." तेव्हां तो दिवा मागून आंत धांवत गेला, आणि कांपून पाऊलस व सिलास यांच्या पायां पडला, आणि त्यांस बाहेर काढून बोलला, "हे स्वामी, माझें तारण व्हावें, ह्मणून मला काय केलें पाहिजे"? ते बोलले, "प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेव, ह्मणजे तुझें आणि तुझ्या घराण्याचें तारण होईल." नंतर त्यानी त्याला, व त्याच्या घरांतील सर्वांस प्रभूची गोष्ट सांगितली. मग

रात्रीच्या त्याच घटकेस, त्याने त्यांस नेऊन त्यांच्या फटक्यांच्या जखमा धुतल्या, आणि तेव्हांच त्याने व त्याच्या लोकानी बाप्तिस्मा घेतला. मग त्याने त्यांस आपल्या घरीं नेवून, त्यांच्यापुढें अन्न ठेविलें. आणि तो सर्व कुटुंबासुद्धां देवावर विश्वास ठेऊन हर्ष पावला.

दुसऱ्या दिवसीं सकाळीं अधिकाऱ्यानी त्या दोघांस सन्मानपुरःसर सोडिलें.

अध्याय ६२.

थेसालनिके, व बेरैया, व आथेनै, या शहरांत पाऊलसाचें जाणें.

नंतर ते तेथून थेसालनिके शहरास गेले; तेथें यहूद्यांची सभा होती. तींत पाऊलसाने आपल्या रीतीप्रमाणें जाऊन, तीन शाब्बाथ त्यांसीं शास्त्रावरून संवाद केला; असा कीं, हा येशू जो मी तुह्मास सांगतों तोच ख्रीस्त आहे. असें त्याने उलगडा करून स्थापन केलें. तेव्हां त्यांतील कित्येक, आणि परमार्थी हेल्लेनी यांचा मोठा समुदाय, आणि बहुतेक श्रेष्ठ स्त्रिया विश्वास धरून, पाऊलस व सिलास यांजकडे झाल्या.

परंतु अविश्वासी जे यहूदी, त्यानी हेवा करून आपल्याकडे कांहीं बाजारी हलके लोक घेऊन, घोळका जमवून नगरांत बंडाळी केली. त्यावरून भावानी त्या दोघांला रात्रीं बेरैयास पाठविलें. त्या शहरीं ते पोहंचल्यावर यहूद्यांच्या सभेंत गेले. तेथील लोक थेसालनिकेकरांपेक्षां अधिक सात्विक होते. त्यानी मोठ्या आवडीने त्यांच्या गोष्टी अंगीकारिल्या; आणि या गोष्टी अशाच आहेत कीं काय, याविषयीं ते शास्त्रांत नित्य शोध करीत

असत, मग त्यांतील बहुतानी आणि हेल्लेनी श्रेष्ठ स्त्रिया व पुरूष यांतील बहुतेकानी विश्वास धरिला.

मग पाऊलस तेथून निघून आथेनै शहरीं गेला. तें शहर फार नामांकित होतें. तेथें विद्या व शिल्प यांचा बहुत अभ्यास करीत असत. डोळ्यानी पाहून कृतकृत्य व्हावें असें तेथील सर्व होतें. पण तें पाहून पाऊलसाला कांहीं आनंद झाला नाहीं; कारण तें नगर केवळ मूर्त्तिपूजापरायण होतें. तें पाहून त्याचें अंतःकरण फार चिंताग्रस्त झालें. त्यांच्या नाना नांवांच्या मूर्त्ति मिळून तीस हजार होत्या. अशा त्या मूर्त्ति व त्यांचे सण बाकी सर्व ग्रीक देशांतील मूर्त्ति व सण यांपेक्षां अधिक होते. तेथें



सभांमध्यें व बाजारांत पाऊलसाने येशू व पुन्हा उठणें, यांविषयीं उपदेश केला. तेव्हां तेथील विद्वान जमून त्यासीं विवाद करूं लागले; आणि त्याला धरून मुख्य सभेंत नेऊन ह्मणाले कीं, "तूं आह्मास नवा उपदेश जो केला तो कसा, हें आह्मास कळेल काय?" तेव्हां पाऊलस

सभेच्या मध्यभागीं उभा राहून बोलला, "अहो आथेनै-
कर लोकानो, तुह्मी सर्वथा अतिभक्त आहां, हें मला क-
ळतें; कां तर फिरतां फिरतां म्या तुमचीं धर्मकृत्यें पाहि-
लीं, तेव्हां 'अज्ञात देवाचें,' हीं अक्षरें ज्यावर लिहिलेलीं
होतीं असें स्थंडिल मला अढळलें. तर ज्याला तुह्मी
जाणल्यावांचून भजतां, त्याचें वर्णन मी तुह्माला सांगतों.
ज्या देवाने जग आणि त्यांतील सर्व उत्पन्न केलें, तो
आकाशाचा आणि पृथ्वीचा प्रभु असतां, हातानी बांधले-
ल्या देवळांत राहत नाहीं; आणि त्याला कांहीं उणें आहे
ह्मणून मनुष्यांच्या हाताने त्याची भक्ति घडती असें नाहीं;
कां कीं जीवन, आणि प्राण, आणि अवघें तोच सर्वांस
देतो. आणि त्याने मनुष्यांचीं सर्व राष्ट्रें सर्व पृथ्वीवर
राहण्यासाठीं एकाच रक्तापासून उत्पन्न केलीं. त्यांचे
पूर्वीं नेमलेले समय, आणि त्यांच्या वस्तीच्या सीमा त्याने
नेमून ठेविल्या आहेत. यासाठीं कीं त्यानी प्रभूचा शोध
करावा, ह्मणजे त्यानी त्याला चांपसून कसें तरी मिळवावें,
तथापि तो आह्मांतील कोणीएकापासूनहि दूर नाहीं, का-
रण कीं आह्मी त्याकडून जगतों, आणि वागतों, आणि
आहों. तसेंच तुमच्या कित्येक कवींनीहि ह्मटलें आहे
कीं, 'आह्मी त्याचा वंश आहों.' तर आह्मी देवाचा
वंश असतां, सोनें किंवा रूपें किंवा पाषाण जें मनुष्याच्या
चातुर्याने, व युक्तीने कोरिलें आहे, त्यासारिखा देवपणा
आहे, असी कल्पना आह्मी करूंच नये. तर तस्या
अज्ञानाच्या काळांवर देवाने काना डोळा केला खरा,
परंतु आतां तो सर्वत्र सर्व मनुष्यांस पश्चात्ताप करायाची
आज्ञा करितो; कां तर त्याने असा दिवस नेमिला आहे

कीं, त्यांत तो आपण नेमलेल्या मनुष्याकडून जगाचा न्याय नीतीने ठरवील; याविषयीं त्याने त्याला मेलेल्यांमधून उठविल्याने सर्वांस प्रमाण पटविलें आहे.

तेव्हां मेलेल्यांच्या पुन्हा उठण्याविषयीं ऐकून, कित्येकानी थट्टा केली, आणि कित्येक बोलले कीं, याविषयीं आह्मी तुझें पुन्हा ऐकूं. त्यावरून पाऊलस त्यांच्यामधून निघून गेला. तरी कित्येक माणसानी त्याकडे होऊन विश्वास धरिला. त्यांमध्यें दियनुसयस सभासद, आणि दामरीस नामक कोणी स्त्री, आणि त्यांसंगतीं दुसरे कित्येक होते.

अध्याय ६३.

करिंथ आणि एफेसस यांत पाऊलसाचें जाणें.

नंतर नामांकित करिंथ शहर, जें आथेनैसारिखें मूर्त्तिपूजापरायण होऊन विषयासक्त असतां, नाना प्रकारच्या पापांत पडलें होतें, तेथें पाऊलसाने जाऊन उपदेश केला. तो सफळ झाला; कारण बहुत करिंथकरानी ऐकून विश्वास ठेवून बाप्तिस्मा घेतला.

पुढें कांहीं दिवसानी एशामैनरांतील मोठें एफेसस नामक शहर, ज्यांत आर्त्तेमिस ह्मणून सेव्य देवी होती, तेथें पाऊलस गेला. मग त्याकडून ईश्वराने मोठे चमत्कार घडविले, असे कीं त्याच्या अंगावरून रूमाल किंवा फडकीं रोग्यांजवळ आणलीं असतां, त्यांचे रोग दूर झाले, आणि भूतें त्यांतून निघालीं. तेव्हां विश्वासणाऱ्यांतील बहुतानी येऊन, आपलीं कर्मैं कबूल होऊन बोलून दाखविलीं, आणि कुविद्या जे करीत होते, त्यांतील बहुतानी

आपलीं पुस्तकें एकत्र आणून सर्वांदेखतां जाळून टाकि-लीं. आणि त्यांच्या किमतीची बेरीज करून पन्नास हजार रुपये झाले, असें पाहिलें. याप्रमाणें प्रभूची गोष्ट पराक्रमाने वाढत चालली आणि प्रबळ झाली.

पण तेथें त्या समयीं त्या मार्गाविषयीं बहुत गडबडहि झाली. कारण देमेत्रियस नांवें कोणी सोनार याने आ-र्त्तेमिसेसाठीं रूप्याचे देव्हारे करून कारागिरांस बहुत जोड मिळवून दिल्ही, तो त्यांस आणि तसीं कामें करणा-ऱ्यांस मिळवून बोलला कीं, "अहो गृहस्थानो, तुह्मी सम-जतां कीं, या उद्योगापासून आमची जीविका होत असती. तर तुह्मी पाहतां आणि ऐकतां कीं केवळ एफेसस नगरांत नव्हे, पण बहुदां सर्व एश्या देशांत या पाऊलसाने जे हातानी केलेले, ते देव नाहींत असें बोलून बहुत लोकांस समजावून फितविलें आहे, आणि हा आमचा उद्योग अप-कीर्ति पावेल असें भय आहे, हें केवळ नव्हे पण मोटी आर्त्तेमिस देवी जिची पूजा सर्व एश्या देश आणि पृथ्वी-हि करिती तिचें देऊळ तुच्छ वाटेल, आणि तिचें महत्व उतरून जाईल."

हें ऐकून ते सर्व क्रोधाक्रांत होऊन ओरडले कीं, "ए-फेससकरांची आर्त्तेमिस थोर." आणि अवघ्या नगरांत बंडाळी झाली. नंतर माकेदन्याकर गायस आणि आ-रिस्तार्खस जे पाऊलसाचे वाटेंतले सोबती, त्यांस धरून ओढून ते एकचित्ताने नृत्यशाळेंत धांवत गेले. तेव्हां पाऊलसाला त्या समुदायामध्यें जायाची इच्छा होती, परंतु शिष्यानी त्याला जाऊं दिल्हें नाहीं. आणि ए-श्याच्या अधिकाऱ्यांतील कित्येक जे त्याला अनुकूळ होते

त्यानीं त्याला निरोप पाठवून प्रार्थिलें कीं, "आपण नृत्यशाळेंत जाऊं नये." तेव्हां त्यानीं वेगवेगळी आरोळी मारिली, कारण कीं त्या समुदायांचा एकच गोंधळ झाला होता. आणि आह्मी कशाला मिळालों आहों, हें बहुतांस ठाऊक नव्हतें. आणि आलेक्षांद्रस नांवें जो त्याला यहूदी लोकानीं पुढें केल्यावर, कित्येकानीं त्याला समुदायांतून काढिलें. तेव्हां आलेक्षांद्रस हाताने खुणावून लोकांस प्रत्युत्तर देण्यास इच्छीत होता. परंतु तो यहूदी आहे असें समजल्यावर, सुमारें दोन तास त्या सर्वांची एकच आरोळी झाली कीं, "एफेससकरांची आर्त्तेमिस थोर."

मग कुळकरणी त्या समुदायाला शांत करून बोलला, "अहो एफेससकर लोकानो, जी मोठी आर्त्तेमिस देवी तिचा आणि आकाशांतून पडलेल्या मूर्त्तीचा पुजारी एफेसस नगर आहे हें ज्याला समजलें नाहीं, असा तर कोण मनुष्य आहे! तर या गोष्टी निर्विवाद असतां तुह्मी शांत असावें, आणि कांहीं साहस करूं नये, कारण कीं जीं माणसें तुह्मी आणिलीं तीं देऊळ लुटणारीं किंवा तुमच्या देवीची निंदा करणारीं असीं नाहींत. यास्तव देमेत्रियस आणि त्याच्या संगतीचे कारागीर यांचा जर कोणासीं वाद असला तर न्यायसभा आहे आणि न्यायाधीश आहेत; त्यानीं वादप्रतिवाद करावा, पण जर दुसऱ्या कांहीं निमित्ताविषयीं तुह्मी विचारितां तर तें नेमलेल्या सभेमध्यें ठरेल. आजच्या दंग्याविषयीं आपली चौकसी होईल असें भय आहे. या दंग्याचें कारण आपल्याला सांगतां येईल

असी कांहीं गोष्ट नाहीं. असें बोलून त्याने त्या मंडळीस निरोप दिल्हा.

अध्याय ६४.

पाऊलसाचें त्रोवास शहरीं जाणें, व पुन्हा एफेससांतील वडिलांस बोध देणें.

पाऊलस एफेससांतून माकेदन्यांत गेला, आणि तेथें गांवोगांवीं जाऊन त्याने उपदेश केला; नंतर ग्रीक देशांत जाऊन त्याने त्या कामांत तीन महिने घालविले. तेथून जलमार्गाने पुन्हा सुर्या देशांत जावें असें त्याच्या मनांत होतें; परंतु त्या वाटेंत आपले वैरी यहूदी टपत आहेत, असें समजल्यावरून तो खुस्कीच्या वाटेने माकेदन्याकडून जावयास निघाला आणि तेथील फिलिप्पै शहरीं जाऊन मग जलमार्गाने सूर्या देशांत त्रोवास शहरीं उतरून तेथें सात दिवस राहिला.

तेथें सप्तकाच्या प्रथम वारीं शिष्य भाकर मोडण्यासाठीं मिळाले होते. तेव्हां पाऊलस जो दुसऱ्या दिवसीं जाणार, त्याने त्यांसीं बोलतां मध्यरात्रपर्यंत ती गोष्ट चालविली, ज्या माडीवर ते मिळाले होते, तेथें बहुत दिवे होते. तेव्हां कोणी युतीखस नामक तरूण खिडकींत बसला असतां, त्याला गाढ झोंप लागली. तो झोपेने भारावून, पाऊलस बोलत असतां त्या तिसऱ्या मजल्यावरून खालीं पडला, आणि मेलेला हातीं लागला. त्या काळीं पाऊलस खालीं येऊन त्यावर पडला आणि त्याला आलिंगन करून शिष्यांस बोलला कीं, "घाबरूं नका, कारण याचा जीव यामध्यें आहे." नंतर वर जाऊन त्याने

भाकर मोडून कांहीं खाल्ली. मग फार वेळ पाहांटेपर्यंत त्यासीं संभाषण करून तो तसाच निघाला. आणि त्या तरूणाला जिवंत असा नेऊन अतिशय समाधान पावले.

तेव्हां पाऊलसाने यरूशालेमांत जाण्याचा निश्चय केला होता. त्याला एफेससांत जाण्यास अवकाश नव्हता, ह्मणून त्याने तेथील मंडळींतील वडिलांस मिलितस शहरीं जाऊन, तेथें भेटीसाठीं बोलाविलें. तें बंदराचें शहर फार रमणीय एफेससापासून सुमारें ४० मैलांवर आहे. तेथें ते वडील आल्यावर तो त्यांस बोलला, "मी पहिल्याने एश्यामध्यें आलों, त्या दिवसापासून तुह्मासीं नेहमीं कसा वागलों हें तुह्मास ठाऊक आहे. असें कीं फार नम्रतेनें व बहुत अश्रुपातानें प्रभूची सेवा करीत, आणि जीं संकटें यहूद्यांच्या कटांनीं मला प्राप्त झालीं तीं सोसीत वागलों; आणि तुह्मास जें हितकारक तें कांहीं म्या लपवून ठेविलें नाहीं. परंतु लोकांत आणि घरोघरीं म्या तुह्मास शुभवर्त्तमान सांगून आणि उपदेश करून, यहूद्यांस आणि हेल्लेन्यांसहि देवाकडे फिरून पश्चात्ताप करावा, आणि आमच्या प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवावा, हें पटवून सांगितलें. पण आतां पाहा, मी आत्म्याने प्रेरित होऊन यरूशालेमाकडे जातों; तेथें मला काय काय होईल तें न कळे. केवळ हें कळलें कीं, बंधनें व संकटें माझी वाट पाहतात, याविषयीं पवित्र आत्मा मला प्रत्येक नगरांत बोधवीतो आहे. तथापि मी कशाचीहि काळजी करीत नाहीं, आपला प्राणहि मी प्रिय मानीत नाहीं; यासाठीं कीं मी आपलें धांवणें, ह्मणजे देवाच्या कृपेचें शुभवर्त्तमान सांगण्याची जी सेवा मला प्रभु येशूपासून

प्राप्त झाली, ती हर्षानें संपवावी. आणि आतां पाहा, ज्यांमध्यें मी देवाचें राज्य प्रसिद्ध करीत फिरलों त्या तुह्मांतील कोणाच्याहि माझें तोंड पुढें दृष्टीस पडणार नाहीं, हें मला समजलें. ह्मणून या आजच्या दिवसीं, तुह्मास मी साक्षी करून ठेवितों, असें कीं सर्वांच्या रक्ताविषयीं मी निर्दोषी आहें. कारण कीं देवाचा संपूर्ण मनोरथ तुह्मास सांगण्याविषयीं म्या अंतर केलें नाहीं. तर तुह्मी आपणास आणि ज्या कळपावर पवित्र आत्म्यानें तुह्मास पाळक करून ठेविलें त्या सर्वांस संभाळा; यासाठीं कीं देवाची मंडळी जी त्यानें आपल्या रक्तानें विकत घेतली तिचें पाळण तुह्मी करावें. कां तर हें मला कळलें कीं, मी गेल्यावर क्रूर लांडगे कळपाची दया न करितां तुह्मामध्यें शिरतील. आणि तुह्मामधूनहि मनुष्यें उठून, शिष्यांस आपल्यामागें ओढण्यासाठीं विपरीत गोष्टी बोलतील. यास्तव तुह्मी सावध असा आणि हें आठवा कीं, तीन वर्षें रात्रंदिवस मी तुह्मा प्रत्येकांस अश्रुपातानें बोध करितां राहिलों नाहीं. तर आतां अहो भावानो, मी तुह्मास देवाजवळ आणि त्याच्या कृपेच्या गोष्टीजवळ निरवितों. ती गोष्ट तुह्मास दृढ करावयास आणि सर्व जे पवित्र केलेले, त्यांमध्यें तुह्मास वतन द्यावयास समर्थ आहे. कोणाच्या रूप्याचा किंवा सोन्याचा किंवा वस्त्राचा लोभ म्या धरिला नाहीं. तुह्मीहि जाणतां कीं माझ्या गरजांसाठीं आणि माझ्या सोबत्यांसाठीं, या हातांनीं श्रम केले आहेत. सर्वथा म्या तुह्मास दाखविलें आहे कीं, याप्रमाणें मेहनत करीत तुह्मी दुर्बळ लोकांचें सहाय करावें आणि ध्यावें,

यापेक्षां द्यावें हें चांगलें आहे, असें जें प्रभु येशूचें बोलणें त्याची आठवण करावी."

याप्रमाणें बोलणें संपल्यावर त्याने गुडघे टेंकून त्या सर्वांसुद्धां प्रार्थना केली. तेव्हां सर्वांनी मोठा शोक केला, आणि पाऊलसाच्या मानेवर पडून त्याचा मुका घेतला. माझें तोंड पुढें तुमच्या दृष्टीस पडणार नाहीं,' असें जें त्याने ह्मटलें होतें, त्यावरून त्यांस विशेष दुःख वाटलें. मग त्यांनी त्याला तारवापर्यंत बोळविलें.


अध्याय ६५.

यरूशालेमांत पाऊलसाला धरून कैद करणें.

पाऊलस यरूशालेमांत जाऊन देवळांत भजन करीत असतां त्याला यहूद्यांनी धरिलें, आणि ठार मारणार होते, इतक्यांत ती गडबड फौजेच्या सरदारास कळल्यावरून तो फौजेसुद्धां तेथें आला. हें पाहून यहूद्यांनी त्याला छड्या मारणें सोडिलें. सरदाराने येऊन त्याला दोन सांखळदंडांनी बांधविलें, आणि लोकांस विचारिलें कीं, "याने काय केलें आहे?" त्या काळीं समुदायाने आपापल्या मतें वेगळा वेगळा दोष ठेवून एकच आरोळी केली. ह्मणून त्या सरदारास कांहींच समजेना, सबब त्याने शिपायास हुकुम केला कीं, याला गढींत घेऊन चला. तेव्हां त्यास हुकुमाप्रमाणें शिपायांनी तिकडे चालविलें.

मग ते सर्व पायऱ्यांवर चढूं लागले असतां, शिपायांनी समुदायाच्या गर्दीमुळें त्याला उचलून नेलें. तो समुदाय त्यांच्या मागें लागून ओरडत होता कीं, "याला मारून टाका." मग पाऊलसाने सरदाराला विचारिलें कीं, "लो-

कांसीं कांहीं बोलायास मला हुकूम होईल काय?" त्यावरून त्याने त्यास हुकूम दिल्हा असतां, त्याने पायऱ्यांवर उभें राहून लोकांस हाताने खुणाविलें. तेव्हां मोठें निवांत झालें. नंतर त्याने इब्री भाषेने आपण पूर्वीं ख्रिस्ती मार्गाचा द्वेष करून त्यांतील लोकांस कसें छळिलें, व आपल्यास दमास्कसाच्या वाटेंत साक्षात्कार कसा झाला, आणि ईश्वराच्या आज्ञेने त्या मार्गाचा स्वीकार करून परकी लोकांस चांगल्या वाटेकडे कसें फिरविलें, इत्यादि सर्व सविस्तर सांगितलें. तें ऐकल्यावर लोक फारच ओरडून बोलले कीं, "असला माणूस या जगांतून नाहींसा करा."




तो कैदेंत असतां, कित्येक यहूदी कट करून आपणावर शपथ घेऊन बोलले कीं, "त्याला जिवें मारूं तोंपर्यंत आह्मी खाणार पिणार नाहीं." ज्यानीं ही शपत केली, ते चाळिसांवर होते. त्यानीं ही आपली प्रतिज्ञा मुख्य याजक व वडील यांस कळवून सांगितलें कीं- "त्याच्या गोष्टी अणखी कांहीं नीट विचाराव्या या निमित्ताने त्याला तुह्माकडे उद्यां आणावें, असें तुह्मी सभेसुद्धां

सरदाराला समजवा, ह्मणजे तो तुह्माजवळ आल्यापूर्वीं त्याला वधायाला आह्मी तयार आहों."

हें सर्व पाऊलसाच्या भाच्याला समजल्यामुळें, त्यानें गढींत शिरून पाऊलसाला सांगितलें. मग पाऊलसानें एका शतपतीला बोलावून ह्मटलें कीं, "या तरुणाला सरदाराकडे घेऊन जा, कारण याला त्यास कांहीं सांगावयाचें आहे." त्यावरून शतपतीनें त्याला नेल्यावर त्यानें सरदाराला तें सर्व सांगितलें.

तेव्हां त्यानें दोघां शतपतींस बोलावून सांगितलें कीं, "कैसाऱ्यास जावयास दोनशें शिपाई व सत्तर स्वार, आणि दोनशें भालेकरी, यांस तुह्मी तिसरा प्रहर रात्रीं तयार करून ठेवा; आणि पाठाळें मिळवून त्यांवर पाऊलसाला बसवून फेलिक्ष सुभेदाराकडे संभाळून न्या." नंतर आज्ञे-



प्रमाणें शिपायांनी त्याला रात्रीं आंतिपात्रिसास नेलें, आणि दुसऱ्या दिवशीं स्वारांनी कैसाऱ्यांत नेऊन सुभेदारापुढें उभें केलें.

———

अध्याय ६६.

कैसाऱ्यांत पाऊलसाला कैद करणें.

तेथें तो फेलिक्ष सुभेदार त्यासीं सौम्य रीतीने वागला, ह्मणून यहूद्यांनी इतके जरी त्यावर दोष ठेविले, तरी त्याला इतर बंदीवानांपेक्षां कैद फार कमी होती; आणि त्याला पाऊलसापासून कांहीं लाभ झाला असता तर त्याने त्याला सोडिलेंहि असतें. एका दिवसीं फेलिक्षाने आग्रिप्पा राजाची कन्या द्रुसिला जी त्याची बायको, तीसुद्धां येऊन पाऊलसाच्या ख्रीस्तावरल्या विश्वासाविषयीं ऐकिलें, तेव्हां तो नीति, इंद्रियदमन, आणि होणार जो न्याय, यांविषयीं बोलत असतां, फेलिक्षाने भयभीत होऊन ह्मटलें, "आतां तूं जा, संधि पाहून पुन्हा तुला बोलावीन." परंतु जे पापांचे सेवक त्यांस असल्या गोष्टी ऐकण्यास कधींच संधि सांपडतच नाहीं.

दोन वर्षांनंतर फेलिक्षाच्या कामावर फेस्तस आला त्यानेहि पाऊलसाचें सहाय केलें नाहीं; ह्मणून हा आपल्याला कदाचित् यहूद्यांच्या स्वाधीन करील, असें पाऊलसाच्या मनांत येऊन, त्याने "पादशाहाकडे माझी चौकसी व्हावी" असें मागितलें. तेव्हां फेस्तस त्याला बोलला, "बरें, तूं काइसाराकडे चौकसी मागतोस, तर त्याकडे जासील."

नंतर एका वेळेस आग्रिप्पा राजा फेस्तसाच्या भेटीस आला असतां, येशूविषयीं व आपणावर त्याची केवढी कृपा याविषयीं सांगायास पाऊलसाला अणखी एक चांगला प्रसंग आला. तेव्हां त्याने आपली पहिल्यापासून सविस्तर सर्व गोष्ट सांगून शेवटीं ह्मटलें कीं, "परंतु दे-

वाचा आश्रय पावून, मी आजपर्यंत लहान थोर या सर्वांस साक्ष देत राहिलों. आणि ज्या गोष्टी होणार आहेत, ह्मणून भविष्यवाद्यानीं व मोश्याने सांगितलें, त्यांखेरीज म्या कांहीं सांगितलें नाहीं. त्या अशा कीं ख्रीस्त मरण सोसील, आणि तो मेलेल्यांच्या पुन्हा उठण्यांत पहिला होऊन या लोकांस व विदेशी लोकांस उजेड प्रगट करील.

याप्रमाणें तो बोलत असतां फेस्तस मोठ्याने बोलला, "पाऊलसा, तूं भ्रांत झाला आहेस; तुला बहुविद्येने भ्रांत केलें आहे." मग तो बोलला, "फेस्तस महाराज, मी भ्रांत झालों नाहीं, परंतु सत्यतेच्या आणि सूज्ञपणाच्या गोष्टी बोलतों. या महाराजाला तर या गोष्टींविषयीं ठाऊक आहे, त्यासमोर मीहि प्रशस्तपणें बोलतों; यांतलें कांहीं त्यापासून लपलें नाहीं, असी माझी खातरी आहे, कां तर ही गोष्ट कोंपऱ्यांत घडली नाहीं. हे अग्रिप्पा महाराज, भविष्यवाद्यांवर आपला विश्वास आहे कीं काय? तर आहे, हें मला ठाऊक आहे." तेव्हां अग्रिप्पाने पाऊलसाला ह्मटलें, "तूं मला असें मनावितोस कीं, मी ख्रिस्ती व्हायाचा निश्चय केल्यासारिखा झालों." मग पाऊलस बोलला, "तुह्मी केवळ नव्हे, परंतु हे अवघे जे आज माझें ऐकतात, ते या सांखळदंडाच्या बंधनाशिवाय माझ्यासारिखें अगदी व्हावे, असी देवापासीं माझी प्रार्थना आहे."

पाहा, अग्रिप्पाचें मन किती सन्मार्गाजवळ गेलें होतें परंतु तें ओढाळपणाने पुन्हा बिथरलें. यावरून समजावें कीं, जे तरूण अशा गोष्टी ऐकतात त्यांचें मन त्या वेळेस

सरळ होतें परंतु तें पुन्हा बुजल्यामुळें वाडवडिलांच्या रीतीकडे ओढ घेणारे, असे लोक फार.

अध्याय ६७.

पाऊलसाचें रोम शहराकडे जलयान.

पाऊलसाला शतपतीच्या हवालीं करून रोम शहरीं पोहंचविण्यासाठीं जहाजांत बसविलें. तेव्हां त्याचे दोन सोबती, आरिस्तार्खस व लुकास हे त्याबरोबर निघाले; तेव्हां हिंवाळा जवळ आला होता, सबब त्या मार्गांत पार पडणें कठीण, असें जाणून त्यानीं हिंवाळा जाई तोंपर्यंत क्रेत बेटावर राहावें, असा निश्चय केला होता; पण वारा प्रतिकूळ होऊन जहाज भडकल्यामुळें ते सर्व मोठ्या संकटांत पडले. तेव्हां त्यानीं जहाजांतील भरित, व कांहीं जहाजाचें सामानहि काढून टाकिलें. इतक्यांत पाऊलसाला दिव्य दूत दर्शन देऊन बोलला, "पाऊलसा, भिऊं नको; तुला काइसारापुढें उभें राहिलें पाहिजे. आणि पाहा, जे तुजबरोबर तारवांत बसतात, ते अवघे देवानें तुला दिल्हे आहेत." पुढें तसेच त्यानीं चवदा दिवस हेलकावे खाल्ल्यावर, त्यांस एक बेट दिसलें; तेव्हां तें जहाज फुटूं लागलें होतें. मग सर्व मनुष्यें, कोणी पोहून, कोणी जहाजाच्या फळ्यांच्या तुकड्याचा आश्रय करून, त्या बेटावर पोहंचले. ते एकंदर दोनशें शाहत्तर लोक होते.

नंतर त्या बेटाचें नांव मलिते, असें त्यांस समजलें. तेथील त्या रानटी लोकानी त्यांस शेकोट्या करून देऊन त्यांवर मोठा उपकार केला. तेव्हां पाऊलस शेकोटीवर

लांकडें घालीत असतां, त्याच्या हाताला चिकटून राहिलेला साप, त्या लोकानी पाहिला आणि ह्मटलें कीं, "हा मोठा घातक आहे." परंतु त्याने तो झटकून अग्नींत टाकिला, त्यापासून त्याचें कांहीं वाईट झालें नाहीं, असें समजून त्यानी ह्मटलें कीं, "हाच देव आहे."

त्यानी तो हिंवाळा त्या बेटावर घालविला. पाऊलसाने तेथील बहुत रोगी मनुष्यें निरोगी केलीं. असें तेथें तीन महिने घालवून पुढें ते एका जहाजांत बसून रोम शहराकडे गेले. नंतर तेथें पाऊलसाने दोन वर्षें भाड्याच्या घरांत राहून त्याजवळ जे आले त्यांचा स्वीकार केला. आणि तो पूर्ण प्रशस्तपणें देवाचें राज्य गाजवीत, व प्रभु येशू ख्रीस्ताच्या गोष्टी शिकवीत असतां, त्याला कोणी कांहीं विघ्न केलें नाहीं.

अध्याय ६८.

प्रेषितांकडून ख्रीस्ती धर्मवृद्धि.

पाऊलसाने रोम शहरीं असतां, वरचेवर पत्रें लिहून ख्रीस्ती मंडळींतील भावांस पाठविलीं. त्यांपैकीं कित्येकांत लिहिलें होतें कीं, मी या बंदांतून सुटेन असी मला आशा आहे.

ख्रीस्ती मंडळीच्या बखरींत लिहिलें आहे कीं, तो कैदेंतून सुटला आणि एशामिनर व ग्रीस व इतर देशांत प्रवास करीत होत्सातां, येशू ख्रीस्ताचें शुभवर्त्तमान गाजवून पुन्हा रोम शहरीं आला, आणि तेथें येशूविषयींच्या बोलण्याबद्दल रोमी लोकानी त्याला तरवारीने ठार मारिलें. त्या वेळीं तो तेथें कैद झाला होता, तेव्हां त्याने

तिमथ्यसाला दुसरें पत्र पाठविलें. तो प्रवासी व कैद असतां त्याने जीं जीं पत्रें लिहिलीं तीं सर्व नव्या करारांत आहेत. तो मेल्यापूर्वीं पहिलीं तीन शुभवर्त्तमानें जीं नव्या कराराचा आरंभ तीं लिहिलीं गेलीं. त्यापैकीं एक मात्थी याने, यहूदी जे आपल्या देशांत ख्रिस्ती झाले होते, त्यांसाठीं लिहिलें. मार्कसाने फारकरून रोमी लोकांसाठीं लूकाने थ्यफिलसा नामक जो ग्रीक थोर ख्रिस्ती माणूस, त्यासाठीं. मागून यरूशालेमाचा नाश झाल्यावर, योहान्नाने एक शुभवर्त्तमान व प्रगटविणें हें पुस्तक लिहिलें. पेत्रस, व याकोब, व योहान्न व यहूदा, यांचींहि पत्रें नव्या करारांत आहेत. योहान्नाविषयीं आह्मांला ठाऊक आहे कीं, तो फार ह्मातारा होई तोंपर्यंत वांचला. इतर प्रेषितांच्या शेवटाची आह्मास पक्की माहितागिरी नाहीं. इतकें मात्र पुरें समजलें आहे कीं, त्यानी येशूच्या आज्ञेप्रमाणें सर्व देशांत जाऊन त्याची गोष्ट गाजविली. पंचवीस वर्षांच्या आंत, त्यांस जितके देश ऐकून माहित होते तितक्यांत त्यानी प्रवास करून लोकांस ख्रिस्ती धर्माचा उपदेश केला. त्यानीं जसी येशूची आज्ञा पाळिली, तसेंच येशूने त्यांस, 'जगाच्या समाप्तीपर्यंत मी तुह्माबरोबर सर्वकाळ आहें,' असें जें वचन दिल्हें होतें तें पूर्ण केलें.

समाप्त.